वागण्याची संवय असून, कोणत्याही सत्तेला न जुमानण्याइतकी कल्पना त्यांना अवगत असती, तर इंग्रजांचा अमल त्यांना चमत्कारिक वाटला असता. परंतु ही गोष्ट हिंदु लोकांस लागू नाहीं. इतिहासामध्यें अशीं उदाहरणें आहेत कीं, संख्येनें लोक कितीही पुष्कळ असले, तरी त्यांच्या अर्धी राज्यकर्त्यांच्या हातून सत्ता हिसकावून घेण्याची शक्ति असतांही ते त्या राज्यकर्त्यांचा अमल निमुटपणें सहन करीत आले आहेत. हल्लींही सर्व चिनी लोक तार्तार लोकांच्या अमलाखालीं नांदत आहेत. त्याचप्रमाणें इंग्रज लोक येण्यापूर्वीं हिंदु लोक मोंगलांच्या अमलाखालीं वागत होते. वास्तविक पाहतां ह्या मोंगलांच्या उदाहरणावरून इंग्रज लोकांनीं असें समजलें पाहिजे कीं, हिंदु लोकांवर अमल करण्यास स्वतःचे अंगीं कांहीं विलक्षण राजकारणचातुर्य पाहिजे असें नाहीं. जी गोष्ट आज इंग्रज लोक करीत आहेत, तीच पूर्वीं एकवार मोंगलांनीं केली आहे. जो जो कोणी मोंगलांचा इतिहास वाचील, त्यास असें समजून येईल कीं, जी गोष्ट इंग्रजी अमलाविषयीं अद्भुत अशी वाटते, ती गोष्ट मोंगली अमलाविषयींही तशीच वाटणारी आहे. मोंगलांनीं हिंदुस्थान देश जिंकिला तोही त्यांच्याशीं विशेष साधनें असल्याशिवाय जिंकिला. मोंगली राज्य स्थापन करणारा बाबर हिंदुस्थानांत आला, तेव्हां त्याजबरोबर मोठेंसें सैन्य नव्हतें किंवा दुसऱ्या एखाद्या राजाकडून त्यास मदतही नव्हती. मध्य एशिया खंडांत त्याचें लहानसें तार्तरी राज्य होतें, तेंही आस्बेगवर स्वारी करून त्यानें गमाविलें होतें. कांहीं दिवसपर्यंत तर तो घरादाराशिवाय भटकत फिरत होता. नंतर त्याला अफगाणिस्थानामध्यें लहानसें राज्य प्राप्त झालें. भावि प्रचंड राज्यस्थापनेचा उगम ह्यापेक्षां तो किती क्षुल्लक असणार? हा तार्तार जातीचा बाबर काबूल येथें अफगाण देशावर राज्य करीत असतां, हिंदुस्थानामध्यें आला

व तेथें त्यानें राज्य स्थापन केलें, जें राज्य सुमारें सत्तर वर्षांमध्यें अर्ध्या हिंदुस्थानावर पसरून पुढील शंभर वर्षांत निदान नांवानें तरी सर्व हिंदुस्थानभर पसरलें. आमचें असें ह्मणणें नाहीं कीं, मोठेपणा व स्थिरता ह्या गुणांमध्यें मोंगली राज्याच्यानें हल्लींच्या इंग्रजी राज्याची बरोबरी करवेल? विशेष आश्चर्य हेंच कीं, हें राज्य स्थापन होतांना इंग्लिश लोकांपेक्षां मोंगलाई राज्याचीं साधनें अगदीं क्षुल्लक होतीं. कंपनीजवळ विपुल पैसा, अनुपम लष्करी चातुर्य व अखंड पाठबळ इतक्या तरी गोष्टी होत्या. परंतु बाबर व त्याच्या पाठीमागून झालेले त्याच्या वंशांतले राजे, ह्यांजपाशीं अशा प्रकारचीं साधनें मुळींच नव्हतीं. त्यांचें राज्य वृद्धिंगत होण्याचीं कारणें सांगणें फार कठिण आहे. फार तर इतकेंच सांगतां येईल कीं, मध्य एशियामध्यें देशोदेशीं भटकणारी लोकसंख्या फार वाढली होती व पगार मिळाल्यामुळें व लूट मिळेल ह्या आशेवर हे लोक फार खुषीनें बाबर ह्याच्या नोकरीस येऊन राहिले.

दुसरें, वीस कोटि हिंदु लोकांमध्यें जर, आपण सर्व मिळून एक राष्ट्र आहों, असें मानण्याची संवय असून मग इंग्रज लोकांचा प्रवेश हिंदुस्थानांत झाला असता, तर मात्र आश्चर्य वाटण्यास जागा राहती; तसें नाहीं ह्मणून त्यांत आश्चर्यही नाहीं. केवळ पुष्कळ लोकांचा जमाव एके ठिकाणीं असला व एकराष्ट्रीयता व समानार्थित्व ह्यांनीं तो दृढसंबद्ध नसेल, तर त्यांतील लोक एकमेकांच्या विरुद्ध उठण्यास तत्पर असून, परकीयांच्या ताब्यांतही सहज जातील. हिंदु लोकांना संबद्ध करणारीं तत्वें किती निर्बल व अपुरीं आहेत, हें वर दाखविण्यांत आलेंच आहे. त्यांचा अंतस्थैक्याभाव इंग्रज लोकांस आपला अमल स्थापन करण्यास किती अनुकूल झाला आहे, हें पाहणें असेल, तर वाचकांनीं सत्तावन सालच्या बंडाचा इतिहास वाचावा. आमच्या वाचकांस स्मर-

त असेल कीं, एखादें मोठें बंड अगर निदान काळे सैन्यामध्यें असंतोष जरी उत्पन्न झाला, तरी त्याच्या योगानें इंग्रजी सत्तेस मोठा धक्का बसेल, असें आह्मीं वर सांगितलें आहे. अशा प्रकारचें बंड इ. स. १८५७ या सालीं झालें असूनही इंग्रजांची सत्ता अद्यापि वाढतच आहे, हें कसें ? असें कोणांस वाटेल. तर ह्याचें उत्तर इतकेंच आहे. ज्या बंडाचे योगानें इंग्रजी अमलास धक्का पोंचेल, असें बंड लोकांत स्वराष्ट्रीयत्व उत्पन्न होऊन झालेलें असलें पाहिजे. १८५७ सालचें बंड अशा प्रकारचें नव्हतें. तें बंड केवळ सैन्यांत झालें असून, इतर लोकांचीं मनें त्यासंबंधानें अगदीं बिघडलेलीं नव्हतीं. लष्करी लोकांत एक प्रकारचें असमाधान उत्पन्न होऊन त्या बंडास सुरुवात झाली होती. परदेशस्थ ह्या नात्यानें इंग्रजांवर उठून त्यांचा पराभव करावा, अशा हेतूनें राष्ट्रीयत्व लोकांमध्यें उत्पन्न होऊन, हें बंड झालेलें नव्हतें. आतां एकदां ह्या बंडास सुरुवात झाल्यावर तें कोणत्या उपायानें मोडलें गेलें ह्याचा आपण विचार करूं. इंग्लंडमध्यें ह्यासंबंधानें फक्त एकच समज असून, तो असा आहे कीं, इंग्रज लोक राक्षसाप्रमाणें बलाढ्य व शूर, व हिंदु लोकांपेक्षां लढण्याच्या कामांत फारच प्रबळ, ह्मणूनच हें बंड मोडलें गेलें. 'हिंदुस्थानची राजनीति' ह्या नांवाच्या आपल्या पुस्तकांत कर्नल चेस्ने ह्यांनीं या बंडाची हकीकत दिली आहे ती वाचकांनीं पहावी. मद्रास आणि मुंबई ह्या इलाख्यांतील सैन्यामध्यें मुळींच बिघाड झाला नव्हता. बंगाल्यांतील सैन्यामध्यें मात्र फार असंतोष उत्पन्न झाला होता. हा असंतोष केवळ लष्करी संबंधाचा असून, त्याचा राष्ट्रीयत्वाशीं अगदीं विरोध होता. कारण, हिंदु व मुसलमान या दोघांमध्येंही तो सारखाच उत्पन्न झाला होता. कर्नल चेस्ने असें लिहितात कीं, "दुर्व्यवस्था, उपरी अंमलदारांविषयीं मनांत उत्पन्न झालेली नाखुषी, व त्यांचा पराभव करण्यास स्वतः-

च्या समर्थतेविषयीं निःशंकता, ह्या गोष्टी हिंदु व मुसलमान ह्या उभयतांमध्यें सारख्याच अंशानें दृष्टीस पडणाऱ्या होत्या.'' असें लिहून पुढें हें बंड कशा युक्तीनें मोडलें गेलें, ह्याजबद्दल चेस्ने साहेब असें ह्मणतात कीं, " बंगाल इलाख्यांतील जें सैन्य होतें तें सुदैवेंकरून सर्व डेसी नव्हतें. नेपाळांतील हिमालय पर्वतांत रहाणाऱ्या गुरखे लोकांच्या ४ पलटणी इतर सैन्यापासून अगदीं विभक्त ठेविलेल्या होत्या. इतर सैन्यामध्यें जातिभेदासंबंधीं जी तक्रार उत्पन्न झाली होती, ती ह्या लोकांत पसरली नव्हती; व ह्यांपैकीं एक शिवायकरून बाकी सर्व पलटणें इंग्रजांचीच बाजू धरून राहिलीं. एका पलटणींतील लोकांनीं तर इंग्रजांचे संरक्षणाकरितां जें विलक्षण शौर्य व राजनिष्ठा दाखविली, त्याचे योगानें इंग्रज लोकांकडून त्यांची फारच वाहवा झाली आहे. ह्याशिवाय पंजाबांतून दोन पलटणी जास्त आणलेल्या होत्या. त्यांचा एकंदर सैन्याशीं मिलाफ झाला नव्हता. त्यांनींही इंग्रजांचीच बाजू संभाळिली; परंतु इंग्रज लोकांस विशेष मदत पंजाबांतील बिनडेसी लोकांकडून झाली. जरी हे बिनडेसी होते, तरी त्यांच्यांत व्यवस्था व शिक्षणाची तयारी इतर डेसी सैन्याप्रमाणेंच होती. कदाचित् त्यांची कवाईत व त्यांचें शिक्षण हीं डेसी सैन्यापेक्षांसुद्धां पुष्कळ चांगल्या तऱ्हेचीं होतीं, असें मानण्यास चिंता नाहीं. ह्या फौजेंत सहा पलटणी पायदळाच्या होत्या व पांच घोडे स्वारांच्या होत्या. तसेंच शीख लोकांच्या पंजाबांत चार पलटणी पायदळाच्या होत्या, त्याही ह्या फौजेस मिळाल्या. ही फौज प्रत्यक्ष पंजाब सरकारचे हुकुमाखालीं होती, व इतर सर्व सैन्यामध्यें उत्पन्न झालेला असंतोष व अव्यवस्था ह्यांजपासून ही फौज अगदीं अलिप्त होती. ही फौज व दुसरे कांहीं थोडे गोरे उत्तर हिंदुस्थानांत होते, ते मिळूनच प्रथम बंड मोडण्यास सुरुवात

झाली. असें होत असतां पंजाबांतील लोकांचीं मनें राज्यकर्त्यांच्या बाजूचीं होतीं. ते नुकतेच इंग्रजांकडून जिंकिले गेले होते. पुष्कळ दिवसपर्यंत सैन्यामध्यें नोकरी करण्याची त्यांची संवय असून, ते नुकतेच लष्करी नोकरीपासून मोकळे झाले होते. त्यांच्या बंदोबस्ताकरितां जें हिंदुस्थानी सैन्य त्यांचें मुलुखांत होतें, त्याजविषयीं त्यांचे मनांत स्नेहभाव नव्हता; कारण, हे हिंदुस्थानी लोक त्यांचे पिढीजादे वैरी होते, ह्मणून त्यांच्याशींच लढाई करण्याचा प्रसंग आला, तेव्हां ते मोठ्या उत्साहानें लढाईस तयार झाले. त्यांच्यांतून पाहिजे तितके लोक लढाई करण्यास पुढें आले, व होईल तितकी जलदी करून त्यांस कवाईत शिकविण्यांत आली व लढाईस सिद्ध होऊन ते समरंगणांत आले. बंडाची शांतता झाल्यावर जें सैन्य बंगाल प्रांतांत ठेवण्यांत आलें आहे, त्यांजमध्यें ह्या लोकांचा भाग बराच मोठा आहे."

ह्यावरून आमच्या वाचकांस कळून येईल कीं, हें बंड मोडण्यांत हिंदु लोकांविरुद्ध हिंदु लोकच प्रवृत्त झाले होते. जोंपर्यंत अशी गोष्ट करणें शक्य आहे व जोंपर्यंत सरकारच्या कृत्यांवर टीका करण्याची व त्यांजवर उठून बंड करण्याची लोकांस संवय लागलेली नाहीं, तोंपर्यंत इंग्रज लोकांचा हिंदुस्थानावर अमल कायम राहील, व त्यांत कांहीं आश्चर्य वाटण्याजोगें नाहीं. परंतु जर ह्या वस्तुस्थितींत फेर होईल, ह्मणजे जर कांहीं उपायांनीं सर्व लोकांमध्यें राष्ट्रीयत्व उत्पन्न होऊन, आपण सर्व एक आहों, असें सर्वांस वाटूं लागेल, जर इंग्लंडचें व हिंदुस्थानचें नातें आस्ट्रिया व इटली यांचे नात्याप्रमाणें थोडेंसें तरी होईल, तर इंग्रज लोकांनीं केवळ भीति बाळगावी इतकेंच नाहीं, तर एकदम राज्यपद सोडून देऊन चालतें व्हावें, हेंच योग्य आहे. सर्व लोक मिळून इंग्रजांवर उठून बंड करितील, असें आह्मांस मुळींच वाटत नाहीं. अशा प्रकारचे

भीतिदर्शक लेख कित्येक ग्रंथकारांनीं लिहिले आहेत. उदाहरणार्थ, "जानच्या हिंदुस्थानांतील व्यवस्थेसंबंधीं" ह्या नांवाचें जें पुस्तक ईल्यट साहेबानें केलें आहे, त्यांत त्यानें हिंदुस्थानच्या रयतेच्या गरीबीविषयीं फार कठोर वर्णन केलें आहे. ह्यावरून त्यानें असा अंदाज केला आहे कीं, केव्हां तरी लोक अतिशय संतापून सरकारावर उठतील व इंग्रज लोकांस हिंदुस्थानांतून घालवून देतील. ईल्यटचें वर्णन यथार्थ आहे कीं नाहीं, हें पाहण्याचें येथें प्रयोजन नाहीं. तें यथार्थ आहे, असें विवेचनाकरितां थोडा वेळ घेऊन चाललें, तरी अशा प्रकारें लोक निराश होऊन, राज्यक्रान्ति झाल्याचीं उदाहरणें इतिहासांत सांपडणारीं नाहींत. अतोनात लोकसंख्या कित्येक शतकेंपर्यंत गरीबीच्या योगानें अति नीच निकृष्टतेप्रत येऊन पोंचल्याचीं उदाहरणें आहेत. परंतु असे लोक बंड करण्यास तयार होत नाहींत. जर गरीबीच्या योगानें जिव जगविणेंही कठिण पडेल, तर ते मरून जातील; परंतु त्यांचीं मनें अगदीं थंड असून त्यांच्या कोणत्याही प्रकारच्या इच्छा कायम राहत नाहींत. बंड करणारे लोकांस कांहीं तरी आशा असते. पुढें दृष्टि देऊन ते उद्योग करितात व स्वशक्तीविषयीं त्यांस बरीच उमेद असते. परंतु जोंपर्यंत सर्व हिंदु लोक ह्मणजे आपले देशभाऊ व आपल्यावर अमल करणारे इंग्रज ह्मणजे परकीय लोक, असें त्यांस वाटूं लागलें नाहीं, तोंपर्यंत वरील आशावंत लोकांनीं एखादे बंड केलें तरी तें इतर काळे लोकांकडूनच मोडलें जाईल. परंतु जर कदाकाळीं अशा प्रकारची एकी हिंदु लोकांत उत्पन्न होईल, ह्मणजे आपण सर्व एकच राष्ट्र आहों, असें सर्व हिंदुस्थानांतील रयतेस वाटूं लागेल, तर इल्यट साहेब ह्मणतात त्याप्रमाणें निराश होऊन बंड करण्याचें त्यांस प्रयोजन पडणार नाहीं. हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, वर सांगितलेलें राष्ट्रीयत्व एकंदर लोकांत उत्पन्न करण्यास इंग्रज सरका-

रचे अमलाखालीं जितका प्रयत्न होत आहे, तितका पूर्वी कोणत्याही सरकारचे अमलाखालीं झाला नव्हता. अशी एकी उत्पन्न झाली ह्मणजे सर्व काळें सैन्य एक होईल. हें सैन्य एक झालें कीं, इंग्रजांचें मुख्य बळ नाहींसें झालें ह्मणून समजावें. इ. स. १८५७ सालचें बंड भयंकर असतांही तें इंग्रजांस मोडतां आलें, कारण त्या वेळचा असंतोष सर्व सैन्यांत पसरला नव्हता; लोकांनीं ह्या बंडास आपलें अनुमोदन दिलें नव्हतें; इंग्रजांची बाजू घेऊन लढण्यास हिंदु लोक सांपडणारे होते. परंतु जर कां सर्वांमध्यें एकी होऊन लोकांचीं मनें राज्यकर्त्यांविरुद्ध फिरलीं, तर मग अशा प्रकारचें मोठें बंड होण्याचें कारण नाहीं. त्या क्षणीं स्वराज्यसंरक्षणाच्या इंग्रज लोकांच्या सर्व इच्छा व आशा लयास गेल्या ह्मणून समजा. इंग्रज लोकांनीं हिंदुस्थान जिंकलेलें नाहीं. जिंकणारे ह्या नात्यानें त्यांजला हिंदुस्थानावर अंमल करितां येत नाहीं. परंतु बुद्ध्या तसें समजून जर इंग्रज लोक हिंदुस्थानावर अंमल करूं लागले, तर त्यांस यश येईल किंवा नाहीं, ह्याची चौकशीही करण्याचें कारण नाहीं. असा प्रयत्न करितांच जमाबंदींत हरकत येऊन राज्यकर्त्यांस अपयश प्राप्त होईल.

प्रकरण पांचवें.

इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांचे एकमेकांवर घडून आलेले परिणाम.

मागील दोन प्रकरणांमध्यें असें सांगण्यांत आलें आहे कीं, हिंदुस्थान देश इंग्रजांनीं जिंकिला, व त्याजवर ते राज्य करीत आहेत, ह्यांत आश्चर्य मानण्याजोगें कांहीं नाहीं. हिंदुस्थानामध्यें इंग्रज लोकांनीं प्रसंगानुसार मोठ्या बढाईचीं कृत्यें केलीं असतील; तसेंच कित्येक व्यक्तिमात्रांचे अंगीं उत्साह व राजकारणकुशलता विलक्षण दिसून आली असेल. तथापि असा अफाट देश इंग्रजांच्या ताब्यांत आला, एवढ्यावरूनच हिंदु लोकांपेक्षां इंग्रजांच्या अंगीं जास्त ताकद व कसब आहे, असें मानणें चुकीचें होईल. ह्या गोष्टीचीं कारणें समजण्यासाठीं इंग्रजांचे अंगीं जास्त कसब मानलें पाहिजे असें नाहीं. तिचीं कारणें स्पष्टपणें दृष्टिगोचर आहेत, व तीं पाहिलीं ह्मणजे एवढा मुलूख ताब्यांत घेऊन इंग्रजांनीं त्यावर अंमल करणें ह्यांत अशक्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. ह्मणून सामान्य सृष्टिक्रमांत दृश्य होणारा कार्यकारणभाव ह्या गोष्टीस लागू पडत नाहीं, असें ह्मणणें चुकीचें होय. परंतु अद्भुत या शब्दाच्या दुसऱ्या कांहीं अर्थानें ही गोष्ट केवळ अद्भुत आहे, इतकेंच नाहीं, तर लौकिकांत समजण्यांत येते त्यापेक्षां ती जास्तच अद्भुत आहे. जरी ही गोष्ट कारणांच्या संबंधानें अद्भुत नाहीं, तरी परिणामांच्या संबंधानें ती अद्भुत आहे, ह्मणजे विशिष्ट ऐतिहासिक अर्थानें ह्या गोष्टीस महत्व आलें आहे. वर असें सांगण्यांत आलेंच आहे कीं, कोणत्याही गोष्टीचें महत्व तिच्या भावी परिणामांवरून मानलें पाहिजे. ह्या नियमाला अनुसरून इंग्लिश इतिहासांतील कित्येक गोष्टी व विशेषेंकरून अमेरिकेंतील राज्यक्रांति, ह्या गोष्टी इतिहासांत आपण फारच महत्वाच्या

समजल्या पाहिजेत. असें असतांही त्यांजमध्यें नाटक किंवा कादंबरी ह्यांजप्रमाणें मनोरंजकत्व नसल्यानें लोकांना नीरस वाटून त्या समजून घेण्याचे कोणी श्रम करीत नाहींत. आह्मांस येथें इतकेंच सांगणें आहे कीं, इंग्रज लोकांचें हिंदुस्थानावरील राज्य प्रथम दर्शनीं अद्भुत वाटत असून, वरप्रमाणें सूक्ष्मावलोकन केल्यावर ही अद्भुतता ज्या प्रमाणानें कमी होते, त्याच प्रमाणानें त्याचें ऐतिहासिक महत्व वाढत जाणारें आहे.

एशिया खंडांतील अफाट राष्ट्रें विशेष स्मरणीय अगर महत्वाचीं आहेत असें नाहीं. कारण, एशिया खंडांत अशा प्रकारचीं महाराष्ट्रें पुष्कळ होऊन गेलीं आहेत; तथापि इतिहासदृष्ट्या त्यांचें महत्व ग्रीस किंवा टस्कनी देशांतील एखाद्या लहानशा नगरराष्ट्रापेक्षां फारच कमी आहे. त्यांचा विस्तार मोठा अगर तीं पुष्कळ दिवस टिकत, ह्यावरून त्यांचें महत्व वाढतें असें नाहीं. त्यांचा इतिहास पाहूं लागल्यावर असें आढळून येईल कीं, अशा राष्ट्रांची व्यवस्था फार हलक्या प्रतीची असून, व्यक्तिमात्राला त्यांच्या अंमलाखालीं फार दुःख पोंचत असतें; अर्थात् प्रजेला सुख मिळत नसून त्यांच्यांत कोणत्याही प्रकारची सुधारणा होत नसते. वर्णनीय असें कांहींच कृत्य त्यांजमध्यें घडून येत नाहीं. कदाचित् हिंदुस्थानच्या राज्याविषयीं प्रथम दर्शनीं आपणांस असें वाटेल कीं, ह्या वरील मासल्याचीं जीं जुलमी महाराष्ट्रें एशिया खंडांत प्राचीन काळीं होऊन गेलीं, त्यांच्याचप्रमाणें हें एक हिंदुस्थानचें हल्लींचें महाराष्ट्र आहे; त्यांत तफावत असल्यास इतकाच कीं, हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांना आंग्लभौम लोकमताचें बरेंच बंधन असून, मोंगलाई राष्ट्रापेक्षां या राष्ट्रामध्यें बुद्धिमत्ता, नीति, व औदार्य हीं थोडींशीं जास्त आहेत. ह्मणून फार झालें तर आपण इतकें समजूं कीं, ही राज्यपद्धति दुःस्थिल राजकीय संस्थेचा एक चांगला मासला आहे. मोंगलांच्या पाठीमागून

हिंदुस्थानांत त्यांच्यापेक्षां जास्त अभिमान वाटण्याजोगीं इंग्रजांनीं कांहीं विशेष कृत्यें केलीं नाहींत; व त्यांची राज्यपद्धति कितीही चांगली असली, तरी तींत प्रजा सुखी आहे किंवा नाहीं, हा संशयच आहे. इतकेंच नाहीं, तर इंग्रजी अंमलापासून हिंदु लोकांना हळू हळू सुदिन दिसत जातील किंवा दिवसेंदिवस ते दुःखार्णवांत जास्त बुडत जातील, ह्याचाही संशय आहे. कित्येक वेळां असेंही वाटण्याचा संभव आहे कीं, कदाचित् शुद्ध प्राच्य लोकांचा अंमल व विशेषेंकरून हिंदु लोकांकडूनच स्थापन झालेला अंमल हिंदुस्थानांत चालू असता, तर तो कमी सुधारलेला असतांही परकी अंमलापेक्षां लोकांना जास्त हितावह झाला असता. कारण, परकीय लोक कितीही दयाळु असले, तरी त्यांच्या मनांत परकीय प्रजेविषयीं खरोखर कळवळा कोठून असणार?

तथापि प्रत्येक अफाट राष्ट्राचा वृत्तांत वरील प्राच्य महाराष्ट्रांप्रमाणें नीरस असतोच असें नाहीं. उदाहरणार्थ, रोमन राष्ट्राचा इतिहास असा नाहीं. अलीकडे इतिहासासंबंधीं आमचे विचार बरेच विस्तृत झाले असल्यामुळें वरप्रमाणें ह्मणण्यांत आह्मांस बिलकुल धाडस वाटत नाहीं. रोमन महाराष्ट्र जुलमी असून, कित्येक वेळां लोकांना त्रासदायक व अर्धे रानटी असें असल्यामुळें त्याचा इतिहास कोणास आल्हादकारक झाला नसता. सुमारें तीस वर्षांपूर्वी असें एक मत सर्व लोकांस मान्य होतें कीं, राजनीतिशास्त्रामध्यें स्वातंत्र्याइतका दुसरा मनोरंजक विषयच नाहीं, ह्मणून ज्या काळीं एखाद्या राष्ट्रांतील लोकांस स्वातंत्र्य नव्हतें, त्या काळचा वृत्तांत इतिहासांतून गाळून टाकला पाहिजे. त्याचप्रमाणें आणखीही इतिहासवाचनासंबंधीं असा एक समज झालेला होता कीं, उच्च प्रतीचा मानसिक आल्हाद ज्याप्रमाणें कवितेपासून होतो, त्याप्रमाणेंच इतिहासापासूनही व्हावा; ह्मणून ज्या कोणत्याही पुस्तकांत

अशा प्रकारचें चमत्कारिक व आल्हादकारक वर्णन नसेल, तें पुस्तक कोणी वाचीत नसे. त्या वेळीं रोमन महाराष्ट्राचा इतिहास सुद्धां कोणाला आवडत नसे. रोमचें प्रजासत्ताक राज्य स्वातंत्र्यपूर्ण असल्या-मुळें लोकांना तें फार प्रिय वाटत असे. प्रजासत्ताक राज्याच्या पूर्वी इटलींत चालत असलेल्या बादशाहीचा वृत्तांत लोक इतक्याचकरितां वाचीत कीं, पुढें जें स्वातंत्र्य लोकांना मिळालें, त्यांचे अंकुर बादशाहीच्या वेळीं कितपत दृश्य होते, याचा खुलासा व्हावा. परंतु, प्रजासत्ताक-राज्य संपल्यावर एकदम पुस्तक मिटवण्याची पाळी येई. कारण, इ. स. २०० पासून पुढें सुमारें १००० वर्षेपर्यंत ज्या गोष्टी घडून आल्या, त्यांत रोमन लोकांचा ऱ्हास झाला असून, शेवटीं त्यांचा अगदीं नाश झाला, असें समजण्यांत येत असे. ह्मणून इंग्लंडांतील राजनीतीमध्यें व इटलींतील प्रजासत्ताकराज्यामध्यें स्वातंत्र्याचे अंकुर दृष्टीस पडूं लागे-पर्यंत पुनरपि इतिहास हातांत घेण्याची इच्छा कोणास होत नसे. परंतु इतिहासाचें स्वरूप अशा प्रकारचें आहे, असें आतां फारसें समजलें जात नाहीं, असें आह्मांला वाटतें. हल्लीं केवळ मनोरंजनार्थ इतिहास वाचला जात नाहीं; तर राजकीय संस्थांची वृद्धि व अदलाबदल ज्या नियमांनीं होते, ते नियम शोधून काढणें, हाच इतिहासवाचनाचा प्रधान हेतु आहे; ह्मणून जो भाग आपण वाचीत असतों, तो फार भरभराटीचा आहे अगर त्रासदायक आहे, हें पाहण्याची आतां कोणास जरूर वाटत नाहीं. इतिहासापासून माहिती मिळवून दुसरीकडून न मिळणारे असे अनुभवाचे धडे इतिहासवाचनानें लोकांस घालून दिले ह्मणजे बस आहे. राजनीतिशास्त्रांत स्वातंत्र्याशिवाय दुसरेही कित्येक उपयुक्त विषय शिकण्यासारखे आहेत; उदाहरणार्थ, राष्ट्रत्व, सुधारणा वगैरे. कित्येक राज्यांमध्यें लोकांस स्वतंत्रता जरी 'बिलकुल मिळत

नसली तरी वर सांगितलेल्या इतर हेतूंची वृद्धि होण्यास त्यांत कांहीं प्रत्यवाय नसतो. ह्मणूनच रोमन महाराष्ट्राचा केवळ आरंभींचाच नाहीं, तर अगदीं तेराव्या शतकापर्यंत चालू असलेल्या वृद्धिगततेचा इतिहास फार उपयुक्त मानला जात आहे. असें असतांही त्यावेळीं त्या राष्ट्रांत रानटीपणा, देवभोळेपणा अतोनात वाढला असून, लोकांसही फार दुःख सोसावें लागत असे. तरी ह्या काळाचा इतिहास उपयुक्त मानण्याचें कारण, त्यावेळीं राज्यामध्यें अंतःसुधारणा होत चालली होती, नवीन नवीन कल्पना उद्भवत होत्या, उपयुक्त परिणाम घडून येत होते, हें होय. तसेंच हल्लीं युरोपीय राष्ट्रांमध्यें जें एक परस्परसख्य व एकी दृष्टीस पडत आहे, तिचा मूळारंभ ह्या रोमन राज्यामध्यें झाला, असें सूक्ष्मावलोकनांतीं दिसून येईल. ह्मणून जरी त्या महाराष्ट्रांत जुलमी एकचक्री अंमल चालत होता, तरी त्याचा इतिहास शोधक बुद्धीनें लक्षपूर्वक वाचला जात आहे.

अशा प्रकारें ह्या रोमन महाराष्ट्रामध्यें व इतर जिकलेल्या राष्ट्रांमध्यें एक प्रकारचें अंतर आहे, ह्याचें कारण जिकलेल्या लोकांपेक्षां जिकणारांची सुधारणा जास्त असणें हें होय. आतां, ज्या राष्ट्राकडून पुष्कळ देश जिंकले जातात, तें राष्ट्र ह्मणजे सुधारणेनें फार पुढें असतें, असें नाहीं. अफाट प्रदेश जिंकणारे सायरस* किंवा चिंगीजखान† हे

* सायरस.–ह्या नांवाचा राजा इराण देशांत होऊन गेला. तो ख्रिस्ती शकापूर्वी ५२९ व्या वर्षी मरण पावला. ह्यानें इराण देश मीडूस् राज्याच्या सत्तेतून सोडविला, व आपण ५६० व्या वर्षी राजा बनला. थोडक्याच काळांत त्यानें आपलें राज्य फार वाढविलें व एशिया खंडांत बलाढ्य राजा बनला. त्यानें लिडियाचा राजा क्रीसस् ह्याचा पराभव केला, असीरियावर स्वारी केली, व बाबिलोन घेतलें. सिथियन लोकांनीं पुढें त्याचा पराभव करून त्याला कैद केलें. हिरोडोटस इतिहासकार ह्मणतो कीं, त्याला सिथियन राणीनें ठार मारविलें, पण त्याच्या मरणाबद्दल मतभेद आहे.

† चंगीजखान.–इ. स. १२०६ पासून गुलाम घराण्याचे बादशहा हिंदुस्थानावर

मासलेवाईक विजयी योद्धे होते. जे लोक अत्यंत दरिद्री असल्यामुळें लुटारूपणामध्यें निपुण असावयाचे, अशा लोकांचे वरील गृहस्थ अधिपति होते. अशा लोकांकडून एखाद्या राष्ट्रावर स्वारी झाली असतां, त्या राष्ट्राची असलेली सुधारणा अर्थात्च रसातळास जाते; ह्मणून इतिहासावरून असें आढळतें कीं, सुधारलेलीं राष्ट्रें हीं पुष्कळ वेळां सहज जिंकलीं जातात. कित्येक वेळां तीं शत्रूंबरोबर लढून आपला बचाव करितात, तरी अशा सुधारलेल्या राष्ट्रांकडून इतर देश फारसे जिंकले जात नाहींत. अर्वाचीन काळांत मात्र उपयुक्त नवीन शोध लागल्यामुळें सुधारलेल्या राष्ट्रांस फार चांगली मदत झाली आहे. देश जिंकण्याच्या कामांत अतिशय प्रवीण असे लोक टर्कोमन्स् होत. परंतु हे लोक इतर कोणत्याही लोकांपेक्षां सुधारणेच्या कामांत अतिशय मागें होते. मध्य एशियामध्यें ह्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी फिरत व एशिया खंडांतील सर्व महत्वाकांक्षी राजांस सैन्याची मदत ह्यांजकडूनच होत असे. बाबर व अकबर ह्यांनीं हिंदुस्थान काबीज केलें, त्यावेळीं त्यांनीं मुख्य मदत ह्याच लोकांकडून घेतली होती. हा नियम सामान्य झाला. परंतु क्वचित् ह्याच्या उलटही प्रकार घडतो, ह्मणजे जास्त सुधारलेल्या राष्ट्रांकडून कमी सुधारलेलीं राष्ट्रें जिंकलीं जातात. अशा प्रकारें देश जिंकून बनलेलें राष्ट्र कित्येक

राज्य करीत होते. इ. स. १२११ त शम्सुद्दीन अल्तामाश हा राज्य करूं लागला. गिझनीचा राजा खारिझम् व सिंधचा राजा नासिरुद्दीन ह्यांच्या आपसांत मारामाऱ्या चालल्या असतांना, ह्या चंगीजखानानें सर्वत्र दाणादाण करून सोडली. हा ह्या वेळीं सर्व आशिया खंडांत अति बलाढ्य राजा होता. हा प्रथम मोंगलांचा एक लहानसा सरदार असून, पुढें राज्यें जिंकतां जिंकतां, तो अति प्रबल झाला. त्यानें अवाढव्य अशा मोंगल सैन्यानिशीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून स. १२१७ पासून तों १२२३ पर्यंत तेथील मुसलमान राजांना जर्जर करून सोडिलें. हे मोंगल फार क्रूर असत व त्यांनीं फार अघोर कृत्यें केलीं. हा चंगीज १२२४ त मरण पावला. याचें अवाढव्य राज्य त्याच्या चार मुलांनीं वांटून घेतलें.

गोष्टींमध्यें फार विचारणीय असतें. अलेक्झांडर बादशाहानें पूर्वेकडील देश जिंकले, त्याची गणना या दुसऱ्या कोटींत आहे. अलेक्झांडर जरी मासिडोनियाचा बादशहा होता, तरी त्याच्या लोकांचा सर्व ग्रीस देशाशीं फार निकट संबंध असल्यामुळें ग्रीस देशाची सर्व सुधारणा अलेक्झांडरच्या लोकांचे अंगीं आलेली होती. ह्मणून त्यानें जिंकलेलीं राज्यें जरी नीच प्रतीचीं, जुलमी व लष्करी जोरावर स्थापन झालेलीं, अशीं होतीं, तरी ग्रीक विचारांचें प्राच्य विचारांशीं संघट्टन होऊन त्यापासून फारच विलक्षण व उपयुक्त असे परिणाम घडून आले. अशा प्रकारच्या रोमन महाराष्ट्राचा परिणाम अलीकडच्या युरोपियन राष्ट्रांवर घडून आलेला असून, तो वरच्यापेक्षांही जास्त वेळ टिकलेला व जास्त प्रसिद्ध असल्यामुळें फार महत्वाचा आहे. मानवी ऐतिहासिक वर्तुळाची ही गोष्ट मध्यबिंदु व मनुष्यजातीच्या प्रस्तुत सुधारणेचा केवळ पायाच आहे, असें ह्मटल्यास चिंता नाहीं.

ह्यावरून आमच्या ह्मणण्याचा झोंक वाचकांस समजलाच असेल. देश जिंकण्याचे दोन प्रकार वर सांगण्यांत आले. एक ग्रीक लोकांनीं पूर्वेकडील देश जिंकणें व रोमन लोकांनीं फ्रान्स वगैरे देश जिंकणें हा एक प्रकार; आणि टर्क लोकांनीं अगर मोंगल लोकांनीं हिंदुस्थान देश जिंकणें, हा दुसरा. आतां इंग्रजांनीं हिंदुस्थान देश जिंकला ही गोष्ट पहिल्या प्रकारांत मोडते. ही गोष्ट दुसऱ्या प्रकारांत मोडली असती, तर तिच्या भव्य स्वरूपानें चकित होऊन जाण्यास कांहींच कारण नसतें. मात्र त्या गोष्टीचें ऐतिहासिक महत्व कमी होऊन त्यांत प्रधान विषय सुधारणा नसून रानटीपणा हा असता. सुधारलेल्या मानवी इतिहासांत प्रत्येक गोष्टीचें सरासरी महत्व किती आहे, हें ओळखण्याची कांहीं एक खुणेची मर्यादरेषा आहे. कांहीं गोष्टींचें महत्व या रेषेच्या वर चढतें व

कांहींचें खाली राहतें. ज्या गोष्टींचें महत्व या रेषेनें दाखविलेल्या सरासरी मानापेक्षां जास्त आहे, ह्मणजे ज्या गोष्टी ऐतिहासिक दृष्टीनें खरोखरी फार उपयुक्त अशा वाटतात, त्यांमध्यें ही हिंदुस्थानची राज्यक्रांति गणली गेली पाहिजे. बंडखोर लोकांनीं पूर्वेकडील देश जिंकणें ही गोष्ट ऐतिहासिक महत्वाच्या संबंधानें वरील मर्यादरेषेच्या जितकी खालीं पडते, तितकीच हिंदुस्थानची राज्यक्रांति त्या मर्यादरेषेच्या वर जाते.

हिंदुस्थानांतील प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांची सुधारणा हिंदुस्थानांतील लोकांपेक्षां फार जास्त असून ती फार लवकर वृद्धिंगत होणारी आहे, असें सामान्यपणें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. असें ह्मटल्यानें इंग्रज लोकांच्या अंगच्या गुणांची अतिशयोक्ति केली, असें मुळींच होत नाहीं. बुद्धिमत्तेनें व कुशलतेनें इंग्रज लोक जरी कदाचित् ग्रीक लोकांच्या बरोबरीचे नसले, तरी त्यांची हल्लींची सुधारणा केवळ स्वकष्टोपार्जित व एकदेशीय असून त्यांचीच आहे असें नाहीं. वास्तविक ह्मटलें तर इंग्रज लोकांची हल्लींची सुधारलेली स्थिति ही सर्व युरोपीयन लोकांनीं फार परिश्रम करून मिळविलेल्या स्थितीचाच अंश असून, ही युरोपीय सुस्थितिसुद्धां प्राचीन ग्रीक लोकांपासून आज कित्येक वर्षेपर्यंत वृद्धिंगत होत आली आहे. परंतु ह्याच मानानें हिंदु लोकांची स्थिति कोणत्या प्रकारची असावी बरें? हें समजण्यासाठीं हिंदुस्थानच्या सुधारणेचा आतां आपण अंदाज केला पाहिजे.

आह्मीं वर सांगितलेंच आहे कीं, हिंदुस्थान हा एक देश नाहीं. ह्यावरून त्याची सुधारणाही एकच नाहीं; प्रथम दर्शनीं जें ऐक्य हिंदुस्थानांत आहे असें आपणांस वाटतें, तें तितकें खरोखरी नाहीं. कारण, ब्राह्मणधर्मामध्यें अशी कांहीं खुबी आहे कीं, भिन्न भिन्न प्रकारच्या

चांगल्या गोष्टी एके ठिकाणीं होऊन त्यांस एक नांव प्राप्त झालें आहे. परंतु पृष्ठभागावरच नजर न देतां जरा त्याच्याखालीं आपण नजर फेंकली, तर लोकसंख्येचे दोन भिन्न प्रकार दिसून येतील: एक गौरवर्ण व दुसरा कृष्णवर्ण. हे दोन भेद बहुतेक प्रत्येक ठिकाणीं आढळतात. जसें दक्षिणेकडे कृष्णवर्णाचें प्राबल्य जास्त आहे, तसेंच बंगाल्याकडे गौरवर्णाचें प्राबल्य जास्त आहे. तरी तेथें कृष्णवर्ण अदृश्य नाहीं. कदाचित् गंगेच्या उत्तरेस अगदीं वर मात्र नसला तर नसेल. परंतु ह्या दोन्ही प्रकारचे लोक एकमेकांत सर्व हिंदुस्थानभर मिळून गेले नाहींत, यास मुख्य प्रमाण असें आहे कीं, ज्या भाषा हल्लीं हिंदुस्थानांत बोलण्यांत येतात, त्या केवळ एकल्या संस्कृत भाषेचाच अपभ्रंश होऊन निघाल्या आहेत असें नाहीं. फ्रेंच आणि इटालियन ह्या भाषा एकाच लाटीन भाषेपासून निघालेल्या आहेत; तसें हिंदुस्थानांतील भाषांचें नाहीं. हिंदुस्थानांतील पाहिजे ती भाषा घ्या; तींत कितीही जरी संस्कृत शब्द असले, तरी अनार्य भाषेचा संस्कार तिला असणारच; कित्येक शब्दांचीं रूपें संस्कृताहून अगदीं भिन्न आहेत. ह्मणून हिंदुस्थानच्या सुधारणेची कल्पना बांधितांना ह्या वरील मुख्य गोष्टीचें आपण स्मरण ठेविलें पाहिजे. कृष्णवर्ण लोक फारसे सुधारलेले नाहींत, ह्मणून त्यांस रानटी अशी संज्ञा शोभेल. बी. एच्. हाग्सन साहेब ह्मणतो कीं, "ह्या अफाट हिंदुस्थान देशांतील प्रत्येक डोंगराळ व जंगली प्रदेशांत असे लाखों लोक आहेत कीं, त्यांची स्थिति टासिटस्* ह्यानें वर्णन केलेल्या जर्मन लोकांच्या स्थितीहून फारशी भिन्न नाहीं." तसेंच निव्वळ हिंदु व मुसलमान ह्यांजमध्यें जो भिन्न भाव आहे, तोही आपण

* टासिटस्—हा एक फार विख्यात रोमन इतिहासकार इ० सनाचे पहिल्या शतकाचे शेवटीं होऊन गेला. त्याच्या अनेक ग्रंथांत जर्मनीविषयीं एक ग्रंथ आहे.

लक्षांत ठेविला पाहिजे. हिंदुस्थानांत मुसलमानांची संख्या पांच कोटी-हून कमी नाहीं व हिच्यापैकीं बरेच लोक अफगाण, पठाण, अरब, पर्शी-यन्स, टर्कोमन्स किंवा तार्तार, या जातींचे असून, ते निरनिराळ्या वेळीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करणाऱ्या सरदारांबरोबर, अगर त्या सरदारांच्या सैन्यांत नोकरी धरण्याकरितां प्रथम हिंदुस्थानांत आले, ह्मणून ह्या मुसल-मान लोकांत जी सुधारणा दृष्टीस पडते, ती चमत्कारिक आहे. तिला अर्धसुधारणा ह्मणतां येईल. कांहीं कांहीं सद्गुण त्यांच्यांत प्रबल पण केवळ प्राचीन स्थित्यनुरूप आहेत. एकंदरीनें हल्लींच्या समाजस्थितीस व सुधारणेस त्या प्राचीन कल्पना अगदीं अयुक्त आहेत असें ह्मणावें लागतें.

आतां शेवटीं विशिष्ट हिंदु लोकसंख्येचा विचार करूं. आर्य ह्मणून कोणी एक संस्कृत भाषा बोलणारे लोक होते. ते पंजाबाकडून हिंदुस्थानांत आले व हळू हळू गंगानदीच्या कांठीं पसरले. आपणां सर्वांवर सर्वशक्तिमान परमेश्वराची सत्ता आहे, असें ते मानीत असत. त्यांनीं हीं आपलीं मतें सर्व हिंदुस्थानभर पसरलीं. इतक्या जारीची सुधारणा आजपर्यंत कधींही दुसऱ्या राष्ट्राकडून झाली नसेल. वेदाच्या भाषास-रणीवरून दिसतें कीं, त्या वेळीं आर्य लोक अगदीं रानटी स्थितींत होते. तरी त्यांच्या अंगीं बुद्धिमत्ता व भूतदया हे गुण त्या वेळीं वसत होते. हिंदुस्थानांत आल्यावर तर त्यांची सुधारणा फार जलद वाढूं लागली. त्यांच्या त्या वेळच्या ज्या कित्येक रीतीभाती होत्या, त्यांजपासून त्यांचे कायदे उत्पन्न होऊन शेवटीं त्यांचा एके ठिकाणीं संग्रहही केला गेला. श्रमविभागाचें तत्व त्यांचे लक्षांत आलें. त्यांच्याचपासून कवित्वाची व तत्वज्ञानाची सुरुवात झाली. शास्त्रीय विषयांस आरंभही यांच्या-पासून झाला. बौद्ध धर्म ह्मणून जी विलक्षण धर्मसुधारणा झाली तिचीही

उत्पत्ति ह्यांच्यांतूनच झाली. त्या बौद्ध धर्माची जगाच्या प्रमुख धर्मांमध्यें आजपर्यंत गणना होत आहे. ज्या गुणसंपन्न लोकांनीं पश्चिमेकडे जाऊन युरोपीय सुधारणेचा पाया घातला, त्यांजमध्यें व ह्या प्राच्य आर्य लोकांमध्यें वर सांगितलेलें साम्य आहे.

परंतु हे आर्य लोक सुधारणेच्या कामांत युरोपामध्यें जितके पुढें गेले, तितके हिंदुस्थानांत गेले नाहींत. हिंदुस्थानामध्यें आर्य लोकांनीं इतिहास लिहून ठेवण्याची मुळींच पर्वा केली नाहीं. प्राचीन इतिहास हल्लीं मुळींच उपलब्ध नाहींत, असें ह्मटलें तरी चालेल. जे थोडे आहेत, त्यांचा उद्भव जे ग्रीक किंवा मुसलमान लोक हिंदुस्थानांत आले, त्यांच्यापासून झाला. ह्या गोष्टीवरून हिंदुस्थानांत ह्या आर्य लोकांच्या अवनतीच्या कारणांची आपणांस कल्पना करतां येईल. बौद्ध धर्म ह्मणून जो सुधारलेला पंथ निघाला, तोही कांहीं शतकांनंतर अदृश्य झाला. हिंदुस्थानांतून तर तो नाहींसाच झाला. त्यानंतर धर्मसंरक्षक उपाध्ये लोकांचा जुलमी अंमल लोकांवर पूर्णपणें बसला. पुढें कोणत्याही प्रकारची एखादी भक्कम व दृढ अशी राजकीय संस्था उत्पन्न झाली नाहीं. शहरसुधारणा ह्मणून जी कांहीं असते, ती त्यांच्यांत बिलकुल उत्पन्न झाली नाहीं. इतक्यामध्यें परचक्राचें जबर वारें त्यांस लागूं लागलें.

परचक्राखालीं पुष्कळ काळपर्यंत दडपून जाणें हेंच राष्ट्रीय अवनतीचें एक मुख्य कारण आहे. हिंदु लोकांवर एकावर एक संकटें येत गेल्यामुळें हिंदु लोकांची सर्व प्रकारची मानसिक अवनति कशी होत गेली, ह्याची कल्पना प्राचीन हिंदु लोकांविषयीं जी थोडीशी माहिती आपल्यास आहे, तिजवरून करतां येईल.* एरियन ह्मणून एक

* "हिंदुस्थान देश आपल्यास काय शिकवितो" ह्या नांवाचा माक्समुलर साहेबांनीं एक ग्रंथ केला आहे, त्यांत ह्या विषयाचें सविस्तर वर्णन आहे.

ग्रीस देशाचा ग्रंथकार आहे, त्यानें हिंदु लोकांच्या नीतीविषयीं बरीच हकीकत लिहून ठेविली आहे. ती वाचिली असतां आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. तो असें ह्मणतो कीं, " हिंदु लोक विलक्षण शूर असून युद्धकौशल्यांत त्यांची बरोबरी करण्यास एशियांतील दुसरे कोणतेही लोक समर्थ नाहींत. ते फार प्रामाणिक व साधे आहेत. ते इतके समंजस आहेत कीं, त्यांस कायद्यांच्या आधारें फिर्याद करण्याचा प्रसंग पडत नाहीं. ते इतके प्रामाणिक आहेत कीं, त्यांच्या घरांत कुलुपांची जरूर लागत नाहीं, व त्यांचे करार लेखबद्ध असण्याची अवश्यकता पडत नाहीं. एकही हिंदु गृहस्थ खोटें बोलल्याचें उदाहरण उपलब्ध नाहीं." ह्या वर्णनांत अतिशयोक्तीचा अंश नसेल असें नाहीं. तथापि हें वर्णन लिहिल्या वेळेपासून हिंदु लोकांच्या नीतिमत्तेमध्यें जमीन अस्मानाचा फरक पडला आहे, ह्यांत संशय नाहीं. प्रसिद्ध इतिहासकार एल्फिन्स्टन साहेबही अशा प्रकारचा फरक पडला असल्याचें कबूल करितात. अतिशयोक्ति ह्मणजे मिथ्यावर्णन नव्हे; तर जी गोष्ट मूळची असेल, तीच जास्त करून सांगणें. ह्मणून वरील वर्णनांत बराच तथ्यांश असला पाहिजे. हल्लीं ह्या वर्णनावरून इतकीच शोचनीय गोष्ट दिसून येते कीं, प्राचीन हिंदु लोकांत जे गुण पूर्णपणें वसत होते, त्याच गुणांचा हल्लींच्या हिंदु लोकांत विलक्षण अत्यंताभाव आहे. ह्मणून अलीकडे ज्या लोकांनीं हिंदुस्थानांत प्रवास करून पुस्तकें लिहिलीं आहेत, ते लोक हिंदु लोकांचें वर्णन वरच्याहून अगदीं उलट करितात. हिंदु लोक अगदीं अप्रामाणिक, भित्रे व अतिशय कलहप्रिय आहेत, असें हे लोक ह्मणतात. परंतु परचक्राखालीं हिंदुस्थान देश पुष्कळ दिवसपर्यंत राहिल्यानें अशा प्रकारचा फरक त्यांच्या वर्तनांत पडणें अगदीं साहजिक आहे.

ह्यावरून हिंदुस्थानांतील सुधारणेच्या एकंदर तीन अवस्था दृष्टोत्पत्तीस येतात. पहिली अवस्था ह्मणजे, अगदीं आरंभींच्या लोकांची रानटी स्थिति; दुसरी अवस्था, ' मुसलमान लोकांच्या वेळची ' ह्या नांवानें जास्त स्पष्ट होईल; व तिसरी अवस्था ह्मणजे, गुणसंपन्न आर्य लोकांच्या अवशिष्ट वंशजांची. ही तिसऱ्या प्रकारची सुधारणा अर्धभ्रष्ट व प्रतिबद्ध झालेली आहे. ते गुणसंपन्न लोकही आरंभापासून जगाच्या प्रधान व वृद्धिंगत सुधारणेपासून विलक्षण रीतीनें अलिप्त राहिलेले आहेत. ह्या लोकांच्या हातून कित्येक महत्कृत्यें फार प्राचीन काळीं घडून आलीं. त्या लोकांतील वीररसप्रधान काव्यें पाश्चिमात्य काव्यांशीं केवळ तुलनार्ह असून, तीं फार प्राचीन आहेत; तरी लोक समजतात इतकीं तीं प्राचीन नाहींत. त्याचप्रमाणें ह्या लोकांचे तत्वज्ञानावरील निरनिराळे ग्रंथ व शास्त्रीय पायावर रचलेलें स्वभाषेचें सुंदर व्याकरण हीं फार प्राचीन आहेत. अर्वाचीन काळीं मात्र ह्या लोकांच्या हातून महत्वाच्या गोष्टी घडून आल्या नाहींत. युरोप खंडावर रानटी लोकांच्या स्वाऱ्या होऊन प्राचीन सुधारणेचा लय झाला, तेव्हां तिचें जर पुनरुज्जीवन झालें नसतें, व दहाव्या आणि तेराव्या शतकांत तार्तार लोकांनीं स्वाऱ्या केल्या, त्यांजपुढें जर तिचा टिकाव लागला नसता, तर युरोपाची जी स्थिति झाली असती, त्या स्थितीचें व हल्लींच्या हिंदुस्थानच्या स्थितीचें पुष्कळ साम्य आहे. दहाव्या शतकांत युरोप खंडाची स्थिति कांहीं चमत्कारिक झाली होती. एशिया खंडांतील राष्ट्रांकडून वारंवार युरोपावर स्वाऱ्या होत होत्या. युरोपाचीं राष्ट्रें स्पष्टपणें पृथक् विभागलेलीं नसून मजबूद नव्हतीं. तेथील भाषा ग्रंथलेखनाच्या उपयोगी नव्हत्या. सर्व ज्ञानभांडार एकाच अव्यवहारिक भाषेमध्यें कोंडलेलें असून तें ज़ुलमी पाद्र्यांकडूनमात्र लोकांना थोडथोडें

वांटलें जात होतें. सर्व तत्वज्ञान, आरिस्टाटलचे ग्रंथ, पाद्री लोकांचे धर्मोपदेश, व ख्रिस्ती धर्मशास्त्राचें लाटिन भाषेंतील भाषांतर, ह्यांजमध्यें कोंडलेलें असून, तेंही पुष्कळ शतकांचें जुनें झालें होतें. ह्या ज्ञानसंग्रहाच्या मुळांत भर मुळींच पडत नसून, फार तर थोडेबहुत टीकारूपी ग्रंथ नवीन होत असत. दहाव्या शतकांत युरोपाची अशा प्रकारची स्थिति होती. परंतु कांहीं वेळ आपण अशी कल्पना करूं कीं, दहाव्या शतकांत युरोपांतील सुधारणा खरोखरी होती तिजपेक्षां कमी असून आज एकुणिसाव्या शतकापर्यंत वाढत वाढत ती दहाव्या शतकाच्या इतकीच राहती, तर जी युरोपची स्थिति आज असती, तशाच प्रकारची हिंदुस्थानांतील आर्य लोकांची स्थिति आहे, असें सांगितल्यानें आमच्या वाचकांस ती जास्त स्पष्ट होईल. ह्या स्थितीचें रानटी स्थितीशीं मुळींच साम्य नाहीं, तर पाश्चिमात्य देशांची वर वर्णन केलेली जी मध्यस्थिति तिच्याशींच हिचें विशेष साम्य आहे.

रोमन लोकांचें राष्ट्र युरोपांतील पुष्कळ देशांवर पसरलेलें होतें. ह्मणजे रानटी लोकांवर सुधारलेल्या लोकांचा अंमल पुष्कळ होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. गॉल* आणि आयबीरियन† लोकांना रोमन लोक, भयप्रदर्शनार्थ उभारलेल्या आकाशदिव्याप्रमाणें वाटत होते. त्यांचें तेज त्या रानटी लोकांस मान्य असे व त्यांजपासून जी ज्ञानप्राप्ति रानटी लोकांस होई, तिजबद्दल ते आपली कृतज्ञता दाखवीत असत. हिंदुस्थानावर इंग्रज लोकांनीं अंमल करणें ह्मणजे आधुनिक सुधारलेल्या राष्ट्रानें मध्यसुधारणेच्या राष्ट्रावर अंमल करण्यासारखें आहे. इंग्रजी अंमलरूपी दिव्याचें तेज वर सांगितलेल्या दिव्याच्या तेजापेक्षां कदाचित्

* हल्लींचें नांव फ्रान्स.

† स्पेन आणि पोर्तुगाल ह्यांतील मूळचे लोक.

कमी नाहीं; तरी त्या तेजाचा प्रभाव लोकांस तितका प्रज्वलित वाटत नसून त्याजबद्दल लोकांची कृतज्ञताही तितकी नाहीं. इंग्रजी अंमल ह्मणजे प्रचंड अंधारामध्यें चमकणारा दीप आहे असें नाहीं; तर बराच प्रकाश असलेल्या संधिप्रकाशाच्या उजेडामध्यें जसा एखाद्या थंडीच्या दिवसांतल्या सूर्याचा प्रकाश पडावा, तद्वत हा वरील दीप आहे.

हिंदुस्थानांत प्रवास केलेल्या कित्येक गृहस्थांनीं असें ह्मटलें आहे कीं, हिंदु लोक जरी इंग्रजांची सत्ता कबूल करितात, व इंग्रजांनीं केलेल्या आगगाड्यांचा उपयोग करितात, तरी त्यांबद्दल हिंदु लोकांच्या मनांत पूज्यबुद्धि नाहीं, इतकेंच नाहीं, तर उलट ते त्यांचा द्वेष करितात. व हें साहाजिकही आहे. इंग्रज लोक हिंदु लोकांपेक्षां हुषार नाहींत. त्यांचें मन हिंदु लोकांपेक्षां जास्त गंभीर किंवा जास्त विकसित नाहीं. रानटी लोकांनीं पूर्वी कधीं न ऐकिलेले असे सुधारलेल्या राज्यकर्त्यांचे शहाणपणाचे विचार ऐकून जसें त्यांस आकस्मिक आश्चर्य वाटतें, तसें हिंदु लोकांस इंग्रज लोकांपासून आश्चर्य वाटणारें नाहीं. इंग्रज लोकांच्या कवितेंत जसे कांहीं अत्युच्च विचार आहेत, तसे हिंदु लोकांच्या कवितेंतही आहेत. इंग्रज लोकांच्या नवीन सुधारलेल्या शास्त्रांतही हिंदु लोकांस अगदीं अपरिचित अशा कल्पना बहुधां नसतील. इंग्रज लोकांचे विचार जास्त आहेत, अगर जास्त प्रगल्भ आहेत, असा इंग्रज लोकांनीं गर्व करण्यास कांहीं कारण नाहीं. त्यांच्या कल्पना अनुभवानें जास्त परीक्षित असून जास्त मजबूद अशा दिसून आल्या आहेत, इतकेंच कायतें जास्त आहे. फार प्राचीन अगर मध्यकालीन सुधारणेपेक्षां आधुनिक सुधारणा जास्त महत्वाची आहे, असें मानण्यास कारण इतकेंच कीं, हल्लीं अनुभवसिद्ध तत्वांची संख्या अतोनात वाढली आहे. ह्मणून अर्थातूच अशा तत्वांचा मानवी सुखाकडे व्यवहारांत पूर्वीपेक्षां फारच

जास्त उपयोग होतो. तथापि कवित्वप्रिय अगर मायावादि तत्ववेत्त्यास अशा अनुभवजन्य सिद्धांताचा मुळींच गंध नाहीं. अशा प्रकारचीं तत्वें तो अप्रगल्भ मानील. ह्या सिद्धांतापासून प्रत्यक्ष उपयोग घडून जी हल्लीं मनुष्यमात्राची सुखवृद्धि झाली आहे असें आपण मानतों, ती पाहून तो तत्ववेत्ता पोटभर हांसेल मात्र. कारण, मायिक व पारमार्थिक विचारांच्या अमर्याद विस्तारांत तो गर्क होऊन गेल्यामुळें ऐहिक विषयांचें त्यास भान राहत नाहीं.

हिंदुस्थानांत हल्लीं या पाश्चिमात्यांच्या अनुभवजन्य सिद्धांतसंचयाची ब्राह्मिक मायेच्या तत्वांशीं झटापट सुरू आहे. प्राचीन रोमन महाराष्ट्रांतून पुष्कळ ज्ञानसंग्रह सर्व युरोपीय राष्ट्रांस प्राप्त झाला, तथापि ह्या पाश्चिमात्यांच्या अनुभवजन्य शोधांत ब्राह्मिक मायेच्या पारमार्थिक तत्वांपेक्षां फारच जास्त तथ्य आहे, इतकेंच नाहीं, तर सर्व युरोपीय राष्ट्रांस प्राप्त झालेल्या रोमन ज्ञानसंग्रहापेक्षांही प्रस्तुतच्या अनुभवजन्य शोधांत जास्त तथ्य आहे, असें सर्व युरोपीय गृहस्थांचें सर्वानुमत हल्लीं युरोपांत ठरींव आहे. ह्यावरून असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं, कीं हिंदुस्थानामध्यें मूळच्या अवशिष्ट सुधारणेवर जिकणाऱ्या पाश्चिमात्य राष्ट्राच्या जास्त वरचढ सुधारणेची छाप बसत आहे. ह्या गोष्टीच्या स्वरूपाचें महत्व आणि उपयोग हे, पूर्वी रोमन महाराष्ट्राकडून इतर युरोपीय राष्ट्रांवर घडून आलेल्या तशाच प्रकारच्या गोष्टीच्या स्वरूपापेक्षां जास्त आहेत. प्रत्यक्ष प्रयोगाचा विस्तारही दोनही गोष्टींमध्यें सारखाच आहे. हिंदुस्थानांतील लोकांच्या हितानहितावर जे परिणाम घडून आले आहेत, त्यांजवरून युरोपीय सुधारणेचा बरेवाईटपणा ठरला जातो. कित्येक ह्मणतात कीं, इंग्लिश राज्यपद्धति स्थापन झाल्यापासून हिंदुस्थानांत पुष्कळ दिवस चालू असलेले

अनिष्ट प्रकार बंद झाले. कित्येक असेंही ह्मणतात कीं, नवीन अनिष्ट प्रकार पुष्कळ सुरू झाले. परंतु नवीन राज्यपद्धतीमुळें जो एक विशिष्ट परिणाम हिंदुस्थानावर घडून आला, त्याजपुढें ह्या वरील वाद-विवादाचें कांहींच महत्व नाहीं. तो परिणाम हा कीं, सर्व हिंदुस्थान-भर ब्राह्मण धर्माचा पगडा पूर्णपणें चालू असतां, सर्व जगतामध्यें प्रमुखतेस पावलेले असे जे पाश्चिमात्यांचे विचार त्यांचा हिंदुस्थानांत फैलाव होऊं लागला. पृथ्वीच्या पाठीवर इतक्या महत्वाचा दुसरा कोणताही प्रयोग हल्लीं घडून येत नसेल. अशा प्रकारची महत्वाची सुधारणा एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रांत करण्याची संधि फारच क्वचित् घडून येते, हें ध्यानांत घेतलें ह्मणजे वरील प्रयोगाच्या अवलोकनांत आपणांस खरोखरी रुचि लागेल. इतकी खटपट व श्रम करण्यापासून इंग्लंडास खरोखरी फायदा आहे किंवा नाहीं, अशी शंका मनांत उत्पन्न होऊन जी मनाची निराशा होते, तीसुद्धां नाहींशी होण्याचा संभव आहे.

हा विलक्षण प्रयोग चालू असतांना इंग्लिश महाराष्ट्रास एक मोठा फायदा होत आहे, तो ह्या ठिकाणीं ध्यानांत घेतला पाहिजे. ह्या हिंदु-स्थानांतील इंग्लिश महाराष्ट्राची पूर्वीच्या रोमन महाराष्ट्राशीं तुलना केली असतां, हा फायदा व्यक्त होतो. रोमन शहर महाराष्ट्राचे मध्यभागीं वसलेलें होतें, ह्मणून इतर भागांतील बऱ्यावाईट गोष्टींचा परिणाम रोमवर घडत असे. सर्व राष्ट्रावर जीं संकटें येण्याचा संभव असे, तींच संकटें रोम शहरालाही सारखींच लागू असत. परंतु हिंदुस्थानावर इंग्रजांचा अंमल असतांही त्या देशापासून इंग्लंड देश प्रत्येक गोष्टीमध्यें अगदीं अलिप्त आहे. हिंदुस्थानांतील बऱ्यावाईट गोष्टींचा परिणाम इंग्लंडावर फारसा घडून येत नाहीं.

रोमची स्वतंत्रता नष्ट होण्यास कारण अखिल महाराष्ट्राचें ओझें

त्या शहरावर पडलें, हें होय, हें प्रत्येक इतिहासाचें अध्ययन करणारास पूर्ण अवगत आहे. रोममध्यें कित्येक नागरिक संस्था पूर्ण दशेस आल्या होत्या. रोमचें प्राबल्य वाढण्यास त्याच संस्था कारण असून, इतर पाश्चिमात्य देशांस पुरवून देतां येईल इतकी सुधारणा रोममध्यें त्यांच्याचमुळें उत्पन्न झाली होती. परंतु ही सुधारणा इतर देशांस वांटून देण्याच्या कामांतच त्या संस्थांचा लय झाला. सर्व राज्यव्यवस्थेस उतरती कळा लागली. तेथील सुधारणा इतर राष्ट्रांस प्राप्त होत असतांच ती कमी प्रतीची होत चालली. रोमन भाषेची व ग्रीक भाषेची पुष्कळ दिवस झटापट चालू असतां, अखेरीस रोमन भाषेचा बऱ्याच अंशीं पराभव झाला. ऑरेलियस बादशहाला आपले विचार ग्रीक भाषेंत लिहून ठेवणें भाग पडलें. रोमन धर्मानें आपल्याकडे पुष्कळ लोकांचीं मनें वळविण्याचें सोडून दिलें व त्याची अवहेलना होऊं लागली. शेवटीं त्याच महाराष्ट्राच्या एका दूरच्या कोंपऱ्यांत उत्पन्न झालेल्या धर्मापुढें रोमन धर्माचा अगदीं मोड झाला. रोमच्या प्रत्येक मनुष्यास स्वराष्ट्राविषयीं विलक्षण तऱ्हेचा अभिमान वाटत असे. परंतु पुढें असा समय प्राप्त झाला कीं, तेथील बादशहा प्राच्य बादशाहांप्रमाणें रत्नखचित मुगुट धारण करीत असतांही रोमन मनुष्याच्या विचारांतून व मनोधर्मांतून ' रोमन ' हे शब्द जणूं काय गळून पडल्यासारखे झाले. हल्लीं आपणांस ह्या गोष्टीचें खरें इंगित कळून आलें आहे. रोम येथील विचारांचे व संस्थांचे परिणाम सर्व युरोपांतील लोकांच्या मनावर पुष्कळ शतकेंपर्यंत घडून येत होते. प्रथमारंभीं रोमन लोकांचे कायदे व क्याथोलिक धर्म ह्यांच्या योगानें, व पुढें अखिल विद्यांचें पुनरुज्जीवन* होत होतें त्या वेळेस त्यांचे भाषाग्रंथ व कलाकौशल्य ह्यांच्या योगानें,

* टीप.—१ पान ९ पहा.

हे सर्व परिणाम युरोपावर केवळ अंतस्थरीत्या घडून येत होते. सर्व युरोपीय सुधारणेचें मूळ उत्पत्तिस्थान रोम शहर. ह्या उत्पत्तिस्थानापासून सर्व युरोपास उन्नतावस्था प्राप्त झाली हेंच रोम शहर जर युरोपाचे मध्यभागीं नसून, इतर युरोपीय देशांच्या तंटेभांडणांपासून तें अगदीं अलिप्त असतें; जी सुधारणा रोम शहरानें त्या देशांस दिली तिच्या बदला त्या देशांपासून रानटीपणा त्या शहरानें परत घेतला नसता; स्वतंत्र सत्तेचा शांतपणें उपभोग घेत अगदीं एका कोंपऱ्यांत तें शहर पडून राहतें; व आपले ताब्यांतील राष्ट्रांस सुनीतीच्या मार्गास लावीत असतां स्वतःची तारुण्यावस्थेंतील उमेद बिलकूल खर्चू न देतां स्वशक्तीला प्रगल्भतेप्रत पोंचविण्याचे प्रयत्न त्या शहराकडून झाले असते; तर रोमची व सर्व युरोपीय इतिहासांची आज कशी भिन्न स्थिति दृष्टोत्पत्तीस आली असती, ह्याचा वाचकांनींच स्वस्थपणें विचार करावा.

कदाचित् रोमन महाराष्ट्राशीं हिंदुस्थानची तुलना करण्यांत सारखेपणामध्यें रोमच्या स्थितींत एक उणीव दिसण्याजोगी आहे. रोमचें महाराष्ट्र एवढें मोठें वाढलें, त्यांत जिंकलेल्या राष्ट्रांशीं ताडून पाहतां जिंकणारें राष्ट्र फारच लहान होतें. मूळ शक्तीचा प्रभाव मोठ्या देशांतून बाहेर पडला नसून, लहानशा शहरांतून बाहेर पडला होता. एखाद्या साधारण प्रकाशित ज्योतिर्बिंबाची उपमा रोम शहरास शोभणार नाहीं, तर प्रज्वलित तेजाच्या अतिसूक्ष्म बिंदूचीच उपमा त्यास शोभेल. रोमच्या लोकसत्तात्मक राज्यामध्यें ज्या संस्था होत्या, त्या मुख्यत्वेंकरून नागरिक* होत्या. ह्मणून फक्त इटली देशासही लागू करण्यासाठीं त्या ताणल्या असतां तुटून जाणाऱ्या होत्या. परंतु जिंक-

* रोमन व ग्रीक ह्या महाराष्ट्रांमध्यें प्राचीन काळीं पुष्कळ नगरसंस्थानें होतीं. हें एका प्रकरणीं सांगण्यांत आलें आहे.

णाऱ्या राष्ट्राचा पाया रोम शहरापेक्षां ज्या ठिकाणीं फार विस्तृत आहे, त्या ठिकाणींही राष्ट्र जिंकण्याच्या कृत्यांत जिंकणाऱ्या राष्ट्राचें स्वरूप फार बदलून जातें. ज्या लढायांच्या योगानें नवीन राज्यें जिंकलीं जातात, व तीं जिंकल्यावरही ताब्यांत राखण्याकरितां ज्या नवीन संस्था उपयोगांत आणाव्या लागतात, त्यांजमुळें जिंकणाऱ्या राष्ट्राची राज्यव्यवस्था व वसुलाची रीत हीं बदलणें, भाग पडतें. हिंदुस्थान देश इंग्रजांकडून जिंकला जाण्यांत ज्या कांहीं अपूर्व गोष्टी घडून आल्या, त्यांपैकीं ही एक फार चमत्कारिक गोष्ट आहे कीं, हा देश जिंकण्यास साधनें अगदींच क्षुल्लक होतीं. देश जिंकल्यावरही त्याचा इंग्लंडावर उलट परिणाम मुळींच घडून आला नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. ही चमत्कारिक गोष्ट कशी घडून आली, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. ज्या युक्तीनें हिंदुस्थान देश इंग्रजांनीं जिंकला, तिच्या योगानें त्यांस त्या कृत्यास कोणताही प्रकारचे प्रयास पडले नाहींत. मोंगल बादशाहांचा पराभव करून त्यांचें राज्य हिरावून घेण्याचा जर इंग्लंडानें विचार केला असता, तर ज्याप्रमाणें युरोपांतील इतर राष्ट्रें जिंकण्यांत रोमन महाराष्ट्राचा लय झाला, त्याचप्रमाणें इंग्लंडाचाही लय झाला असता. कारण, ह्या कृत्यास हात घालण्यापूर्वीं स्वतःची शक्ति पूर्णपणें वाढवावी लागली असती. स्वशक्ति वाढविणें ह्मणजे सर्व राष्ट्र लष्करी बाण्याचें करणें होय. इंग्लंडाकडून अशी गोष्ट करण्यांत आली नाहीं. हिंदुस्थानांत अव्यवस्था असतां, कित्येक इंग्रजी व्यापाऱ्यांनीं जी सत्ता हिंदुस्थानांत स्थापन केली, तीच इंग्रज सरकारानें आपल्याकडेस घेतली. खरा प्रकार असा आहे, ह्मणून एवढा राज्यविस्तार झाला असतांही इंग्लंडची राज्यनीति अगदीं अप्रतिबद्ध व अनुपद्रवित राहिली. परराष्ट्रांशीं इंग्लंडच्या वर्तनक्रमांत ह्या

राज्यविस्ताराचे योगानें बराच फरक पडला आहे, ही गोष्ट खरी आहे, व हें वर सांगण्यांतही आलेंच आहे. तरी इंग्लिश राजनीतीच्या अंतर्व्यवस्थेंत मुळींच फरक पडला नाहीं. युरोप खंडांतील कित्येक प्रदेशांचें इंग्लंड देशाशीं खासगी सख्य चालत आहे. तीनही जार्ज राजांच्या वेळेस हानोवरचें इंग्लंडशीं सतत ऐक्य राहिलें होतें; तसेंच तिसरा वुइल्यम राजा इंग्लंडावर राज्य करीत असतां, हालंड देशाचेंही ऐक्य इंग्लंडाशीं होतें. तरी ज्याप्रमाणें ह्या देशांच्या ऐक्यापासून कोणताही परिणाम इंग्लंडावर घडून आला नाहीं, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील राज्यपद्धतीमुळें इंग्लंडावर परिणाम घडले नाहींत; ह्मणून ह्या विशिष्ट संबंधांत उच्च प्रतीच्या सुधारणेचा कमी प्रतीच्या सुधारणेवर जो अंमल झाला आहे, तो रोमन महाराष्ट्रांतील सुधारणेच्या अंमलापेक्षां अगर ग्रीक महाराष्ट्राच्या पूर्वेकडील राष्ट्रांवर घडून आलेल्या अंमलापेक्षां जास्त मजबूद व जास्त टिकाऊ आहे. ग्रीस अगर रोम ह्यांच्यासंबंधानें अशी गोष्ट घडून आली कीं, उच्च प्रतीची सुधारणा कमी प्रतीच्या सुधारणेस आपलेकडे ओढीत असतां, तत्क्षणींच त्या कमी प्रतीच्या सुधारणेचें वजन जबर होऊन ती उच्च प्रतीची सुधारणा लयास गेली. ग्रीस देशाचा अंमल पूर्वेकडील राष्ट्रांवर बसला खरा, परंतु तो अंमल बसविण्यांत ग्रीस देशाचें वर्चस्व नाहींसें झालें; रोमन महाराष्ट्राचीही तीच स्थिति झाली. सर्व राष्ट्रांवर रोमन नगरवासित्वाचा पगडा बसला. परंतु असें होण्यांत मूळच्या रोमन नागरिकांचीच काय स्थिति झाली ती पहा. परंतु इंग्लडांतून जो गुण बाहेर जाऊन इतर राष्ट्रांस सुधारूं लागला, त्याजमुळें इंग्लंडास मुळींच अपाय घडला नाहीं. मध्यकालीन स्थितींतून वर काढून प्रस्तुत सुधारणेप्रत हिंदुस्थानास आणण्याचा इंग्लंड प्रयत्न करीत असतां, कित्येक वेळां अडचणी व संकटें सोसूनही, हिंदुस्थान

आपल्यास तेथील स्वस्थितीप्रत ओढून घेईल, अशी इंग्लंडास भीति वाटत नाहीं, इतकेंच नाहीं, तर हिंदुस्थानाशीं संबंध झाल्यामुळें इंग्लंडच्या सुधारणेच्या अखंड प्रवाहास कोणताही प्रत्यवाय येईल, अशी धास्ती-ही इंग्लंडास नाहीं.

अशा प्रकारचे हिंदुस्थान देश जिंकला गेल्याचे परिणाम आहेत. असेच परिणाम घडून येतील, असें पुष्कळ वेळपर्यंत कोणास वाटलें नव्हतें. हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याच्या इतिहासांत दोन फार महत्वाचे भाग आहेत. सर्व जगाच्या इतिहासांतही इतके उपयुक्त दुसरे भाग कोठेंच नसतील. पहिला भाग हिंदुस्थानाशीं संबंध झाल्यानें जे वाईट परिणाम इंग्लंडावर घडून यावयाचे ते बंद झाले, हा होय. दुसरा भाग, पुष्कळ वेळपर्यंत झटापट चालून कालांतरानें तरी इंग्रजी सुधारणेच्या अंमलाचा पगडा हिंदुस्थानावर बसला, हा होय. ह्यांपैकीं पहिल्या भागांतील कृत्यें घडत असतां, इंग्लंडांत तिसरा जार्ज राजा राज्य करीत होता. ह्या राजाची कारकीर्द इंग्लंडच्या इतिहासांत संक्रमणकाल ह्मणजे मोठा फेरफार होण्याचा काल या नांवानें प्रसिद्ध आहे. कारण, त्याच वेळीं अमेरिकेंतील मुलूख इंग्लंडचे ताब्यांतून जाऊन हिंदुस्थान देश त्यांचे स्वाधीन झाला. लॉर्ड क्लाइव्ह आणि वार्न हेस्टिंग्म् ह्या दोन प्रसिद्ध पुरुषांच्या कारकीर्दी ह्या प्रकरणांत येतात. सन १७८६ या वर्षी लॉर्ड कार्नवालीस ह्याचे कारकीर्दीस सुरुवात होते, तेव्हां ह्या भागाची समाप्ति झाली. दुसऱ्या प्रकरणांत प्रस्तुतच्या शतकाचीं पहिलीं ४० वर्षे येतात, व त्यांतही विशेष प्रमुखत्व गव्हर्नर जनरल लॉर्ड वुइल्यम् बेंटिंक यांच्या कारकीर्दीस आहे. ज्याप्रमाणें लॉर्ड वेल्स्ली, लॉर्ड हेस्टिंग्स् आणि लॉर्ड दलहौसी हे क्लाइव्हच्या मागून मोठे जेते ह्मणजे प्रदेश जिंकणारे होऊन गेले, त्याचप्रमाणें हेस्टिंग्म्नंतर लॉर्ड कॉर्न-

वालिस आणि लॉर्ड बुइल्यम् बेंटिंक हे विख्यात न्यायव्यवस्थाकार झाले. ह्मणून ज्या अर्थी आपल्यास ह्या सुधारणेचा कसकसा उत्कर्ष होत गेला, हें पाहणें आहे, त्या अर्थी ह्या विद्वान कायदे करणारांनी जें कांहीं केलें असेल, त्याचाच विशेषतः विचार केला पाहिजे.

हिंदुस्थानांतील दुःस्थितीचा परिणाम इंग्लंडावर घडेल, ह्मणून जें प्रथमारंभीं वाटलें होतें, ते परिणाम कोणते व ते कां घडून आले नाहींत, ह्याजबद्दल आतां थोडासा विचार करूं. अठराव्या शतकाच्या सत्तर ऐशीं वर्षांचे सुमारास जे लेख इंग्लंडांत प्रसिद्ध झाले आहेत, त्या सर्वांत अशा प्रकारचा हिंदुस्थानाशीं संबंध घडल्यापासून प्राप्त होणाऱ्या संकटाच्या सूचनेचा स्पष्टपणें उल्लेख केलेला आहे. वॉर्न हेस्टिंग्सूचेविरुद्ध जीं भाषणें बर्क यानें केलीं, त्यांच्यांत तर ह्या भीतीचा उल्लेख अगदीं कळसास पोहोंचल्यासारखा केलेला आढळतो.

हिंदु राजनीतिशास्त्ररूपी अदृष्टपूर्व खड्डयांत इंग्लंडानें एकदम उडी कशी टाकिली, ती पहा. हिंदुस्थानांतील मुसलमान नबाबांच्या दरबारांत जमाबंदीचीं व लष्करी खात्यांत मोठमोठ्या हुद्यांचीं कामें इंग्रज लोक पतकरूं लागले होते. ह्याप्रमाणें मोंगली राजांच्या दरबारांत अशा प्रकारचीं कामें पतकरून जी लूट त्या इंग्रज लोकांस मिळत असे, ती ते विलायतेस नेत असत. ही लूट त्यांना कशी मिळत असे, तें परमेश्वरासच माहीत. परंतु असें करण्यांत इंग्रज लोकांस दोन प्रकारची भीति होती. एक तर हिंदु लोकांच्या संपर्कानें अशीं वाईट कृत्यें करण्याची संवय लागून इंग्रज लोकांची नीतिमत्ता बिघडून जाऊन तिला दुरवस्था प्राप्त होण्याचा संभव होता. कारण, हिंदु लोकांच्या नीतिमत्तेविषयीं ज्यांनीं ह्मणून अगदीं चांगलें मत प्रगट केलें असेल, त्यांनाही हें कबूल असलें पाहिजे, कीं गेल्या शतकांत हिंदु राजनीतींत प्रचंड

अन्याय माजला होता. दुसरें, जे इंग्रज लोक हिंदुस्थानांत जाऊन अपार संपत्ति मिळवून परत इंग्लंडास येत, त्यांच्या विचारांस प्राच्य विचारांचें जबरदस्त वारें लागून ते अगदीं बदलून जात असत. म्हणून अशा गृहस्थांकडून प्रत्यक्ष इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेसही अपाय घडण्याचा संभव होता. पार्लमेंटांतील सभासद निवडण्याची त्या वेळीं चालू असलेली जुनी पद्धत चमत्कारिक होती. पुष्कळ पैसे भरून पार्लमेंटांत प्रवेश करून घेणें फार सोपें असे. ह्यामुळें इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेस मोठा अपाय घडण्याचा संभव होता. शिवाय हिंदुस्थानांतील मोठमोठीं हुद्यांचीं कामें लोकांस वांटून देण्याचा अधिकार सरकारच्या ताब्यांत असल्यानें सरकारच्या हातांत त्या वेळीं ही एक मोठी शक्तिच असे. इंग्लंडांत पार्लमेंट व राजमंडळ ह्यांजमध्यें दुफळी असल्यामुळें हिंदुस्थानांतील हुद्यांचीं कामें वांटण्याचा अधिकार ज्याजकडे जाईल त्याची शक्ति अनावर होण्याचा त्या वेळीं अतोनात संभव होता. इंग्लंडांतील त्या वेळच्या प्रमुख मंडळीस अशा प्रकारची भीति पडली होती; तिचा मासला दाखविण्याकरितां, इ. स. १७८२ ह्या वर्षी वुइल्यम पिट्ट यानें पार्लमेंटाच्या व्यवस्थेंत सुधारणा करण्याविषयीं एक सूचना त्या सभेपुढें आणिली होती, त्यावेळीं त्यानें केलेल्या भाषणांतून एक उतारा आह्मी वाचकांकरितां देतों.— "पार्लमेंटामध्यें ज्या लोकमतानें मुखत्यार निवडले जातात, तें लोकमत देण्याचा अधिकार सर्व लोकांस सारखा नसून फक्त इंग्रजांस मात्र आहे. परदेशस्थ लोकांस हा अधिकार नाहीं. अशा प्रकारचे निवडणुकीचे नियम आपण फार काळजीपूर्वक ठरविले आहेत. तथापि हल्लीं विपरीत प्रकार दृष्टीस पडत आहे. परदेशांतील राजे लोकांस पार्लमेंटांत आपले मुखत्यार पाठविण्याकरितां आपलें मत देण्याचा जरी साक्षात् अधिकार नाहीं, तरी पैसे भरून आपले वतीनें मुखत्यारांचा पार्लमेंटांत

प्रवेश करवून घेण्याची सोय त्यांच्या हातांत आहे. माझें ह्मणण्याचा उद्देश काय आहे, याजबद्दल कोणास फारसा संशय वाटत नसेल. तंजावरचा राजा व आर्कोटचा नबाब ह्मणून हिंदुस्थानामध्यें लहानसे दोन स्वतंत्र राजे आहेत, त्यांचे वतीनें कांहीं गृहस्थ आज आपल्याबरोबर या सभेंत बसले आहेत; ही गोष्ट फार प्रसिद्ध असून, जिकडे तिकडे लोक ह्याचाविषयीं वादविवाद करीत आहेत. तथापि तिजबद्दल लोकांचीं मनें बेपर्वा दिसतात. भरदिवसां आमची अपकीर्ति बाहेर प्रसिद्ध होत आहे. ही इतकी कळसास पोहोंचली आहे कीं, तिजबद्दल आतां लोकांना आश्चर्यही वाटत नाहीं. ग्रेट ब्रिटनमधील निवडणुकींत मत देण्याचा अधिकार असलेल्या कित्येक गृहस्थांनीं केवळ लांच घेण्याचा क्षुल्लक अपराध केला आहे, इतकेंच नाहीं, तर त्यांनीं प्रत्यक्ष राज-द्रोहाचा गुन्हा केला आहे. विश्वासघात करून त्यांनीं आपलीं मतें पर-कीयांस विकलीं आहेत. ही लहानसहान गोष्ट नसून, ती आमच्या लोकांस क्षुल्लक कां वाटावी, हेंच समजत नाहीं. हल्लीं आमच्याबरोबर ह्या सभेंत बसलेले कित्येक गृहस्थ परकीय जुलमी राजांचे ताबेदार आहेत. ह्या सभेमध्यें बसणाऱ्या गृहस्थांच्या मनांत इंग्लिश नीतिमत्ता पूर्णपणें अवगत असे. परंतु आतां तसें नसून भ्रष्ट व सदोष अशा प्राच्य कुनीतीनें तीं मनें कलुषित झालीं आहेत."

अशा प्रकारचे वादविवाद पार्लमेंटगृहांत मोठ्या झपाट्यानें चालत असत. ह्यासंबंधानें ह्याच वेळीं ज्या कित्येक गोष्टी घडून आल्या, त्या येणेंप्रमाणें:—फॉक्स साहेबांचें हिंदुस्थानसंबंधीं बिल्* नापसंत होऊन, कोअलिशन प्रधानमंडळ मोडलें. पिट्ट साहेबांचें हिंदुस्थानसंबंधीं बिल्*

* फॉक्स व पिट्ट यांचीं बिलें:—वार्न हेस्टिंग्सनें जो चतसिंग व बेगमांवर जुलूम केला त्यामुळें इंग्लंडचे लोक त्यावर फार नाखुष झाले. सन १७८१ त दोन कमिट्या हिंदुस्थानच्या कारभाराची व्यवस्था करण्याकरितां नेमण्यांत आल्या. त्यांचे रिपोर्टांत कंपनीवर ताशेरा झाडलेला होता, व वार्न हेस्टिंग्स याला परत बोलावावें, अशी शिफारस होती. ती डिरेक्टरांना मान्य झाली नाहीं. १७८२ त जूट प्रधानमंडळ झाल्या-

पास झालें. वार्न हेस्टिंग्स* ह्याजवर आणलेल्या गुन्ह्यांची चौकशी

वर मि. डंडास यानें एक मसुदा पार्लमेंट सभेपुढें आणिला. त्याचा रोंख असा होता कीं, गव्हर्नर जनरलचा अधिकार वाढवावा. आणि ती जागा कंपनीपासून स्वतंत्र अशा कार्नवालिससारख्या एकाद्या बड्या गृहस्थाला द्यावी.' परंतु हा मसुदा एकपक्षीय होता, अशावर तो रद्द झाला. हा प्रश्न सरकारानें पहावा असा सभेचा अभिप्राय पडल्यावरून फॉक्स साहेबानें आपला एक मसुदा तयार करून, तो सभेपुढें ठेविला. ह्या मसुद्याचें तत्व हें होतें कीं, व्यापार व अधिकार हे एका व्यक्तीच्या ताब्यांत असूं नयेत. त्याप्रमाणें कंपनीचा अधिकार काढून तो सात कमिशनरांच्या हातीं द्यावा, अशी एक शर्त त्यांत होती, व कंपनीची मालमत्ता सरकाराचे स्वाधीन करून व्यवस्था डिरेक्टरांनीं करावी अशा कांहीं शर्ती होत्या. एकंदरीनें हा मसुदा उत्तम होता, परंतु तो कोणास पसंत पडला नाहीं. कारण, त्याप्रमाणें राजाची सत्ता कमी होत असून, व्यापाराची व्यवस्था करण्यासाठीं नवीन सभा नेमावयाची ह्मणजे कंपनीला करून दिलेल्या सनदेच्याविरुद्ध जावें लागत होतें. राजाची सत्ता कमी होत असल्यामुळें त्यानें अंतस्थ खटपटी करून, तो मसुदा नापसंत ठरवून घेतला. १७८२ पुढें १७८३ त वुइल्यम पिट्ट प्रधान झाला. ह्यानें १७८४ त फॉक्स व डंडास ह्यांच्या बिलांच्या धोरणावरच एक मसुदा तयार करून सभेपुढें ठेविला. त्यांत तडजोड केलेली होती. एक बोर्ड आफ कंट्रोल स्थापन करून सर्व राजकीय अधिकार ह्या बोर्डाकडे ठेविला जावा, अशी शिफारस होती, ती पास झाली. येथपासून दोन अंमल सुरू झाले. ते १८५८ तील बंडानंतर जेव्हां हिंदुस्थानचा संपूर्ण अधिकार राजाकडे घेतला गेला, आणि ईस्ट इंडिया कंपनी मोडण्यांत आली, तोंपर्यंत चाललें. ह्या कायद्यानें असें झालें कीं, सर्व व्यवस्था कंपनीच्या नांवानें चाले, व मोठाल्या नेमणुका खेरीज करून बाकी सर्व नेमणुका कंपनीच्याच ताब्यांत असत. असा हा दुरूपी अंमल होता. पण कंपनीचे हक्क कायम ठेवले; तिच्या सत्तेंत फरक झाला नाहीं; बोर्ड आफ् कंट्रोल ही अमात्यमंडळीची सभा असल्यामुळें इंग्लंडांतील अमात्यांच्या अधिकाराच्या मुदतीपर्यंत ह्या बोर्डाची मुदत असे. हें बिल फॉक्सच्या बिलापेक्षां कमी पूर्ण होतें, पण त्यांत तडजोड असल्यामुळें तें पसंत पडलें. ह्या बिलांत आणखी कलमें अशीं होतीं कीं, एतद्देशीय राजांशीं इंग्रजांनीं संबंध ठेवूं नये. किंवा त्यांच्याबरोबर युद्ध करूं नये. गव्हर्नर जनरलचे कौन्सिलाचे सभासद चार होते, ते तीन करण्यांत आले. मद्रास व मुंबई इलाख्यांत त्याप्रमाणेंच कौन्सिलें करण्यांत आलीं, कंपनीच्या कोणत्याही नोकरानें कोणत्याही एतद्देशीय राजाशीं द्रव्यव्यवहार ठेवूं नये, असें ठरविण्यांत आलें.

* वार्न हेस्टिंग्स हा १७३२ त जन्मला. तो हिंदुस्थानांत १७५० त आला. सुराज उद्दौल्यानें कासिमबाझार येथें जे इंग्रज लोक कैद केले होते, त्यांत तो धरला

सुरू झाली. लॉर्ड कॉर्नवालीस ह्यांस हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल नेमण्यांत येऊन, त्यांनीं हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत कित्येक मोठमोठे फेरफार केले. ह्या गोष्टीचें महत्व पूर्णपणें लक्षांत बाळगिलें पाहिजे. ह्या ठिकाणीं फक्त त्यांची नांवनिशी मात्र दिली आहे. आतां त्यांजपासून कोणकोणते परिणाम घडून आले, हें येथें सांगणें अवश्य आहे. तपशिलवार हकीगत पाहिली तर असें दाखवितां येईल कीं, फॉक्स साहेबांनीं पार्लमेंटापुढें आणलेल्या हिंदुस्थानसंबंधीं बिलाच्या विरुद्ध एवढा मोठा गवगवा करण्यांत बरीच चूक होती. तसेंच वार्न हेस्टिंग्स ह्याज-

---

गेला होता. तो क्लैव्ह याजकडे पळून गेला, व त्याजजवळ नोकरीस राहिला. पुढें तो कलकत्त्याच्या कौन्सिलाचा सभासद झाला. १७६४ त तो परत स्वदेशीं गेला. तो बहुत संभावित होता. बंगाल्यांत जेव्हां १७७१ त दुष्काळ पडला, राज्यकारभारांत अव्यवस्था झाली, प्रजा त्रस्त झाली, त्या वेळीं ह्याला गव्हर्नर करून पाठविलें. त्यानें आल्यावर दोन वर्षें सर्व अव्यवस्था काढून टाकण्यांत घालविलीं. १७६५ त क्लैव्हनें बादशहाशीं अशी व्यवस्था केली होती कीं, बंगाल, बहार, ओरिसा ह्या प्रांतांची व्यवस्था इंग्रजांनीं ठेवावी, व त्याबद्दल बादशहाचें संरक्षण इंग्रजांनीं करावें, व सव्वीस लाख रुपये बादशहाला द्यावे. ह्या व्यवस्थेनें त्या प्रांतावर दोन सरकारचा अंमल सुरू झाला. ह्या द्विस्त अंमलाला इंग्रजींत 'डबल गव्हर्नमेंट' ह्मणतात. न्यायमनसुबा व जमाबंदी हीं कामें एतद्देशीय अधिकाऱ्यांकडे ठेवण्यांत आलीं. हे अधिकारी नवाबाच्या नांवावर, रयतेवर हवातसा जुलूम करीत. वरील कामांवर अधिकारी एतद्देशीय असून देशरक्षणार्थ फौज इंग्रजांची असे. एतद्देशीय अधिकारी रयतेवर जुलूम करीत आणि इंग्रजी खजिन्यांत जोंपर्यंत ते भरपूर पैसे आणून टाकीत, तोंपर्यंत ते दिवाणी कामांत लक्षच देत नसत. कंपनीचे नोकर आपापली तुंबडी भरूं लागले व तिजोरीची कमताई होऊं लागली. अशी दुर्व्यवस्था ह्या द्विस्त अंमलानें होत असे, ती ह्या हेस्टिंग्सनें काढून टाकली. एतद्देशीय अधिकाऱ्यांच्या हातांतून सर्व राज्यकारभार काढून घेतला. जमाबंदीचें काम इंग्लिश कलेक्टरांकडे सोंपविलें, व प्रत्येक जिल्ह्यांत दिवाणी व फौजदारी कोर्टांचे त्यांना वरिष्ठ अधिकारी नेमिलें. सदर दिवाणी अदालत व निझामती अदालत ह्मणजे वरिष्ठ फौजदारी कोर्ट अशीं दोन अपिलाचीं कोर्टें त्यानें स्थापिलीं. आणखी बारीकसारीक पुष्कळ सुधारणा त्यानें केल्या. ह्यामुळें हेस्टिंग्स याला अतिशय मान देण्यांत येत आहे. १७७४ त बनारस येथें सुराज [illegible]बरोबर त्यानें तह केला. रोहिलखंडावर स्वारी करून तें खालसा केलें.

वर एवढा जबरदस्त गहजब गुदरला, त्यांतही चूक नव्हती असें. नाहीं. तसेंच पिट्ट साहेबांचें हिंदुस्थानसंबंधीं द्विविध व्यवस्थेचें जें बिल् पुढें पसार झालें, त्याजवरही टीका करण्यास पुष्कळ जागा आहे. तरी ठोकळ मानानें पाहतां हें कबूल केलें पाहिजे कीं, ज्या कारणांनीं हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेसंबंधीं इंग्लंड देश धोक्यांत पडण्याचा संभव होता, तीं संकटें पिट्ट साहेबांच्या बिलानें सुरेख रीतीनें दूर झालीं. लॉर्ड कार्नवालिस ह्यांचें सर्व इंग्लिश राष्ट्रानें आभारी असलें पाहिजे. तसेंच एड्मंड बर्क* याची कीर्ति अजरामर होणें अगदीं योग्य आहे. अशा प्रकारचीं त्या व्यक्तिद्वयाचीं कृत्यें होतीं. लॉर्ड कार्नवॉलिस ह्यांच्या

ह्याप्रमाणें १७७४ पर्यंत सर्व सुधारणा केल्यावर १७७३ त पास झालेल्या रेग्युलेटिंग कायद्याप्रमाणें तो गव्हर्नर जनरल झाला. त्या वेळेपासून तों १७८५ पर्यंत त्याचा बहुतेक काळ हैदरअल्लीबरोबर लढाया करण्यांत गेला. ह्या युद्धांत पोलिलोर, पोर्टोनोव्हो, वांदिवाश, शोलिंगड व आर्नी अशा मोठाल्या लढाया झाल्या. त्या वेळीं सर हेक्टर मन्रो, कर्नल बेली, व सर आयर कूट सारखे शूर सरदार होते. १७८१–८३ पर्यंत डच लोकांशीं संग्राम झाला.

ह्याच्या कारकीर्दीत ह्याला त्याच्या कौन्सिलामुळें फार त्रास भोगावा लागला. त्या कौन्सिलांत सर फिलिप फ्रान्सिस ह्मणून एक सभासद होता, तो त्याचा शत्रु होता. हेस्टिंग्सच्या कारकीर्दीत फार ठळक गोष्टी ह्मणजे नंदकुमार नामक ब्राह्मणाला फांशीं दिलें, रोहिलखंडावर विनाकारण स्वारी करून त्याची दुर्दशा केली, हैदरअल्लीवर स्वारी करण्याकरितां पैशासाठीं बनारसचा राजा चेतसिंग ह्यावर जुलूम केला, तसेंच औधच्या बेगमांना लुटलें, ह्या होत. ह्यावरूनच त्याच्यावर मोठे दोषारोप ठेवून पार्लमेंटांत त्याची चौकशी १७८८ पासून १७९५ पर्यंत चालली होती. त्याच्या विरुद्ध त्याचे वादी बर्क, शेरिडन, वुइंढ्याम हे होते. हेस्टिंग्स शेवटीं दोषमुक्त झाला. हेस्टिंग्सनें १७८५ त आपल्या जागेचा राजिनामा दिला.

* हा इंग्लंडांत प्रख्यात मुत्सद्दी होता. हा मोठा वक्ता असून वजनदार ग्रंथकारही होता. वार्न हेस्टिंग्सवर काम चालविण्याचा सर्व पुढाकार त्यानेंच घेतला असून. त्यां कामीं तो सात वर्षें सतत भांडत होता, (१७९१–१७९७).

कारकीर्दीत, हिंदुस्थानच्या कंपनीच्या राज्यकारभारांत राज्यकर्त्यांवर जे अनीतीचे आरोप आले होते, ते ह्या वेळेपासून खरोखर एकदम नाहींसे झाले. कधींही अविस्मरणीय असा एक राज्यव्यवस्थेचा उत्तम धडा सर्व गव्हर्नर जनरलांस लॉर्ड कार्नवालिस ह्यांनीं घालून दिला. हिंदुस्थानाशीं संपर्क झाल्यामुळें इंग्लंडची राजनीति बिघडण्याचा जो संभव होता, तोही त्याच वेळीं नाहींसा झाला.

अशा प्रकारें हिंदुस्थानच्या स्वामित्वामुळें प्रत्यक्ष इंग्लंडावर येऊन पडणारीं संकटें तर दूर झालींच. परंतु इंग्लंडांतील राजनीतीचे परिणाम हिंदुस्थानावर घडवून आणण्याचा इंग्लंडचा किती हक्क होता, हें आतां पाहणें आहे. हिंदुस्थानच्या व इंग्लंडच्या सुधारणेंत फारच अंतर आहे, हें कोणासही कबूल केलें पाहिजे. त्यांतही इंग्लंडची सुधारणा उच्च प्रतीची आहे, असें प्रत्येक इंग्रज मनुष्यास वाटल्याशिवाय राहणार नाहींच. परंतु इंग्रजांनीं आपले ग्रह हिंदु लोकांच्या मनावर वठविण्यास इंग्रजांचा काय हक्क आहे? इंग्रजांचा धर्म खिस्ती आहे; त्यांच्या तत्वज्ञानाच्या कल्पनाही निराळ्या आहेत; त्यांचे इतिहास, त्यांचें शास्त्र हीं सर्व निराळीं आहेत. परंतु सरकारी नात्यानें ह्या सर्व गोष्टी हिंदु लोकांपासून अगदीं बाजूस ठेवणें हेंच इंग्रज लोकांचें हिंदुस्थानसंबंधीं कर्तव्य नव्हे काय? प्रथमारंभीं तर हीच गोष्ट लोकांस पसंत वाटली होती. रोम येथील सरकारानें आपल्या सर्व राष्ट्राच्या संबंधानें ज्या गोष्टी केल्या, त्या गोष्टी इंग्लंडानें हिंदुस्थानसंबंधीं करणें उचित आहे, असें कोणास त्या वेळीं वाटलें नाहीं. स्वतःच्या राजनीतीचीं तत्वें एका बाजूस ठेवून हिंदुस्थानांतील चालत असलेल्या रीतीप्रमाणें हिंदुस्थानावर राज्य करावें, हें प्रथमारंभीं सर्वांस पसंत होतें. हेंच मत पसंत होण्याचें कारण असें होतें कीं, इंग्लंडांतून जे गृहस्थ प्रथमारंभीं हिंदुस्थानावर

राज्य करण्यास आले, त्यांच्या नजरेस संस्कृत भाषेचें अगाध व तावत्-काळपर्यंत गुप्त असें भांडर प्रथम आलें. त्या गृहस्थांस असें वाटलें कीं, संस्कृत भाषेत तत्वज्ञानाचें पूर्ण विवेचन व काल्पनिक इतिहास उपलब्ध आहेत. ह्यामुळें त्यांच्या कल्पनांस, जणूं काय, ब्राह्मणत्व प्राप्त झालें. अशा प्रकारें ब्राह्मणत्व प्राप्त झालेल्या कल्पना प्राच्य मंत्रांनीं भारलेल्या वर्तुलाकार मर्यादेंत समाविष्ट झाल्यामुळें पाश्चिमात्यांच्या ख्रिस्ती धर्माच्या व इतर विद्वत्तेच्या कल्पनांस त्या मर्यादावर्तुलांत जागा देण्याचें ते कबूल करीनात.

हें प्रकरण आतां समाप्त होत आलें आहे, ह्मणून आतां जास्त विवेचन न करितां, हें वरील मत हळू हळू नाहींसें होऊन त्याच्या ठिकाणीं त्याच्या उलट मतास कसकशी पुष्टि येत गेली, हें थोडक्यांत दाखविण्याचा आतां यत्न कर्तव्य आहे. इंग्रज लोकांनीं हिंदु विचारांप्रमाणें हिंदुस्थानचें राज्य करणें सोडून देऊन ते मोठे शिक्षक व सुधारक प्रसिद्धपणें बनले. हा राजनीतींत फरक सन १८१३ मध्यें प्रथम झाला. त्या वेळीं ईस्ट इंडिया कंपनीची सनद वाढवून देण्यांत येऊन हिंदुस्थानांतील लोकांस विद्या, उपयुक्त कलाकौशल्य, व पाश्चिमात्यांचें शास्त्र शिकविण्याकरितां एक मोठी रक्कम खर्च करण्याचें ठरलें. हा ठराव झाल्यावर ह्यासंबंधानें एक विद्यामंडळी (एज्युकेशन कमिटी) नेमण्यांत आली. तिचें काम हळू हळू सुमारें २० वर्षें चाललें होतें. त्या वेळीं मोठा प्रश्न असा निघाला कीं, विद्या आणि शास्त्र हीं पाश्चिमात्यांच्या कल्पनांप्रमाणें शिकवींवा किंवा कसें; ह्मणजे हिंदु लोकांस इंग्रजी भाषा शिकवावी, किंवा इंग्रजी न शिकवितां संस्कृत किंवा अरबी भाषा शिकवावी ?

ह्या भूतलावर वरील प्रश्नाइतका महत्वाचा दुसरा प्रश्न वादवि-

वादाकरितां पुढें आला नसेल. इ. स. १८३५ या वर्षी लॉर्ड वुइल्यम् बेंटिंक गव्हर्नर जनरल असतां, वरील प्रश्नावरील वादविवाद अगदीं कळसास पोहोंचला. असा कांहीं चमत्कारिक योग घडून आला कीं, त्यावेळीं एक मोठा विद्वान गृहस्थ पुढें येऊन त्यानें वरील वादास पुष्कळ मदत करून पूर्वी चाललेल्या वादाचाही पूर्णपणें विचार केला, व आपलें एक कायम मत ठरवून प्रसिद्ध केलें. हा गृहस्थ सर्वांस माहीत असेलच. हा लॉर्ड मेकाले होय. यानें या विषयावर एक लांबलचक निबंध लिहून काढला. त्यामुळें वरील गूढ प्रश्नाचें निराकरण होऊन हिंदु लोकांस इंग्रजीच भाषा शिकविण्याचा ठराव झाला. हा ठराव कोणत्या स्वरूपाचा आहे, हें स्पष्ट समजण्याकरितां वाचकांनीं मेकाले साहेबांचा निबंध अगर सर सी. ट्रिव्हेलियन यांनीं "हिंदुस्थानचें शिक्षण" ह्या विषयावर केलेला ग्रंथ वाचावा. ह्या वेळीं एक विलक्षण चूक त्या वेळच्या मुत्सद्यांच्या हातून घडली, ती मात्र वरील ग्रंथ वाचतांना वाचकांनीं ध्यानांत ठेविली पाहिजे. त्या वेळीं विवेचन केलेला प्रश्न इतकाच होता कीं, हिंदु लोकांस संस्कृत किंवा अरबी भाषा शिकवणें चांगलें, कीं इंग्रजी भाषा शिकविणें चांगलें? ह्मणजे, जणूं काय, ह्या तीन भाषांशिवाय दुसऱ्या भाषाच शिकविण्याजोग्या नव्हत्या. ह्या तीनही भाषा हिंदुस्थानांतील सर्व रहिवाशांस अगदीं अपरिचित आहेत. अरबी आणि इंग्लिश तर परकीयच आहेत. ज्याप्रमाणें युरोपीय लोकांस लाटीन भाषा, त्याचप्रमाणें हिंदु लोकांस संस्कृत भाषा होय. जरी हिंदुस्थानांतील प्रचारांत असलेल्या बहुतेक भाषा संस्कृत भाषेपासून निघाल्या आहेत, तरी ही संस्कृत भाषा हल्लीं प्रचारांत उपयुक्त नाहीं. ह्या भाषेचा लय लाटीन भाषेच्याहीपूर्वी पुष्कळ दिवस झाला. इ. सनाचे पूर्वी तीनशें वर्षांपासून संस्कृत भाषा प्रचारांतून गेली. ज्याप्रमाणें लाटीन

भाषेंतील 'व्हीडा' व 'साना ज्ञारो' वगैरे काव्यें भाषा प्रचारांतून गेल्यानंतर रचण्यांत आलीं आहेत, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत धर्म व तत्वज्ञानसंबंधीं बहुतेक लेख व मुख्य मुख्य काव्येंही संस्कृत भाषा प्रचारांतून गेल्यावर विद्वान लोकांनीं फार परिश्रम करून त्या भाषेंत लिहिलीं. संस्कृत भाषा नको ह्मणण्यांत मेकाले यांस प्रयास पडले नाहींत. कारण, त्यांना असें दाखवितां आलें कीं, इंग्रजी भाषेंतील काव्येंसुद्धां संस्कृतांतील काव्यांप्रमाणेंच सुंदर आहेत. तत्वज्ञान, शास्त्र आणि इतिहास तर संस्कृत भाषेच्यापेक्षां पुष्कळपट चांगले आहेत. परंतु फक्त प्रचारांतून गेलेल्या भाषाच विवेचनांत घेण्यास ह्यांस काय कारण होतें? पंचवीस कोटी लोकांस इंग्रजी भाषा शिकविणें मेकाले साहेबांस खरोखरी कसें शक्य वाटलें असेल, तें असो. कदाचित् सर्वांसच इंग्रजी भाषा शिकविण्याचें त्यांचे मनांत नसेल; थोडक्यांसच इंग्रजी ज्ञान शिकवून तयार करावें, असें त्यांस वाटलें असेल. प्रचारांतून गेलेल्या लाटीन, ग्रीक वगैरे भाषांचा त्यांनीं चांगला अभ्यास केला असल्यामुळें त्यांस असेंही वाटलें असेल कीं, अशा प्रचारांतून गेलेल्या भाषा शिकणें हें विद्वत्तेस अगदीं जरूरच आहे. परंतु खरोखरीच जर हिंदु लोकांस विद्वान करण्याचा सरकारचा उद्देश होता, तर हा उद्देश इंग्रजी व संस्कृत ह्यांच्या द्वारें तडीस जाणारा नव्हता; तर तो तडीस जाण्यास मुख्य साधन हिंदुस्थानी, हिंदी, बंगाली, वगैरे देशी भाषा होत. परंतु तत्वज्ञान अगर शास्त्रीय विषय शिकविण्यास या देशी भाषा अगदीं अयुक्त आहेत, असें कदाचित् भलतेंच मत मेकाले यांचें होऊन, त्यांजबद्दल त्यांनीं आपल्या लेखांत विचार केला नाहीं. परंतु इंग्रजी भाषेस अनुकूल असे जे विचार त्यांनीं पुढें आणिले, ते, ह्या देशी भाषांपासून जे फायदे घडून येणारे होते, त्यांजपुढें अगदीं निष्फळ झाले असते.

एवढी मोठी चुकी झाली ती पुढें लोकांस दिसूनही आली व सर चार्लस वूड यांणीं इ० स० १८५४ या वर्षी एकंदर हिंदुस्थानांतील शिक्षण ह्या विषयावर पूर्ण हकीकत लिहून पाठविली, तेव्हांपासून ह्या चुकीची थोडथोडी दुरुस्तीही झाली आहे. तरी मेकालेच्या त्या निबंधानें शिक्षणाच्या संबंधांत जो ठराव करण्यांत आला, तोच इंग्रजी राष्ट्राच्या इतिहासांत हिंदु सुधारणेचा पाया अशी एक मुख्य मर्यादा होऊन बसला आहे. त्या ठरावाच्या पूर्वीच्या व पश्चात्च्या ऐतिहासिक गोष्टींस त्यानें अगदीं विभागून टाकिलें आहे. युरोपच्या संबंधानें जें कर्तव्यकर्म रोमन शहरास करावें लागलें, तेंच हिंदुस्थानचे संबंधानें आपलें कर्तव्यकर्म आहे, असें इंग्रजांस स्पष्ट व पूर्णपणें कळून आलें. हें कर्तव्यकर्म सामान्य होतें, असें कोणी समजूं नये. एका राष्ट्रास दुसऱ्या राष्ट्राचे संबंधानें जीं कांहीं कृत्यें करणें अवश्य असतील, त्या सर्वांत इतकें महत्वाचें कर्तव्य दुसरें कोणतेंही नाहीं.

प्रकरण सहावें.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश विजयाचीं स्थित्यंतरें.

इतका वेळ आमच्या वाचकांपुढें जें विवेचन आह्मीं केलें, त्याचा निष्कर्ष इतकाच निघतो कीं, हिंदुस्थानाचे संबंधानें इंग्रज लोकांकडून ज्या कित्येक गोष्टी घडून आल्या, त्यांचीं कारणें सामान्यतः लोक मानतात त्यापेक्षां कमी अद्भुत आहेत. कदाचित् त्यांच्या परिमाणांच्या संबंधानें त्या, लोक मानतात त्यापेक्षां जास्तच अद्भुत असतील. त्यांजपासून पुढें जे कित्येक परिणाम घडून आले व येत आहेत, ते तर फारच अद्भुत आहेत, असें ह्मणावें लागतें. परंतु ह्या सर्व कृत्यांत अद्भुततेचा लेश नाहीं असें दाखवितांना, हिंदुस्थानांतील इंग्रज लोकांच्या विजयाचें एक अति महत्वाचें विशिष्ट स्वरूप सर्वांनीं पूर्णपणें लक्षांत ठेविलें पाहिजे, असें आह्मीं मागें सांगितलें आहे. तें असें कीं, ज्या साधनांनीं हिंदुस्थानाचा इंग्लंडाशीं संबंध चिरकाल जडला आहे, तीं साधनें फारच क्षुल्लक आहेत. ह्या गोष्टीच्या संबंधानें हिंदुस्थानाचें व इंग्लंडच्या इतर वसाहतींचें बरेंच साम्य आहे. तरी दोहोंत अंतर नाहींसें नाहीं. वसाहतींतील लोकांवर त्यांचेंच स्वराज्य चालत आहे. आपली राज्यव्यवस्था कोणत्या प्रकारची असावी, हें त्यांच्या मर्जीवर आहे. आपल्यांतूनच कोणास तरी ते राज्य चालविण्याचा अधिकार स्वतःचे मुखत्यारीनें देतात. परंतु हिंदु लोकांस असा स्वतंत्र अधिकार नाहीं. हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलचाही अधिकार स्वतंत्र नाहीं. सेक्रेटरी आफ् स्टेट्चा त्याजवर ताबा आहे. असें आहे, तरी दोहोंमध्यें हें एक साम्य आहे कीं, ज्याप्रमाणें वसाहतींच्या राज्यव्यवस्थेचा उपसर्ग इंग्लंडास पोहोंचत नाहीं, त्याप्रमाणेंच हिंदुस्थानचा संपर्क इंग्लंडास बाधा करीत नाहीं.

इंग्लंडच्या राजनीतीपासून हिंदुस्थानची राजनीति इतकी विभक्त राहते कीं, दोहोंचा कधींही मिलाफ होत नाहीं, इतकेंच नाहीं, तर हिंदुस्थान ताब्यांत असल्यामुळें इंग्लंडच्या राजनीतींत कोणत्याही प्रकारचा फेरफार होत नाहीं, किंवा त्या राजनीतीच्या अप्रतिहत व्यापारास कोणत्याही प्रकारचा अडथळा येत नाहीं. वमुलाच्या व राजनीतीच्या संबंधानें हिंदुस्थान एक स्वतंत्र राष्ट्रच आहे. बलाढ्य मोंगलांचें विस्तृत राज्य हिंदुस्थानांत आजपर्यंत जर अव्याहत चाललें असतें, तर परराष्ट्रांशीं व्यवहाराच्या संबंधानें इंग्लंडच्या इतिहासांत फार फरक पडला असता खरा. फ्रान्सबरोबर ज्या कित्येक लढाया झाल्या, त्यांचें स्वरूप भिन्न झालें असतें, विशेषेंकरून ज्या लढाईमध्यें नेपोलियन बोनापार्ट यानें ईजिप्ट देशावर स्वारी केली, त्या लढाईचा तरी परिणाम अगदीं भिन्न झाला असता. तसेंच, क्रिमियामध्यें जें युद्ध* झालें, तें होण्याचा प्रसंग आला नसता. तदनंतर टर्की व रशिया यांचें जें युद्ध जुंपलें, त्यासंबंधानें इंग्रजांस

* क्रिमियांतील युद्ध.–१८५४–१८५६–ही लढाई रशिया व तुर्कस्थान ह्यांजमध्यें जेरुसलेम येथील पवित्र जागेंतील यात्रेकरू लोकांना वागविण्याच्या भांडणावरून उत्पन्न झाली. ग्रीक चर्चचा मुख्य जो रशियाचा बादशहा निकोलस ह्यानें तुर्कस्थानांत सैन्य पाठविलें. ह्या दोन देशांतील इतर प्रश्नांचा निकाल अद्यापि व्हावयाचा होताच. तुर्क लोक मूर्ख होते व रशियन लोक हेकेखोर होते. ग्रेट ब्रिटन आणि फ्रान्स ह्यांनीं तुर्क लोकांची बाजू धरिली. तुर्कांचा जर पराभव झाला, तर रशियन युरोपच्या दक्षिणेंत फार प्रबल होतील, अशी त्यांना भीति पडली. लढाईसाठीं जमलेलें सैन्य बलगेरियाचें बंदर वार्ना येथें येऊन दाखल झालें; परंतु डान्युबवरून आपलें रक्षण करण्याचें सामर्थ्य तुर्कांना होतें, सबब सदरहू सैन्यास त्या ठिकाणीं येण्याचें कारण नव्हतें. नंतर त्यांनीं काळ्या समुद्रांतील रशियाची सत्ता नाहींशी करण्याचा निश्चय करून लढाऊ जहाजें तिकडे नेलीं आणि त्या समुद्रांतील रशियाचें बंदर ओडेसा ह्यावर हल्ला करण्याची सुरुवात केली. आडमिरल सर चार्लस जान नेपियर ह्यानें दुसरें आरमार घेऊन बाल्टिक समुद्राकडे कूच केलें. हें युद्ध जमीन आणि समुद्र दोहोंवरही चालून आल्मा, इंकरमन, बालाक्लव्ह वगैरे ठिकाणीं निकराचीं युद्धें होऊन त्यांत विशेषतः रशियाचें बरेंच नुकसान झालें. एकंदरानें चोहोंकडे रशियन लोक अगदीं बल-

इतकी काळजी वाहण्याचें प्रयोजन पडलें नसतें. तथापि इंग्लंड देशाच्या अंतरराज्यव्यवस्थेंत मुळींच फरक पडला नसता. तसेंच इंग्लंडचा अंतरितिहासही सर्व आहे तसाच घडून आला असता. भिन्नता केवळ परराज्यव्यवहारांत घडून येती. हिंदुस्थानाच्या संबंधानें प्रत्यक्ष इंग्लंडांत उपसर्ग पोंचल्याचे प्रसंग एकदोनच आहेत. इ. स. १७८३ या वर्षी पार्लमेंट सभेंत हिंदुस्थानसंबंधीं निकराचे वादविवाद चालू होते. त्यावेळीं सर्व राजकीय विषयांमध्यें विशेषतः हिंदुस्थानाकडेसच सर्व लोकांचें लक्ष गुंतून गेलें होतें. इ. स. १८५७ च्या बंडाच्या वेळींसुद्धां सर्व लोकांच्या अंतःकरणवृत्ति जरी अगदीं क्षुब्ध झाल्या होत्या, तरी हिंदुस्थानांत घडून आलेल्या प्रकारांमुळें इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेंत कोणत्याही प्रकारचा फेरफार घडून आला नाहीं.

यावरून हिंदुस्थानचें स्वामित्व इंग्रजांच्या हातांतून गेलें, तर त्याजपासून फक्त राजकीय विषयांच्या संबंधानें लागलेच घडून येणारे परिणाम फारसे मोठे असणार नाहींत. त्याजमुळें हल्लींच्या स्थितींत फरक इतकाच होईल, कीं हिंदुस्थानसंबंधीं सेक्रेटरीचें आफीस मोडावें लागेल, पार्लमेंट सभेचें थोडेंसें काम कमी होईल, व परदेशाशीं व्यवहार चालविण्यामध्यें इंग्लिश लोकांच्या काळजीचें बरेंच ओझें कमी होईल. परंतु ह्याशिवाय विशेष जरूरीचें दुसरें कांहींच घडून येणार नाहीं. ह्याच गोष्टीच्या संबंधानें हिंदुस्थानचें व इतर वसाहतींचें साम्य आहे, असें आह्मी सांगतों; व ह्या पुस्तकाचा विषय जो इंग्लंड देशाचा विस्तार तो वसाहतींच्या संबंधानें ज्या नियमास अनुसरून झाला, तोच नियम हिंदु-

---

हीन होऊन गेले व शेवटीं त्यांनीं शांततेकरितां तह केला. ह्याप्रमाणें लढाईचा शेवट सन १८५६ च्या मार्च महिन्यांत पारिसच्या तहानें झाला. तेणेंकरून कांहीं वर्षें पावेतों तुर्कांना शांतता प्राप्त झाली. ह्या लढाईमुळें ब्रिटिश सरकारच्या राष्ट्रीय कर्जांत आणखी ५ कोटी पाऊंड कर्जाची भर पडून वीस हजारांपेक्षां जास्त लोक मारले गेले.

स्थानासेंही लागू आहे, असें दिसून येईल. वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, जशी एखाद्या शरीराची वृद्धि व्हावी, तशा प्रकारचा हा विस्तार नाहीं, असें प्रथम दर्शनीं दिसेल. एखादा मनुष्य प्रथम लहानसा मुलगा असून, पुढें भव्य पुरुष बनतो; परंतु असा धिप्पाड पुरुष बनल्यावर त्याचें मूळचें मुलाचें स्वरूप दृष्टोपत्तीस येत नाहीं. मूळचें मुलाचें स्वरूप कायम राहून, त्याजवर जास्त भर पडून, भव्य पुरुषरूपी दुसरेंच स्वरूप बनतें, असें नाहीं. ह्मणजे मूळच्या स्वरूपावर जेवढी जास्त भर पडली असेल, तेवढी काढून टाकिली असतां, पुनः मुलाचें स्वरूप कायम राहील, असें नाहीं. परंतु वसाहतींची गोष्ट अशी नाहीं. ज्या प्रकारची मनुष्याची वाढ नाहीं ह्मणून सांगितलें, त्याच प्रकारची इंग्लंड देशाची वाढ आहे. कारण, नवीन भर पडलेले मुलूख तोडून टाकिले, तरी ग्रेट ब्रिटिनमध्यें मूळचा इंग्लंड देश स्पष्टपणें कायम राहील. स्वतःच्या संबंधानें पूर्णत्वास आलेलें असें त्याचें स्वरूप यत्किंचितूही न बिघडतां जशाचें तसेंच कायम राहील. हल्लींही स्वतःच्या संबंधानें वसाहती व हिंदुस्थान देश ह्यांचा आपल्यामध्यें समावेश करून सर्व मिळून आपलें एकच स्वरूप आहे, असें मानण्याची संवयही इंग्रज लोकांस नाहीं.

टर्गो ह्मणून फ्रान्स देशामध्यें एक विख्यात मुत्सद्दी होऊन गेला. त्यानें वसाहतीस फळाची उपमा दिली आहे. फळ पिकेपर्यंत झाडावर कायम राहतें. त्याचप्रमाणें वसाहतींची स्थिति असते. इंग्रजांच्या ताब्यांतील सर्व प्रदेशांस मिळून एका व्यक्तिमात्राची उपमा न देतां, एका कुटुंबाची उपमा देणें कदाचित् सुयुक्तिक दिसेल. एलिझाबेथ राणीच्या वेळेस जें इंग्लंडरूपी एक कुटुंब होतें, तेंच हल्लीं निरनिराळ्या द्वीपांतरीं पसरलें आहे. ह्या कुटुंबांत पुष्कळ भरभराटीस येणाऱ्या वसाहतींचा समावेश

होतो. परंतु त्यांत अशी एक व्यक्ति जन्मास आली, कीं ती व्यापार चालवीत असतां, त्या कामांत सुदैवेंकरून एका मोठ्या देशाचें स्वामित्व बळकावून बसली. अशा प्रकारें अतिशयोक्तीनें वर्णन करण्यास फारसा प्रत्यवाय नाहीं. परंतु जोंपर्यंत ही केवळ उपमाच आहे, व वाक्-कौशल्येंकरून ह्या भाषेचें उपमेचें स्वरूप जाऊन, तिला खरें स्वरूप प्राप्त होत नाहीं, तोंपर्यंतच त्या उपमेचा उपयोग करण्यास हरकत नाहीं. हल्लींच्या समाजस्थितीवरून असें दिसून येतें कीं, कुटुंबाचा कल नेहमीं विभक्त होण्याकडे असतो. जोंपर्यंत मुलें लहान असतात, तोंपर्यंत त्यांच्यांत निकट ऐक्यभाव असतो. परंतु कांहीं वेळानें हा ऐक्यभाव जाऊन, त्यांच्यामध्यें फक्त साधारण स्नेहभाव राहतो. जसजसे ते ज्यास्ती मोठे होत जातात, तसतसा हा स्नेहभावही अगदीं कमी होतो. शेवटीं मुलगे मोठे झाले ह्मणजे उदरनिर्वाहाच्या उद्योगधंद्याकरितां निरनिराळ्या दिशे-कडे जातात. मुली असतील त्यांचीं लग्नें होऊन, त्या आपापल्या घरीं जातात. असें झालें ह्मणजे त्या कुटुंबांतील कायमचा संबंध व स्नेहभाव अगदीं नाहींसा होऊन जातो. प्रस्तुतची समाजस्थिति अशी आहे. ह्यावरून सर्व ब्रिटिश राष्ट्राला कुटुंबाची उपमा पाहिजे तर द्यावी. परंतु कुटुंबाला ही जी स्थिति केवळ हल्लींच्या विशिष्ट समाजव्यवस्थेमध्यें मात्र प्राप्त होते ती कौटुंबिक स्थिति भिन्न समाजव्यवस्थेमध्यें नेहमींच कायम राहील, असें नाहीं. मग अशा प्रकारें कुटुंबाच्या संबंधानेंही जी स्थिति अनिश्चित असणार, तीच कुटुंबाचें उपमेय जें विस्तृत राष्ट्र त्याची होईल, असें आपण पूर्ण विचार केल्याशिवाय गृहीत घेतां कामा नये. कुटुंब विभक्त होण्यास जीं कारणें जितक्या अंशानें पुरीं असतात, तीं कारणें तितक्या अंशानें राष्ट्र विभक्त होण्यास पुरत नाहींत. ह्याशिवायही आणखी अशी एक गोष्ट ध्या-नांत ठेविली पाहिजे कीं, ह्या विभक्तीकरणाच्या कामांत तीं कारणें पूर्व-

काळीं जितकीं लागू पडत असत, तितकीं आज लागू पडतील, असें नाहीं. फ्रान्समध्यें टर्गो हा मुख्य प्रधान असतां, अमेरिकेंतील इंग्रज लोक इंग्लंडपासून स्वतंत्र झाले. तेव्हां वरील उपमेमध्यें पुष्कळ साम्य होतें. एखादा मुलगा घर सोडून दूर देशीं गेला, ह्मणजे वस्तुतः तो कुटुंब सोडून गेला, असेंच होत असे. ह्मणून परदेशामध्यें असलेल्या वसाहतींस अशा मुलाची उपमा देणें शोभत असे. परंतु आजची समाजस्थिति बरीच बदलली आहे. वाफेचे व विजेचे शोध लागून, अतिशय दूर अंतरावरच्या दोन देशांमध्येंसुद्धां निकट संबंध असण्याची सोय चांगली झाली आहे. ह्या नवीन शोधांनीं रशिया आणि युनायटेड् स्टेट्स् ह्यांजमध्यें तर समाजस्थिति पूर्वींच्याहून अगदींच भिन्न झाली आहे.

इंग्लंडचा वसाहतींशीं व हिंदुस्थानाशीं आजपर्यंतचा संबंध फार सूक्ष्म आहे; ह्या गोष्टीवरून उघड दिसणारा विभक्तपणाचा सिद्धांत आपण एकदम काढतां कामा नये. तर हा सिद्धांत काढण्यापूर्वीं वर सांगितलेली गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. प्रथमारंभीं वसाहतींचा इंग्लंडाशीं संबंध फार कमी असल्यामुळें अमेरिकेंतील वसाहती स्वतंत्र झाल्या ही गोष्ट घडून येणें त्या वेळीं चालू असलेल्या वस्तुस्थितीवरून जरी साहजिक होतें, तरी हा उभयतांमधील संबंध दिवसेंदिवस कमी कमी होत नसून, उलट हळू हळू जास्त निकट व मजबूत होत चालला आहे, ही गोष्ट वसाहतींच्या संबंधानें मागील भागांत सांगण्यांत आलीच आहे वस्तुतः ह्या वसाहती पूर्वींपेक्षां हल्लीं इंग्लंडशीं फारच निकट झाल्या आहेत. वसाहत करण्याच्या पूर्वींच्या पद्धतीमध्यें जेवढें कांहीं सदोष ह्मणून होतें, तेवढें सर्व निघून गेलें आहे. वसाहती ह्या हल्लींच्या काळांत फाजील वाढलेल्या लोकसंख्येस सुलभ वसतिस्थान झाल्या आहेत. पूर्वींची स्थिति अशी नव्हती. पूर्वीं फाजील लोकसंख्या

नसे, ह्मणून स्वदेशाला त्रासून दुसरीकडे कोठें तरी अश्रय मिळण्याच्या आशेनं जे लोक बाहेर पडत, तेवढेच कायते वसाहतींमध्यें राहण्यास तयार असत. ह्मणून अर्थातूच अशा लोकांचे मनांत मूळ देशाविषयीं प्रेमभाव नसून, उलट द्वेषबुद्धि असे. हाच नियम इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांच्या संबंधास लागू आहे. ज्या साधनांनीं हा उभयतांमधील संबंध कायम राखला जात आहे, तीं साधनें फार हलकीं आहेत. हिंदुस्थानाशीं संबंध राखिल्यानें इंग्लंडच्या अव्याहत राज्यव्यवस्थेस कोणत्याही प्रकारचा धक्का न बसतां, व दुसरें कोणत्याही प्रकारचें त्याजवर संकट न येतां हा दोन देशांचा संबंध आज सतत शंभर वर्षें जरी सारखा टिकला आहे, तरी तो केव्हां तुटून जाईल, ह्याचा नेम नाहीं. परंतु अशा प्रकारचा सूक्ष्म संबंध केव्हां ना केव्हां तरी तुटणारच, असा सिद्धांत करण्यापूर्वीं दुसऱ्या एका प्रश्नाचा विचार केला पाहिजे. तो प्रश्न हा कीं, हल्लींच्या स्थितीवरून काय सुमार दिसतो? हल्लीं हा सूक्ष्म दिसणारा संबंध दिवसेंदिवस कमी होत चालला आहे, किंवा दृढ होत चालला आहे? ह्या ठिकाणींसुद्धां वसाहतींच्या संबंधानें हल्लींच्या काळांत जो नियम दृष्टोत्पत्तीस येतो, तो हिंदुस्थानासही लागू पडतो. हल्लींच्या काळांत नवीन शोध निघाल्यानें दूर अंतरावरचे प्रदेश एकमेकांशीं सख्यत्वानें राहून त्या सर्वांवर मिळून एका सरकारचा अंमल असूं शकतो. ह्मणून हिंदुस्थान आणि इंग्लंड ह्यांच्यामधला संबंध दिवसेंदिवस कमी होत नसून, दृढ होत चालला आहे.

मॅक्कुलोक ह्यानें ॲडम स्मिथ ह्याचें पुस्तक टीपा देऊन छापिलें आहे. इ. स. १८११ च्या सुमारास इंग्लंड आणि हिंदुस्थान ह्यांच्यामध्यें चालत असलेला व्यापार कोणत्या स्थितींत होता, ह्याविषयीं हिंदुस्थानावरील टिपेंत त्यानें थोडीशी हकीकत लिहिली आहे. त्या

वेळीं सर्व व्यापाराचा एक मक्ता ठरविलेला असे. ह्मणून तेव्हांचा व्यापार अगदींच क्षुल्लक होता. आईल आफ मॅन्* किंवा जर्सी,* ह्यांच्याशीं इंग्लंडचा जो व्यापार चालत असे, त्याजपेक्षां हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांचा व्यापार जास्त नसे. ह्यावरून व्यापार हें जर दोन भिन्न समाजांमध्यें ऐक्यभाव उत्पन्न करण्याचें एक मुख्य साधन असेल, तर हिंदुस्थान आणि इंग्लंड ह्यांजमधील संबंध उत्तरोत्तर कमी होत चालला आहे, किंवा दृढ होत चालला आहे, ह्याचा आपल्यास सहज अजमास कारतां येईल. ह्या दोन देशांचा पूर्वीचा व हल्लींचा व्यापार ह्यांची तुलना केली ह्मणजे वरील गोष्टीचा निकाल होतो. पूर्वी असें समजण्यांत येत असे कीं, हिंदु लोकांच्या सवयी फार दृढ आहेत, चालत आलेला परिपाठ ते सहसा मोडावयाचे नाहींत, ह्मणून युरोपांतून आलेल्या मालाचा उपयोग स्वतःकडे ते कधींही करणार नाहींत, असा अदमास होता. परंतु हल्लींची स्थिति कशी आहे पहा. हिंदुस्थानच्या व्यापाराची मॅक्कुलॉक् ह्यांनीं जर्सी किंवा आईल् आफ् मॅन् येथील व्यापाराशीं तुलना केली होती. परंतु त्याच हिंदुस्थानच्या व्यापाराची तुलना हल्लीं फ्रान्स किंवा युनायटेड स्टेट्स् येथील व्यापाराशीं केली जाते. फ्रान्स व युनायटेड् स्टेट्स् येथील लोकांची आज ह्या भूतलावरील जबरदस्त व्यापाऱ्यांत गणना आहे. हल्लीं (सन १८८१) हिंदुस्थानांतून इंग्लंडांत येणाऱ्या मालाचें उत्पन्न तीन कोटी नव्वद लक्ष व अमेरिकेंतील मालाचें उत्पन्न दहा कोटी तीस लक्ष आहे. ह्मणून ह्यांत जरी हिंदुस्थानाचें नांव फ्रान्स व अमेरिका यांच्याखालीं आहे, तरी बाहेर माल पाठविण्याचे व्यापारांत हिंदुस्थानच्या वर वरील दोहोंशिवाय दुसरा कोणताही देश नाहीं. हिंदुस्थानांत परदेशाहून येणाऱ्या मालाचे

* इंग्लंडच्या लगत्यास हीं दोन लहानशीं बेटें आहेत.

संबंधानें पाहिलें तर इंग्लंडांतला माल जितका हिंदुस्थानांत खपतो, तितका अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें खेरीजकरून दुसऱ्या कोणत्याही देशांत खपत नाहीं. ह्मणजे हिंदुस्थानचें नांव फ्रान्स देशाच्याही वर आहे. कारण, एकाच वर्षी हिंदुस्थानांत इंग्लंडांतून दोन कोटी नव्वद लक्षांचा माल आला असून, त्याच वर्षी आस्ट्रेलियांत दोन कोटी दहा लक्षांचा व जर्मनींत एक कोटी सत्तर लक्षांचा माल इंग्लंडांतून गेला, असें आढळून आलें आहे.

ह्यावरून प्रस्तुत शतकांत हिंदुस्थानच्या व्यापाराची केवढी वृद्धि झाली आहे, ती सहज ध्यानीं येईल. ह्या वृद्धीवरून असें समजावयाचें कीं, इंग्लंड व हिंदुस्थान हीं दोन राष्ट्रें हळू हळू निकटसंबद्ध होत चाललीं आहेत. तीं हळू हळू विभक्त होत चाललीं आहेत, असें मुळींच समजावयाचें नाहीं. ह्मणून हिंदुस्थान देश विभक्त झाला असतां राजकीय संबंधानें इंग्लंडावर जरी वाईट परिणाम घडणार नाहींत, तरी व्यापाराच्या संबंधानें इंग्लंडास मोठा धक्का बसेल. कारण, हिंदुस्थानची राज्यसत्ता इंग्लंडच्या ताब्यांत आहे, ह्मणूनच हें व्यापाराचें एवढें मोठें दळणवळण या दोन देशांत कायम आहे. जर का हिंदुस्थान देश स्वतंत्र झाला, तर हें दळणवळण बंद पडेल; आणि जर हिंदुस्थान देश रशियासारख्या दुसऱ्या एखाद्या युरोपियन राष्ट्राच्या ताब्यांत गेला, तर मात्र इंग्लंडचा सर्व व्यापार खचित बुडेल, ह्यांत संशय नाहीं. हिंदुस्थान सोडून देऊन स्वतःचा त्रास चुकविणें ह्या शतकाच्या आरंभीं मात्र इंग्लंडास सहज करतां आलें असतें. मद्रास, मुंबई, कलकत्ता वगैरे व्यापाराचीं ठाणीं आपल्या ताब्यांत राखण्यासाठीं ज्या मोठाल्या लढाया फ्रान्सबरोबर इंग्लंडास कराव्या लागल्या, त्यांचा खरोखर हेतु कांहीं समजत नाहीं. कारण, त्या ठिकाणीं त्या वेळीं चालत असलेला

व्यापार अगदीं क्षुल्लक होता. परंतु हल्लींची स्थिति अशी नाहीं. हिंदुस्थानामध्यें व्यापारापासून इंग्लंडास मोठें उत्पन्न आहे. ह्मणजे पूर्वीपेक्षां हिंदुस्थानाशीं इंग्लंडचा संबंध हल्लीं फार निकट आहे. तसेंच नीतिमत्तेच्या संबंधानेंही इतक्या काळांत हिंदुस्थान इंग्लंडच्या किती जवळ आलें आहे तें पहा. प्रथमारंभीं हिंदुस्थानांत इंग्रज लोकांचीं व्यापाराचीं ठाणीं थोडीं होतीं. तेव्हां व्यापाराशिवाय दुसऱ्या कोणत्याही बाबतींत इंग्रज लोकांस हिंदु लोकांबद्दल काळजी वाटत नसे. मोंगल बादशाहीची सरशी असो किंवा तिचा ऱ्हास होवो, त्याजबद्दल इंग्रजांस मुळींच पर्वा वाटली नाहीं. हिंदु लोकांवरील अंमल फार वाईट असो, त्यांच्यावर मुळींच कोणाचें राज्य असो किंवा नसो, किंवा त्यांजवर कोणीही हत्यारबंद लुटारू लोक येऊन हल्ला किंवा काय पाहिजे तें करोत, त्याजबद्दल इंग्रजांस पर्वा वाटणार नव्हती. हिंदुस्थान जिंकण्याच्या कामास मनापासून इंग्रज लोक लागले, तेव्हांसुद्धां हिंदुस्थानचें कल्याण करावें असा त्यांचा उद्देश केव्हांही नव्हता. फ्रेंचांची पिछेहाट करावी व आपल्या वसाहतींचें परकीयांपासून संरक्षण करावें, हा मूळापासून इंग्रजांचा उद्देश. कंपनीच्या हातांत हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें पूर्णपणें आल्यावरही हिंदु लोकांच्या कल्याणाविषयीं इंग्रज लोकांची बेपर्वाई कायम होती. इ. स. १७८० ची ह्मणजे वार्न हेस्टिंग्सच्या कारकीर्दीच्या अखेरची हकीकत देतांना आडॅम स्मिथ असें लिहितो कीं, प्रजेच्या कल्याणाकडे इंग्रज लोकांइतकें दुर्लक्ष दुसऱ्या कोणत्याही सरकारचें नसेल. वास्तविक आहे, व्यापाराकरितां स्थापन झालेल्या मंडळीच्या हातांत देशाचीं राज्यसूत्रें आलीं असतां, त्या कंपनीच्या हातून तें काम पूर्णपणें बजाविलें जाणार नाहीं, हें साहजिक आहे. ह्मणून जोंपर्यंत ती मंडळी कायम आहे, तोंपर्यंत त्या राजनीतींत कितीही सुधारा केला,

तरी तिचे दुष्परिणाम कायम राहणारच. इ. स. १८९८ वर्षापासून ह्या चुकीची पूर्ण दुरुस्ती झाली आहे. ह्या सर्व प्रकारास बाह्यतः जें स्वार्थाचें स्वरूप होतें तें ह्या वेळपासून निघून गेलें आहे. तेव्हांपासून प्रजेचें हित करणें हें इतर सर्व राजांप्रमाणें इंग्रज सरकार आपलें ब्रीद मानीत आहे. जास्त प्रतीच्या पाश्चिमात्यांच्या सुधारणेची हिंदु लोकांस पर्वा नाहीं, ह्मणून ती त्यांस देण्याचा प्रयत्नच करावयाचा नाहीं, ही कल्पना आतां इंग्लिश राज्यसूत्रकारांच्या मनांतून समूळ गेली आहे.

दुसरें असें आहे कीं, हिंदुस्थानास येण्याचा जवळचा खुष्कीचा मार्ग सांपडल्यामुळें, व पुढें कांहीं दिवसांनीं सुवेझची संयोगभूमि तोडल्यानें जवळच्या जलमार्गाची सोय हिंदुस्थानास येण्याला झाल्यामुळें व तसेंच तारायंत्राची युक्ति निघाल्यामुळें, हिंदुस्थानचा इंग्लंडाशीं संबंध दिवसेंदिवस जास्त निकट होत चालला आहे. कित्येक असें ह्मणतात कीं, हें जें पूर्व स्थितींत अंतर पडत चाललें आहे, तें हितावह नसून, हिंदुस्थानच्या व्यवहारांत इंग्लिश मुत्सद्यांनीं व सर्व इंग्लिश राष्ट्रानें वरचेवर हात घालणें, हें फार अनिष्ट आहे. या ह्मणण्यांत खरें खोटें किती आहे, हें आतां न पाहतां तें सर्वथैव खरेंच आहे, असें आपण घेऊन चालूं. हिंदुस्थानचा व इंग्लंडचा फार निकट संबंध असणें इष्ट आहे किंवा नाहीं, हा आतां प्रश्न नाहीं. तूर्त आपल्यास इतकेंच दाखविणें आहे कीं, हा संबंध बरा असो अगर वाईट असो, तो उत्तरोत्तर कमी होत नसून, उलट दिवसेंदिवस जास्त दृढ होत चालला आहे.

आणखी हा संबंध किती जोरानें दृढ होत चालला आहे, तें पाहणें आहे. "ब्रिटिश हिंदुस्थान आणि तेथील राज्यकर्ते" यांजविषयीं कनिंगहम यानें एक अलीकडे पुस्तक लिहिलें आहे. त्यांत त्यानें, इ. स. १८२० पासून १८८० चे दरम्यानच्या हिंदुस्थानच्या परदेशाशीं

चालू असलेल्या व्यापाराची, त्या वेळच्या ग्रेट ब्रिटनच्या परदेशाशीं चालणाऱ्या व्यापाराशीं, तुलना केली आहे. ग्रेट ब्रिटनचा व्यापार ह्या वर्षांत इतका वाढला आहे कीं, त्याजबद्दल विलक्षण आश्चर्य वाटण्याजोगें आहे. इतक्या वेळांत इंग्लंडचा व्यापार ८ कोटींपासून ६९ कोटींपर्यंत वाढला आहे; परंतु कनिंगहम् असें लिहितो कीं, हिंदुस्थानचा ह्या वेळचा व्यापार ह्याहींपेक्षां जास्त वाढला आहे. ज्याअर्थी हिंदुस्थानचा परदेशांशीं व्यापार इंग्लंडशींच बहुतेक आहे, त्याअर्थी ह्या दोन देशांमध्यें व्यापारसंबंधीं दळणवळण अतोनात वाढत चाललें आहे, असें ह्याजवरूनच स्पष्ट होतें. आणखी सुमारें ९० वर्षांनीं, मध्यंतरीं कोणतेंही संकट न येईल तर, हा संबंध अतिशयच दृढ होईल, ह्यांत संशय नाहीं.

हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या राज्याची बरोबर कल्पना मनांत येण्याकरितां हा वेळपर्यंत ज्या ज्या गोष्टी सांगण्यांत आल्या आहेत, त्या सर्व एके ठिकाणीं केल्या ह्मणजे त्यांजपासून एक विलक्षण प्रकार दिसून येतो, तो असाः—हिंदुस्थान ह्मणजे एक रोमन महाराष्ट्राप्रमाणें मोठें महाराष्ट्र आहे. ह्या महाराष्ट्राचें राज्यपदच केवळ इंग्रजांचे ताब्यांत आहे असें नाहीं, तर हिंदु लोकांस सर्व प्रकारचें शिक्षण व सुधारणाही इंग्रज लोकांकडून मिळत आहे. (ज्याप्रमाणें ग्रीस येथील फास्ट व हेलन यांचें लग्न ह्मणजे एका युगाचें दुसऱ्या युगाशीं लग्न असें मानण्यांत येतें, त्याचप्रमाणें त्या संबंधांत पाश्चिमात्य आधुनिक सुधारणेचें पूर्वेकडील मध्यकालीन सुधारणेशीं लग्नच लागलें आहे, असें ह्मणतां येईल.) ह्या हिंदु महाराष्ट्रापासून इंग्लंडास कोणताही उपसर्ग पोंचत नाहीं. तसेंच त्याजपासून खंडणीची वगैरे प्राप्ति इंग्लंडास होत नाहीं. इतर व्यवहारांतही हिंदुस्थानचें ओझें इंग्लंडावर फारसें पडत नाहीं. इंग्लंडास कांहीं त्रास हिंदुस्थानामुळें पोंचत असेल, तर तो त्यांच्या पर-

देशाशीं राजकीय व्यवहारासंबंधानें असेल. परंतु ह्याच्यापलीकडे इंग्लंडचे राज्यव्यवहार अगदीं सुरक्षितपणें सारखे चालले असून, त्यांत कोणत्याही प्रकारचा फरक पडत नाहीं. असें असूनही ह्या राष्ट्राचीं राज्य-सूत्रें ढिलीं नाहींत. दिवसेंदिवस तीं जास्तच मजबूत होत चाललीं आहेत. हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांचें ऐक्य दुःस्थित व असाधारण असावयाचें, असें जरी कित्येकांस वाटतें, तरी या जगांतील राष्ट्रांचें परस्पर ऐक्य करण्याविषयीं समर्थ अशीं कित्येक राजकरणकारणें प्रचारांत असल्यामुळें हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांचें ऐक्य वाढत चाललें आहे. इंग्रजी इतिहासांत ह्या विषयाचें वर्णन फार उपयुक्त, फार महत्वाचें व फार चमत्कारिक असेंच असलें पाहिजे. ह्या गोष्टीबद्दल पुष्कळ पोकळ अभिमान लोकांस वाटत असतो, व जे कोणी शांतपणें विचार करितात, त्यांस कित्येक वेळां असें वाटतें कीं, हा सर्व निकट संबंध केवळ आभास आहे, व त्याजबद्दल विशेष आशा बाळगणें व्यर्थ आहे; हें एक निरर्थक काल्पनिक गोष्टींतल्याप्रमाणें साहसी कर्म असून त्याज-पासून चिरस्थायी फायदा कांहींच होणारा नाहीं. परंतु जसजशी कालक्रमणा होते, तसतसें असें वाटूं लागतें कीं, परमेश्वराची सत्ता अगाध आहे. तिच्यापुढें कितीही मुत्सद्दीपणा असला, तरी तो तुच्छ होय. ह्मणून केवळ दुर्लक्षपणानें उभारलेली जी ही हिंदु राष्ट्राची भव्य इमारत ती चिरस्थायी सुधारणेचें अढळ स्थान होण्याचा संभव आहे, व इंग्लंडदेशस्थ शूर पुरुषांनीं अनेक पराक्रम करून जे स्वदेशास फायदे करून ठेविले आहेत, त्यांतील हिंदुराज्यपदप्राप्ति हा एक फार अद्भुत, तथापि फार जबरदस्त, फायदा इंग्लंडास झाला आहे.

ह्या ठिकाणीं पुनः थोडेंसें परत जाऊन असें पाहिलें पाहिजे कीं, अशा प्रकारचा अवाढव्य उद्योग हातीं घेण्यास इंग्रज लोक कसे प्रवृत्त

झाले. हिंदुस्थाननिवासी लोकांस जिंकून इंग्रजांनीं त्यांस स्वराज्यसत्ते-खालीं कोणत्या साधनांनीं आणिलें, ह्याचा विचार मागील एका संपूर्ण प्रकरणांत झाला आहे. परंतु प्रस्तुत प्रश्न त्याहून निराळा आहे. पूर्वीचा प्रश्न 'कशा रीतीनें' अगर 'कोणत्या उपायांनीं' असा होता. प्रस्तु-तचा प्रश्न 'कशाकरितां' अगर 'कोणत्या हेतूनें' असा आहे. अमानुष शक्ति अगर असाधारण बुद्धिकौशल्य खर्च केल्याशिवाय एवढें मोठें राज्य कसें जिंकतां आलें, ह्याचा विचार पूर्वी करण्यांत आला आहे. परंतु जो हेतु मनांत भरून एवढा प्रचंड उद्योग त्यांनीं हातीं घेतला, तो काय होता, हें आतां पाहणें आहे. एवढ्या मोठ्या महाराष्ट्राची इमारत बांधण्यांत किती बरें महान् व शूर पुरुषांचे जीव खर्ची पडले असतील? अशा महान् उद्योगी पुरुषांनीं कशाकरितां बरें आपले जीव खर्ची घातले असावे? बरें, कदाचित् कोणी असें ह्मणतील कीं, त्या पुरुषांनीं केवळ त्यांजला मिळालेल्या हुकुमांची अंमलबजावणी केली. असें आहे, तर ज्यांचे हुकूम त्यांनीं पाळले, त्यांनीं तरी कोणत्या हेतूनें ते हुकूम दिले असावे? व जर हे हुकूम देणार कंपनीच असेल, तर कंपनीला हिंदुस्थान जिंकण्याची इच्छा कां झाली, व असें करण्यांत तिनें कोणता फायदा अपेक्षिला असावा? जर विलायतेंतील इंग्रज सरकाराकडून हे हुकूम मिळाले असतील, तर त्या सरकारचा तरी त्यांत काय हेतु असावा? व असें अन्यायाचें काम करणें पार्लमेंटासारख्या विद्वद्विभूषित परिषदेनें कसें बरें पतकरिलें असावें? कित्येक वेळां लढाईची पुढार इंग्रजांनीं घेतली असेल खरी, तरी हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य लढाया बाह्यतः तरी केवळ स्वसंरक्षणार्थ करण्यांत आल्या, अशा दिसतात. केवळ स्वराज्य वाढविण्याकरितां दुसऱ्याचा मुलूख जिंकून स्वार्थ साधावा, अशी इच्छा

इंग्रज लोकांनी कधींही प्रमाद केला नाहीं. तर मग ह्याहून भिन्न असा दुसरा कोणता हेतु इंग्रज लोकांचा असला पाहिजे बरें ?

खरोखरीच हिंदुस्थानचें स्वामित्व प्राप्त झाल्यानें इंग्लंडास फायदा कांहीं एक झालेला नाहीं. हिंदुस्थान जिंकण्याचे कामास लागणाऱ्या पैशाचें ओझें जरी इंग्लंडावर पडलें नाहीं, तरी हिंदुस्थानांतून खंडणी वगैरे मिळाल्यानें इंग्लंडच्या स्वखर्चाचें ओझेंही कमी झालें नाहीं. कोणत्याही खटल्यांत अपराधी कोण आहे, हें ठरविण्याची पुरातन काळीं एक चमत्कारिक चाल होती. 'घडलेल्या कृत्यानें फायदा कोणाचा झाला,' असा प्रश्न करून खटल्याचा निकाल करण्यांत येत असे. ह्या रूढीस अनुसरून वरील प्रश्नाचें उत्तर काढणें असेल, तर तें असें मिळेल कीं, इंग्लंडच्या व्यापारास फायदा झाला. हिंदुस्थानाशीं इंग्लंडचा व्यापार फार झपाट्याचा चालू आहे, व तो आणखीही वाढण्याचा संभव आहे. जोंपर्यंत हिंदुस्थानचें राज्य इंग्रज लोकांच्या स्वाधीन आहे, तोंपर्यंतच हा व्यापार चालणारा आहे. हा व्यापार मात्र फार मौल्यवान् फायदा खरा, व हल्लींच्या काळांत परराज्य ताब्यांत राखणें फार कठिण असल्यामुळें वरील फायदा फारच महत्वाचा समजला पाहिजे. तेव्हां कदाचित् हा व्यापार वाढविण्याचा हेतु मनांत धरूनच इंग्रजांनीं हिंदुस्थान देश जिंकला असेल, हें म्हणणें तरी खरें आहे काय ?

अशा प्रकारें हा प्रश्न सोडविणें सुयुक्तिक दिसतें, व ह्याच उत्तरास आणखी एक पुष्टीकरण असें मिळतें कीं, हिंदुस्थान जिंकण्याची सुरुवात व्यापाराचेच द्वारें झाली. प्रथमारंभीं स्वतःच्या वसाहतींचें रक्षण करण्याकरितांच इंग्रजांस शस्त्र धरणें भाग पडलें. दुसरें कांहीं कारण नाहीं. आरंभींच्या हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या लढाया वसाहतींसंबंधीं फ्रान्साबरोबर चालत असलेल्या लढायांपैकींच होत्या, व दोनही

एकाच वेळेस चालू होत्या. ह्या लढाया सुरू होण्याचें कारणही मागें सांगण्यांत आलेंच आहे. तें हें कीं, पंधराव्या शतकांत अमेरिकेच्या अफाट प्रदेशांतील संपत्ति व स्वामित्व ह्यांजबद्दल युरोपीय राष्ट्रांची एकमेकांशीं मोठी निकराची स्पर्धा चालू होती. ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत इंग्रज लोकांच्या व्यापाराच्या वसाहती होत्या, त्याचप्रमाणें अमेरिकेंतही होत्या. दोनही ठिकाणीं इंग्रजांचे शत्रु एकटे फ्रेंच लोकच होते. दोनही ठिकाणीं इंग्रज आणि फ्रेंच व्यापारी एकमेकांच्या व्यापाराच्या ठिकाणांतून एकमेकांशीं लढत असत. अमेरिकेंत न्यू इंग्लंड आणि व्हर्जीनिया हीं ठिकाणें जशीं इंग्रजांचे ताब्यांत होतीं, तशींच अकेडी आणि कानडा, हे प्रांत फ्रेंचांचे ताब्यांत होते; हिंदुस्थानांत मद्रास, कलकत्ता, मुंबई वगैरे इंग्लिशांचीं ठाणीं असून, पांदिचरी, चंद्रनगर, आणि माही, हीं ठिकाणें फ्रेंचांचे ताब्यांत होतीं.

हीं दोन राष्ट्रें एकाच वेळेस अगदीं निकरावर आलीं. दोनही ठिकाणीं एकाच वेळेस ह्मणजे इ. स. १७४० पासून १७६० पर्यंत उभयतांचे कलह चालले. इतक्या काळांत दोन मोठ्या लढाया चालल्या होत्या. त्या दोन लढायांचे दरम्यान उभयतांमध्यें कांहीं दिवस तह झाला होता, परंतु तो अगदीं पोकळ व अपूर्ण होता. दोनही ठिकाणीं शेवट जय इंग्लंडासच मिळाला. हिंदुस्थानांत फ्रेंच लोकांवर जयप्राप्ति मिळाल्यावर इंग्रज लोक स्वस्थ बसले नाहींत, तर तेव्हांपासून त्यांनीं हिंदु लोकांसच जिंकण्याचा प्रयत्न चालविला. ही गोष्ट व हल्लीं इंग्लंड व हिंदुस्थान यांजमध्यें मोठा व्यापार चालत आहे ही गोष्ट, ह्या मिळून वर जो आह्मीं तर्क केला आहे, त्यास पुष्टि येते; तो तर्क हा कीं, केवळ व्यापाराचे उद्देशानें अव्वलपासून अखेरपर्यंत हिंदुस्थान जिंकण्याचे प्रयत्न इंग्रजांचे चालले होते. प्रथमारंभींचें काम, किनाऱ्यावर थोड्यांशा वसाहती स्थापन

करणें; नंतर त्या वसाहतींचें फ्रेंचांपासून व हिंदुस्थानांतील इतर शत्रूंपासून संरक्षण करणें. ह्या दोन गोष्टी उरकल्यावर आपला व्यापार किनाऱ्यासच लागून न ठेवितां देशाच्या मध्य भागांतही तो वाढविण्याचा प्रयत्न इंग्रज लोक करूं लागले. आरंभीं हैसूर व महाराष्ट्र येथील लोक इंग्रजांशीं व्यापार सुरू ठेवण्यास कबूल नव्हते. परंतु इंग्रज लोकांची लोभिष्ट उत्कंठा इतकी अनावर झाली, कीं या प्रदेशावर त्यांनीं आपलीं सैन्यें पाठविलीं, मालावर जकात घेण्याचीं जीं नाकीं पूर्वीं होतीं, तीं त्यांनीं जमीनदोस्त केलीं. आपला माल नेऊन त्यांच्या मुलुखांत भरला. असें करतां करतां इंग्रजांचा व्यापार जो प्रथम अगदीं क्षुल्लक होता, तो बराच वाढला. शेवटीं जे कोणी तद्देशीय राजे थोडेबहुत शक्तिमान होते, त्यांस केवळ भयाभीतच न ठेवितां प्रत्यक्ष त्यांचा सर्वतोपरी पराभव केला. पुढें दिल्लीचे मोंगल बादशहा, हैसूरचे सुलतान, महाराष्ट्रांतील पेशवे, अयोध्येचे वजीर, व शीख लोकांचे महाराज वगैरे जेव्हां कोणीच उरले नाहींत, तेव्हां सर्व अडथळे दूर झाल्यामुळें तितक्या मुदतींत इंग्रजी व्यापाराची फारच वृद्धि झाली.

परंतु ज्या गोष्टी प्रत्यक्ष घडून आल्या, त्यांचें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केलें असतां, वरील तर्क खरा आहे, असें दिसून येत नाहीं. ह्या राज्यस्थापनेचा आरंभ व्यापारांतर्गत होता; पुढें तो व्यापार फारच वृद्धिंगत झाला, ही गोष्ट खरी. परंतु ज्या रेषेमध्यें ऐतिहासिक गोष्टींची घडण गोंवलेली असते, ती रेषा नेहमीं सरळच असते असें नाहीं. दोहोंकडची दोन टोकें सांपडलीं ह्मणजे सरळ रेषा सांपडल्याप्रमाणेंच आहे. प्रस्तुत विषयाच्या दोनही टोकांस ह्मणजे आरंभीं व शेवटीं व्यापार आहे, ह्मणून मध्यंतरींही व्यापारच असेल, असें नाहीं. खरोखरी गोष्ट अशी आहे कीं, जे जे अडथळे येतील, ते सर्व दूर करून व्यापार वाढवीत

तितका वाढवावयाचा अशी जर इंग्रजांची इच्छा असती, तर हिंदुस्थानांत एवढाल्या मोठ्या लढाया हातीं घेण्याचें त्यांस प्रयोजनच पडलें नसतें; कारण, व्यापाराचा मुख्य अडथळा लढायांपासून दूर होणारा नव्हता. व्यापारवृद्धीच्या कामांत एतद्देशीय राजे इंग्रजांची मुळींच स्पर्धा करीत नसत. विशेष स्पर्धा कंपनीच्याच मनांत होती. ह्मणून प्रदेशवृद्धि व व्यापारवृद्धि ह्यांजमध्यें मुळापासून कालाचें एक प्रमाण राहिलें नाहीं.

उलट पक्षीं असें दिसून येतें कीं, सुमारें इ. स. १८१३ पर्यंत इंग्लिशांनीं आपल्या अंमलाखालीं पुष्कळ मुलूख आणिला होता. तरी त्या वेळेपर्यंत त्यांचा व्यापार अगदीं क्षुल्लक होता. सन १८३० पासून त्यांचा व्यापार फार जारीनें वाढूं लागला. वरील सनावरून व्यापारवृद्धीचें मुख्य कारण काय तें दिसून येतें. तें असें कीं, प्रदेशवृद्धीचा व व्यापारवृद्धीचा कांहींएक संबंध नाहीं. वर जे दोन सन सांगण्यांत आले, त्या सनांत कंपनीच्या हातांत असलेल्या व्यापाराचा मक्ता, पार्लमेंटाच्या ठरावानें कंपनीकडून काढण्यांत आला. ह्यावरून असें दिसून येईल कीं, हिंदुस्थान देश जिंकण्याचें काम बहुतेक अंशीं ईस्ट इंडिया कंपनीकडूनच तडीस गेलें, असें असतां, व्यापारवृद्धीचें काम ईस्ट इंडिया कंपनीकडून तडीस न जातां, उलट पक्षीं तें त्या कंपनीच्या क्षयानें तडीस गेलें, असें ह्मणावें लागतें. ह्या कंपनीला हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याची परवानगी सनदेनें मिळाली होती. परंतु जोंपर्यंत ही कंपनी कायम होती, तोंपर्यंत हिंदुस्थानचा व्यापार विशेष वाढला गेला नाहीं.

आमचें ह्मणणें वाचकांस स्पष्ट रीतीनें कळण्याकरितां ईस्ट इंडिया कंपनीच्या ठळक ठळक गोष्टींची हकीकत येथें देणें इष्ट दिसतें.* ईस्ट

* ईस्ट इंडिया कंपनी:—जहांगीर बादशहाच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं इंग्रज

इंडिया कंपनीची स्थिति केव्हां केव्हां कसकशी बदलत गेली, हें आपण पाहिलें पाहिजे. इ. स. १६०० ह्मणजे एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीच्या अखेरीस ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. इंग्लंडच्या विस्ताराविषयीं ज्या गोष्टी आह्मी येथें सांगत आहों, त्या गोष्टींच्या संबंधानें येथें असें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेचा काळ, तोच इंग्लंडच्या विस्ताराचा अगदीं बरोबर आरंभ होय. तो मागें व पुढें मुळींच नाहीं. वर सांगण्यांत आलें आहे कीं, इंग्रज लोकांच्या अंगीं जो दर्यावर्दीपणा अलीकडेस आला, त्याचा मूळारंभ

लोक हिंदुस्थानांत येऊं लागले, ते व्यापारी ह्या नात्यानें येऊं लागले. सन १५९९ त इंग्लंडांत एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत ईस्ट इंडिया कंपनी स्थापित झाली. ह्या कंपनीला पहिला परवाना एलिझाबेथ राणीनें सन १६०० त दिला. त्यांत हिंदी महासागरांतल्या सर्व व्यापाराचा मक्ता त्या कंपनीकडेच देण्यांत आला. इंग्लिश तारवें हिंदुस्थानांत आल्यावर इंग्लिशांना पोर्तुगीज लोकांकडून फार अडथळा झाला आणि त्या दोघांचें वैमनस्य ह्या देशांत सुमारें शंभर वर्षें चाललेलें होतें. पुढें हळू हळू त्यांस बादशहांपासून हक्क व गांव वगैरे मिळूं लागले. पुढें १६९१ त दुसरी एक कंपनी निघाली. तिचें व पहिलीचें व्यापाराच्या मक्त्यासंबंधीं भांडण सुरू झालें. ह्या निरनिराळ्या कंपन्या १७०८ त एकत्र होऊन तें भांडण मिटलें. त्यांचे परवाने वारंवार लांबवण्यांत आले. पुढें १७४४ पासून फ्रेंचांशीं इंग्लिशांची झटापट सुरू झाली. त्यांत इंग्लिशांना आपोआपच नेटिव राजांना मदत देऊन मुलूख काबीज करणें सोपीचें झालें. त्याबरोबर त्यांचा अंमल सुरू झाला. ह्मणजे व्यापार व अंमल अशा दोन गोष्टी त्यांचे हातीं आल्या. इंग्लंडांत ह्या कंपनीचीं हीं कृत्यें कोणालाही पसंत पडेनात. तेव्हां १७८४ त धाकटा पिट्ट ह्यानें एक बिल तयार केलें. त्यांत असें होतें कीं, एक "बोर्ड आफ् कंट्रोल" नेमावें, त्यानें कंपनीच्या नोकरांवर देखरेख ठेवावी, कंपनीच्या नोकरांनीं नेटिव राजांबरोबर पैशाचे व्यवहार करूं नयेत, व नेटिव राजांना साह्य किंवा त्यांशीं भांडणें करूं नयेत. १८३३ त नवीन परवाना कंपनीला मिळाला, त्या वेळीं लार्ड वुइल्यम बेंटिंक हा हिंदुस्थानचा व्हाइसराय व चवथा वुइल्यम इंग्लंडचा राजा होता. त्या सालीं त्यांचे हातांतील व्यापार काढून घेतला, पण राज्यव्यवस्था कायम ठेविली. हिंदुस्थानांत स्थाईक राहण्यासंबंधानें इंग्रजांवरचे प्रतिबंध काढून टाकण्यांत आले. हिंदु व युरोपियन ह्यांना नोकरीसंबंधानें सारखे हक्क दिले

स्पॅनिश आर्मेडापासून* झाला. ह्याच वेळेस इंग्लंड देशामध्यें दर्यावर्दीपणांत कुशल असे मोठमोठे योद्धे प्रथमच उदयास आले. अमेरिकेंत वसाहत करण्याचें काम ह्याच वेळेस सुरू झालें. हें ह्मणणें खरें असेल तर हिंदुस्थानांतही ह्याच वेळेस वसाहती स्थापन झाल्या असल्या पाहिजेत, व त्याप्रमाणें त्या स्थापन झाल्याही होत्या, ही गोष्ट खरी आहे. कारण, स्पॅनिश आर्मेडाचा पराभव झाल्यावर पुढें फक्त १२ वर्षांनींच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली.

ही कंपनी मूळ व्यापाराकरितां स्थापन झाली. आरंभीं १४८ वर्षेपर्यंत ह्या कंपनीनें व्यापारवृद्धीकरितां पुष्कळ परिश्रम केले. इतक्या काळांत त्या कंपनीच्या इतिहासांत पुष्कळ महत्वाच्या गोष्टी घडून आल्या असतील; परंतु त्यांशीं तूर्त आपलें प्रयोजन नाहीं. इ. स. १७४८ ह्या वर्षी दक्षिण हिंदुस्थानांत पुष्कळ तंटे सुरू झाले. त्यांत कंपनीला हात घालावा लागला. त्यामुळें सहजच लढाई करण्याचें व बऱ्याच अंशीं राजकीय सत्ता हातीं घेणें त्यांस भाग पडलें. नंतर दुसऱ्या महत्वाच्या काळास सुरवात झाली व तो बहुतेक पहिल्या इतकाच लांब होता. ह्यांत ११० वर्षांचा समावेश होतो; व त्याचा शेवट इ. स. १८५८ त होतो. कारण, ह्या वर्षी पार्लमेंटाच्या ठरावानें ईस्ट इंडिया कंपनी मोडण्यांत आली. प्रस्तुत आमचा संबंध ह्या दुसऱ्या काळाशीं आहे. ह्या काळांत एकंदर गोष्टी कसकशा घडून आल्या, हें समजण्याकरितां आपण त्याचे पोटविभाग करूं.

गेले. ह्या किल्लाचा पुष्कळ उपयोग झाला. पुढें १८५७ च्या बंडानंतर कंपनीच्या हातांतून सारा कारभार काढून घेऊन प्रत्यक्ष इंग्लंड सरकाराच्या हातीं देण्यांत आला. इतका इतिहास मूळ समजण्यास पुरे आहे. बाकीच्या गोष्टी व प्रस्तुत विषयापुरते संदर्भ मुळांत आहेतच.

* टीप.—पान १५४ पहा.

ह्या काळामध्यें ज्या कित्येक गोष्टी घडून आल्या आहेत, त्यांमध्यें एक प्रकारचा नियमितपणा दिसून येतो. इतिहासामध्यें असा नियम क्वचितच दृष्टीस पडतो. परंतु ऐतिहासिक गोष्टी व त्यांचे सन ध्यानांत राहण्यास हा नियम फार उपयोगाचा आहे. ईस्ट इंडिया कंपनीस जी सनद करून देण्यांत येत असे, तिची मुदत वीस वर्षांची असे, व दर वीस वर्षांनीं पहिली सनद फिरवून दुसरी नवीन सनद पुढील वीस वर्षांकरितां करून देण्यांत येत असे. इ. स. १७४८ पासून कंपनीचे व्यवहार जरासे जास्त बिकट व धोक्याचे झाल्यामुळें पार्लमेंट त्यांस एकदम पुष्कळ वर्षांची सनद न देतां थोडथोड्या मुदतीपुरतीच देत असे. तसेंच जे करार कंपनीनें कबूल केले होते, त्यांचा प्रत्येक वेळेस पुनरपि विचार करणें व कंपनीच्या व्यवस्थेंत फेरफार करणें पार्लमेंटास इष्ट वाटत असे. अशा प्रकारेंकरून कंपनीच्या व्यवस्थेंत वरचेवर बदल होत असे. हा बदल होणें तो ठरीव काळांतींच होई. हा काळ वीस वर्षांचा होता. त्याचा आरंभ इ. स. १७७३ त लार्ड नॉर्थ यांचा रेग्युलेटिंग आक्ट पसार झाला तेव्हां झाला. ह्मणून सन १७७३ हें वर्ष लक्षांत ठेविलें असतां, त्याच्याच बरोबर दुसरे चार सन अवश्य लक्षांत ठेविले पाहिजेत. कारण, कंपनीचा इतिहास कसकसा बदलत गेला, हें ह्या चार सनांवरून समजणार आहे; हीं चार वर्षें येणेंप्रमाणें:—सन १७९३, १८१३, १८३३, आणि १८५३.

हे पांच सन फारच महत्वाचे आहेत, हें पुढील हकीकतीवरून समजून येईल. कंपनीच्या इतिहासाचें मुख्य स्वरूप ह्या सनांनीं चांगलें लक्षांत राहील. ह्यांपैकीं पहिला सन सर्वांत फारच महत्वाचा आहे. हिंदुस्थानामध्यें ब्रिटिश राज्यस्थापनेच्या उद्योगाची सुरुवात जर इ. स. १७४८ ह्या वर्षी झाली असें ह्मटलें, तर ब्रिटिश राज्याची सुरुवात

इ. स. १७७३ ह्या वर्षी झाली, असें ह्मणतां येईल. ह्या वर्षापासून हिंदुस्थानामध्यें गव्हर्नर जनरल नेमण्यास सुरुवात झाली. तरी त्या वेळेस गव्हर्नर जनरलास हिंदुस्थानाचा गव्हर्नर जनरल असा किताब नसून फक्त बंगालचा गव्हर्नर जनरल असा किताब असे. त्याच वर्षी कलकत्ता येथील गव्हर्नर जनरलचें कौन्सिल स्थापण्यांत आलें. हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेस जो त्या वेळीं एक मोठा धोका येण्याचा संभव होता, त्याचें निवारण करण्यांत आलें. कंपनीचे भागीदार अगर मालक ह्मणून जे कोणी असत, त्यांच्या हातांत जी पूर्वी मोठी सत्ता असे, ती कमी करण्यांत आल्यामुळें हिंदुस्थान सरकारच्या व्यवस्थेंत जे कित्येक दूषित प्रकार होते, ते अर्थात् कमी झाले.

पुन्हां इ. स. १७९३ ह्या वर्षी कंपनीची पहिली सनद मोडून दुसरी नवीन देण्यांत आली. हें वर्ष पहिल्यापेक्षां थोडें कमी महत्वाचें आहे, तरी त्या वेळीं हिंदुस्थानांतील व्यवहारांवर जे इंग्लंडांत वादविवाद होत असत, ते फार महत्वाचे आहेत. हिंदुस्थानामध्यें कारभार करण्यास जे युरोपियन लोक येत, त्यांचीं मनें ब्राह्मणत्वाच्या कल्पनांनीं संपूरित झाल्यामुळें त्यांचें असें ह्मणणें असे कीं, अप्रवेशनीय स्वर्गवासाप्रमाणें हिंदुस्थान देश नेहमीं अगम्य राखावयाचा; त्यांत कोणाही युरोपियनास अगर पाद्यास आपले विचार प्रगट करूं द्यावयाचे नाहींत. अशा प्रकारचे जे चमत्कारिक ग्रह प्रथम कित्येक अधिकाऱ्यांचे होते, ते वरील वादविवादांवरून स्पष्टपणें कळून येतात. परंतु दुसऱ्या एका महत्वाच्या गोष्टीविषयीं सन १७९३ हें वर्ष प्रसिद्ध आहे. ह्या वर्षी कंपनीची सनद फिरविली, इतकेंच नाहीं, तर ह्याच वर्षी बंगाल्यामध्यें जमीनीवरील कायमच्या साऱ्याचा प्रसिद्ध कायदा*

* कायमच्या साऱ्याचा कायदाः— लॉर्ड कॉर्नवॉलिस हे स. १७८६ पासून

लागू करण्यांत आला. जगाच्या इतिहासांत विशेष ध्यानांत ठेवण्याजोगे जे ठराव प्रसिद्ध झाले असतील, त्यांपैकीं बंगालच्या जमिनीवरील कराची स्थायिक व्यवस्था हा एक आहे.

त्यानंतर इ. स. १८१३ ह्या वर्षी कंपनीची सनद पुन्हा फिरविण्यांत आली. त्या वेळेस वार्न हेस्टिंग्स् हा फार वृद्ध ८० वर्षांचा झाला होता. या वेळेस त्यानें आपल्या एकांतवासाच्या ठिकाणांतून पार्लमेंट सभेपुढें येऊन साक्ष दिली. त्या वेळेपासून कंपनीच्या हातांतील सत्ता कमी करण्यांत आली. व्यापाराच्या पूर्ण स्वामित्वाचा मक्ता जो त्यांस करून देण्यांत आला होता, तो मोडण्यास त्याच वेळेस सुरुवात झाली. ब्राह्मणत्वाचें वर्चस्व कमी होऊं लागलें. पाश्चिमात्यांचा ख्रिस्ती धर्म, सुधारणा, व शास्त्रीय शोध यांचा हिंदुस्थानांत फैलाव करण्याचें काम इंग्लंडानें प्रथम हातीं घेतलें.

इ. स. १८३३ हें त्याच्या पुढचें सनद फिरविण्याचें वर्ष आहे. त्या वेळीं व्यापाराचा मक्ता पूर्णपणें मोडण्यांत आला. ह्याच वेळीं वस्तुतः कंपनी मोडण्यांत आली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. जरी ती मोडली असें प्रसिद्धपणें सांगण्यांत आलें नाहीं, तरी ह्यापुढें कंपनी आहे असें ह्मणणें ह्मणजे केवळ सोयीसाठीं आहे. असें मानणें सोईचें असल्याचें

१७९३ पर्यंत गव्हर्नर जनरल होते. तितक्या मुदतींत ह्यांनीं वरील कायदा पसार केला. पूर्वी अशी चाल होती कीं, रयतेस जमिनी लागवडीस फार थोड्या मुदतीनें द्यावयाच्या. ह्यामुळें जमिनीवरील मालकी कायम न राहून तींत सुधारणा करण्याचें कोणी मनावर घेत नसत. लॉर्ड कॉर्नवॉलिस ह्यांनीं असें ठरविलें कीं, कुळास जमिनी कायमच्या विभागून द्याव्या व त्यांजवरील साराही एकवार कायमचा ठरवावा, व मग तो कमीजास्त करण्यांत येऊं नये. ही पद्धत सर्व बंगाल प्रांतांत सुरू झाली. पुढील गव्हर्नर जनरल सर जॉन शोर ह्यास ही पसंत नव्हती, परंतु त्याचें ह्मणणें कोणास पसंत पडलें नाहीं. ह्या कायद्यापासून नफानुकसान काय झालें, हें अद्यापि वादग्रस्त आहे.

कारण, इतक्या दिवसांचा संप्रदाय व इतक्या दिवसांचा कंपनीचा अनुभव ह्यांच्या योगानेंच हिंदुस्थानचें राज्य चालत आलें होतें, ह्मणून हा संप्रदाय व अनुभव कायम ठेविल्याप्रमाणें दाखविणें इष्ट होतें. हिंदुस्थानचा कारभार चालविण्यासाठीं व्यवस्थेशीर कायदे वगैरे करून ते अंमलांत आणणें ह्याच वेळेपासून सुरू झालें.

शेवटीं इ. स. १८५३ ह्या वर्षापासून असा ठराव झाला कीं, हिंदुस्थानांतील राज्य चालविण्यास जे नोकर नेमावयाचे, ते त्यांच्या अंगच्या गुणांच्या चढाओढीनें नेमण्यांत येतील. इ. स. १७८३ ह्या वर्षी जो गहन प्रश्न तत्कालीन मुत्सद्यांस घोटाळ्यांत पाडीत होता, त्याचें निराकरण ह्या वेळेस झालें. द्रव्याच्या जोरावर आपल्या वतीचे सभासद पार्लमेंटांत असणें हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांस शक्य असे. अशा प्रकारच्या द्रव्याचा फायदा कोणीं घ्यावा, अगर इंग्लिश राज्यव्यवस्थेस अपाय घडल्याशिवाय ही वाईट चाल कशी बंद करावी, हा पूर्वी सर्वत्रांस मोठा गूढ प्रश्न असे. परंतु त्या वेळेपासून असले दुष्ट प्रकार बंद झाले.

ह्या ठिकाणीं सनद फिरविण्याच्या कालाचें नियतत्व सुटलें आहे. इतिहासामध्यें असें नियतत्व असणें स्मरणशक्तीस जरी चांगलें आहे, तरी तें फार वेळपर्यंत एकसारखें नाहीं, ह्याचें हें उदाहरण आहे. सन १८५७ सालीं जें मोठें बंड हिंदुस्थानांत झालें, त्यानें या नियतत्वाचा भंग केला. ह्मणून सन १८७३ हें वर्ष जरी रेग्युलेटिंग आक्ट पास झाल्यापासून शतक दाखविणारें आहे, तरी तें प्रस्तुत विषयाचे संबंधानें मुळींच महत्वाचें नाहीं. कारण, सन १८५८ या वर्षी राणी सरकारानें हिंदुस्थानची राज्यव्यवस्था कंपनीकडून आपल्याकडे घेतली.

ह्या इतक्या मुख्य गोष्टींवरून असें दिसून येतें कीं, इ. स. १८१३ ह्या वर्षी कंपनीचा मक्ता बराच कमी करण्यांत आला; व १८३३ ह्या वर्षी तो अगदींच मोडून गेला. हिंदुस्थानाशीं इंग्लंडचा व्यापार अगदीं क्षुल्लक आहे असें मॅकुलॉक यानें लिहिलें, त्या वेळीं त्याचेपुढें सन १८११ पर्यंतचे मात्र आंकडे होते; व पुढें व्यापार फार वाढत चालला ह्मणून जें लिहिण्यांत आलें आहे, तें इ स. १८१३ नंतर व विशेषेंकरून १८३३ चेही नंतर होय. ह्याचा अर्थ इतकाच कीं, व्यापार करण्याचा ज्यांचा खरोखर उद्देश होता त्यांच्या हातांत व्यापाराचा मक्ता असेपर्यंत व्यापार अगदीं मंद राहिला. परंतु जेव्हां व्यापाराकडेच विशेष लक्ष दिल्याशिवाय हिंदुस्थानावर इंग्रज लोकांचा स्वतंत्र अंमल सुरू झाला, तेव्हांच इंग्लंडचा हिंदुस्थानाशीं व्यापार फार वाढला. ही गोष्ट लौकिक प्रसिद्धीविरुद्ध दिसण्याचा संभव आहे. परंतु आपण असें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, व्यापाराकडे दुर्लक्ष करण्यांत आलें, ह्याचा अर्थ तत्संबंधीं असलेला एकदेशीय मक्ता मोडण्यांत आला हा होय. अशा प्रकारचा एकदेशीय मक्ता असल्यामुळें कंपनीकडून व्यापारवृद्धि झाली नाहीं, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं; तसेंच व्यापारास असलेले प्रतिबंध निघून जातांच व्यापारवृद्धि अपरंपार होऊं लागली, ह्यांतही कांहीं आश्चर्य नाहीं. उलट पक्षीं आणखी असें दिसून येतें कीं, व्यापारवृद्धि ही हिंदुस्थानांतील इंग्लिश प्रदेशवृद्धीला मुळींच अनुसरून नाहीं.

हिंदुस्थानामध्यें चार असामी मोठे राज्यकर्ते पुरुष होऊन गेले. त्यांना ‘ राज्यसंवर्धक ’ असा किताब देतां येईल. हे पुरुष येणेंप्रमाणें:—लॉर्ड क्लाईव्ह, लॉर्ड वेल्स्ली, लॉर्ड हेस्टिंग्स आणि लॉर्ड डलहौसी. ठोकळ मानानें असें ह्मणतां येईल कीं, कारोमांडल ह्मणजे पूर्व किनाऱ्यावरील, ह्मणजे कलकत्त्यापासून मद्रासपर्यंत ब्रिटिश सत्ता वरील पुरुषांपैकीं

पहिल्यानें स्थापनें केली. दुसरा आणि तिसरा यांनीं मराठ्यांचा पराभव करून मध्य हिंदुस्थानांत व हिंदुस्थान द्वीपकल्पाचे पश्चिम भागांत ब्रिटिश सत्ता वाढविली. चवथ्यानें पूर्वी जिंकलेल्या देशांची चिरस्थायिकता दृढ करून, शिवाय वायव्येकडे सिंधु नदीच्या तीरापर्यंत ब्रिटिश अंमल वाढविला. हे वर सांगितलेले प्रदेश जिंकले गेले, त्यांमध्यें बऱ्याच काळाचें अंतर आहे; त्याजवरून त्यांचे निरनिराळे भाग करितां येतील. प्रदेश जिंकण्याचा पहिला काळ सन १७४८ पासून १७६९ पर्यंत. ह्या काळाला लॉर्ड क्लाईव्हच्या नांवाची चिठ्ठी मारतां येईल. दुसऱ्या काळाचा आरंभ सन १७९८ त झाला, व मध्यें बरेच वेळां जरी प्रदेश जिंकण्याचें काम तहकूब होतें, तरी सन १८२० हें वर्ष ह्या काळाची अंत्य सीमा ठरविण्यास हरकत नाहीं. ह्या काळाला लॉर्ड वेल्स्ली आणि लार्ड हेस्टिंग्स् ह्यांचीं नांवें देतां येतील. तिसरा काळ सन १८३९ पासून सन १८९० पर्यंत. ह्या काळाच्या पूर्वार्धांत इंग्लिशांस बरेंच अपयश आलें. परंतु उत्तरार्धांत ज्या लढाया करून शेत तयार करण्यांत आलें, त्याची कापणी करण्याचें काम मात्र लॉर्ड डलहौसी ह्याच्याकडे आलें.

ह्यावरून असें दिसून येईल कीं, ज्या क्रमानें एका मागून एक प्रदेश जिंकण्यांत आले, त्याच क्रमानें व्यापाराची वृद्धि झाली नाहीं. ह्मणून इ. स. १८११ मध्यें इंग्रज लोकांचा हिंदुस्थानामध्यें व्यापार अगदींच क्षुल्लक होता, असें जें वर सांगण्यांत आलें आहे, तें यथार्थ आहे. परंतु सन १८११ हें वर्ष असें आहे कीं, त्यापूर्वी लॉर्ड वेल्स्ली ह्यानें नुकतेच नवीन प्रदेश जिंकून राज्यास जोडले होते. पुनः सन १८३० च्या सुमारास व्यापाराची बरीच वृद्धि झाली. तो काल हिंदुस्थानच्या इतिहासांत बराच शांततेचा आहे. सन १८५७ सालचें बंड झाल्यानंतर देशी राजांचे मुलूख खालसा करण्याचें काम बंद पडलें अस-

तांही, त्यानंतरच्या शतकपादांत प्रदेशवृद्धि होत नसतां, व्यापारवृद्धि फार जलदीनें व अतोनात झाली आहे. ह्यावरून प्रदेशवृद्धि व व्यापारवृद्धि ह्यांचें प्रमाण एक नाहीं, हें उघड आहे.

हिंदुस्थानांतील इंग्लिश राज्यस्थापनेचें मुख्य कारण व्यापार वाढविण्याची त्या लोकांची अनावर इच्छा हें होय. असा सिद्धांत वारंवार करण्यांत येतो, व तो सहजरीत्या पुष्कळ लोकांस खरा वाटतो. इतिहास जलद चाळून पाहिला असतां, ह्या सिद्धांतास पुष्टि येते. परंतु त्यांत मुळींच तथ्य नाहीं; ज्याप्रमाणें ब्रिटिश राज्यस्थापना ही केवळ अप्रतिम लष्करी प्रभाव प्रगट करण्याच्या अनावर इच्छेचा परिणाम नव्हे, त्याचप्रमाणें व्यापारवृद्धीच्या अनावर इच्छचाहा तो परिणाम नाहीं.

राज्यस्थापनेचा प्रथमारंभ केवळ स्वतःच्या व्यापारसंबंधीं वसाहतींचें संरक्षण करण्याच्या कामांत झाला, हें अगदीं स्पष्ट आहे. फोर्ट सेंट जार्ज आणि फोर्ट सेंट डेव्हिड ह्यांचें फ्रेंचांपासून रक्षण करणें जरूर असून, तें सिद्धीस नेण्याचे जे प्रयत्न करण्यांत आले, त्यांच्या योगानें मद्रास इलाख्यावर ब्रिटिश अंमल कायम झाला. तद्वतच फोर्ट वुइल्यमचें रक्षण करून, बंगालचा मुसलमान नबाब सुराज उद्दवला ह्याच्या अंधारकोठडींतील अघोर कृत्यांबद्दल त्यास योग्य शासन करण्याचें जरूर असून, ती गोष्ट तडीस नेण्याचे जे प्रयत्न करण्यांत आले, त्यांच्या योगानें बंगाल इलाखा ब्रिटिश सत्तेखालीं आला. येथपर्यंत कार्यकारणभाव अगदीं स्पष्ट आहे. परंतु ह्यानंतरचा काल राज्यक्रान्ति व दुरवस्था यांनीं संपूर्ण भरलेला आहे. व ह्या काळांत जीं जीं कृत्यें ब्रिटिश लोकांकडून घडलीं, तीं सर्व इंग्रज लोकांच्या अनावर अपहरणशीलत्वाचाच केवळ परिणाम आहे, हें नाकबूल करतां येणार नाहीं. वार्न् हेस्टिंग्स् ह्यानें बनारस, औध, रोहिलखंड इत्यादि ठिकाणीं जीं

अघोर कृत्यें केलीं, तीं अत्यंत द्रव्यलोभीपणाचेच परिणाम होत. हिंदुस्थानांतील ब्रिटिश अंमलाच्या अलीकडच्या उत्तरार्धांत त्यांच्या हातून अशींच कृत्यें घडतीं, तर हिस्पानिओला* आणि पेरू† ह्या ठिकाणीं पूर्वीं स्थापन झालेल्या स्पॅनिश लोकांच्या राज्यांत व या ब्रिटिश राज्यांत कांहीं अंतर आहे, असें ह्मणतां आलें नसतें. अत्यंत लोभाविष्टपणाचींच हीं सर्व फळें होत, असें आपणांस स्पष्टपणें ह्मणावें लागलें असतें.

इसवी सन १७८९ त लॉर्ड कॉर्नवॉलिस गव्हर्नर जनरलचे कामावर येतांच एक मोठा फेरफार घडून आला. त्याच्या दिलदार वर्तनाची छाप लोकांच्या मनावर ठसणारी होती. राज्यव्यवस्थेंत सुधारणा करण्याची त्याची रीत फार समंजस होती. कंपनीच्या नोकरांना पैशाकरितां कोणतेंही दुष्कृत्य करण्याचें प्रयोजन न पडावें, ह्मणून त्यांचे पगार त्यानें फार मोठे वाढवून दिले. अशा प्रकारेंकरून हिंदुस्थानच्या नोकरीला जो एक निंद्य डाग लागला होता, तो त्यानें काढून टाकिला. त्या वेळेपासून अद्यापपर्यंत नीतिमत्तेच्या संबंधानें ब्रिटिश नोकरी फार निर्मळ मानली जात आहे. केवळ पैशाच्या प्राप्तीकरितां परमुलुख जिंकून आपल्या ताब्यांत घेतले जात असत, हें खरें असेल, तर ह्या वेळेपासून अशा प्रकारचीं अन्यायाचीं कृत्यें कंपनीकडून घडणें बंद झालें. कारण, कंपनीच्या व्यवस्थापकांनीं आपलीं दुष्कृत्यें तशींच चालू ठेविलीं असतीं, तर त्यांची फार बेअब्रू झाली असती. इतकेंच नाहीं, तर

---

* हिस्पानिओला.—अमेरिकेच्या पूर्वेस वेस्ट इंडीज् ह्मणून जीं बेटें आहेत, त्यांपैकीं हें एक बेट आहे. हें कोलंबसानें इ. स. १४९३ या वर्षीं दुसऱ्या सफरींत शोधून काढिलें, व त्या ठिकाणीं स्पेनचा अंमल त्यानें सुरू केला. हा अंमल फार जुलमी होता.

† इ. स. १५३१ या वर्षीं पिझारो यानें हा देश जिंकून स्पेनच्या अंमलाखालीं आणिला, तो सुमारें इ. स. १८१० पर्यंत याचेकडे होता, व पुढें स्वतंत्र झाला.

सन १७८४ ह्या वर्षी पिट्ट साहेबानें जी दोन प्रकारची राज्यव्यवस्था सुरू केली, तिला अनुसरून कंपनीला चालण्याचें असल्यामुळें इंग्लंडांतील प्रधानमंडळाचें अंग असल्याशिवाय कोणत्याही प्रकारचें अन्यायाचें कृत्य करणें कंपनीला अशक्य होतें. इंग्लिश प्रधानमंडळांत अशा प्रकारचें महत्वाकांक्षेच्या संबंधानें अन्यायाचें वर्तन नसेल असें नाहीं. तथापि व्यापाराकरितां स्थापन झालेल्या कंपनीच्या अघोर पातकांकडे अगदींच कानाडोळा करण्याइतकें नीचत्व त्या प्रधानमंडळांत खचीत नव्हतें.

वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, पिट्ट साहेबाचा हिंदुस्थानसंबंधीं ठराव पसार झाल्यापासून हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेसंबंधीं संपूर्ण अधिकार कंपनीच्या हातांतून गेला. ह्मणून त्या वेळेपासून व्यापारोत्तेजनाकरितां हातीं घेतलेलीं कामें व्यापारानपेक्षित गृहस्थांच्या देखरेखीखालीं आलीं. त्या वेळेपासून दोन मुख्य मुत्सद्यांकडे हिंदुस्थानांतील सर्व महत्वाचे प्रश्नांचा निकाल करण्याचें काम आलें; एक गव्हर्नर जनरल, व दुसरा ‘ बोर्ड आफ् कंट्रोल ’ सभेचा अध्यक्ष. तशांत ही कंपनी कायम होती तोंपर्यंत विशेष सत्ता गव्हर्नर जनरलच्या हातांत असून, बोर्डाच्या अध्यक्षाचा अधिकार बराच कमी होता. ही व्यवस्था चालू असतांनाच हिंदुस्थानचा बराच भाग जिंकण्यांत आला, ह्मणून त्या वेळेपासून व्यापारवर्धनाची इच्छा प्रदेश जिंकण्याचे कामांत तादृश दृष्टोत्पत्तीस येणारी नव्हती, हें उघड आहे.

तसेंच इ. स. १७९८ ह्या वर्षी लॉर्ड वेल्स्ली गव्हर्नर जनरलचे जाग्यावर आल्यापासून हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत एका नवीन काळाची सुरुवात झाली. देशी राजांच्या कज्जेभांडणांत इंग्रज लोकांनीं मध्यस्थी करून त्यांचे मुलूख खालसा करण्याचें तत्व प्रथमतः ह्या साहेबांनीं

घालून दिलें. त्यांचाच कित्ता पुढें लॉर्ड हेस्टिंग्स् यांनीं चालू ठेविला. हेच लॉर्ड हेस्टिंग्स् गव्हर्नर जनरल होण्याचे पूर्वी इंग्लंडांत असतां ह्या व्यवस्थेच्या विरुद्ध होते. अखेरीस पुनः एकवार त्यांच्या पद्धतीचें अनुकरण धर्मगृहित झालेल्या पुरुषाप्रमाणें कंपनीच्या अंमलांतील शेवटचा गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यानें केलें.

ज्या रीतीनें हिंदुस्थान देश जिंकण्यांत आला, तीही अशीच आहे. ह्या पद्धतीचा आणखी सूक्ष्म रीतीनें विचार करण्यास येथें अवकाश नाहीं. आमचें इतकेंच सांगणें आहे कीं, ह्या पद्धतींत व्यापाराकडे लक्ष एकसारखें होतें असें नाहीं; ह्मणूनच ही पद्धत चालू ठेवण्यास कंपनीचें अनुमोदन नव्हतें इतकेंच नाहीं, तर कंपनीचें मत अगदीं उलट होतें. लॉर्ड वेल्स्लीचे उद्देशाचे उलट कृत्यें कंपनीकडून घडत असत. लॉर्ड हेस्टिंग्स् याची तर कंपनीनें अगदीं निर्भर्त्सना केली आहे. लॉर्ड डलहौसीच्या कृत्यांस मात्र त्यांनीं कांहीं अपवाद आणिला नाहीं. परंतु त्याचें कारण इतकेंच कीं, त्याच्या वेळेस कंपनीचे व्यवस्थापक केवळ नांवाचे असून, कंपनीचें हितानहित पाहण्याचें त्यांनीं सोडून दिलें होतें. ही पद्धत केवळ अतिशय जबरदस्तीनेंच चालू करण्यांत आली होती. विशेषेंकरून लॉर्ड डलहौसी तर इतिहासांत फ्रेड्रिक धि ग्रेट राजाच्या मासल्याचा दिसतो. फ्रेड्रिक राजानें सायलेशिया प्रांत बलात्कारानें घेतला, व पोलंड देशाचे विभाग केले, हें जसें अन्यायाचें वर्तन ह्मटलें जातें, तद्वतच लार्ड डलहौसीचें वर्तन होतें. लॉर्ड डलहौसीचे अपराधही फ्रेड्रिकच्या अपराधांसारखेच होते; ह्मणजे जरी त्यांत अत्यंत महत्वाकांक्षा व्यक्त होत होती, तरी ती केवळ स्वार्थाकरितां धारण केलेली नव्हती. लॉर्ड डलहौसीवर अगर वार्न हेस्टिंग्स् ह्याच्यानंतर झालेल्या दुसऱ्या कोणत्याही गव्हर्नर जनरलावर अत्यंत नीच अशा केवळ स्वार्थी लोभा-

विष्टपणाचा आरोप तिळमात्रही आणतां येणार नाहीं. ह्मणून हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्याचा प्रारंभ जरी व्यापारामध्यें झाला व त्याजपासून घडलेल्या परिणामांत आजच्या अवाढव्य व्यापाराची जरी गणना आहे, तरी ह्या महोद्योगाची कृप्ति मूळ व्यापारनिष्णात पुरुषांनीं काढलेली नसून तिचा हेतुही व्यापार नव्हता. हें इतक्या विवेचनावरून वाचकांस स्पष्ट झालें असेल.

प्रकरण सातवें.

अंतर्बाह्य संकटें.

एखाद्या राष्ट्राची चिरस्थायिकता पहाण्याचीं कांहीं स्पष्ट प्रमाणें आहेत. ज्यांना ह्मणून राजनीतिशास्त्राचा अभ्यास कर्तव्य आहे, त्यांना हीं प्रमाणें मुखोद्गत असलीं पाहिजेत. ह्यांपैकीं कांहीं प्रमाणें त्या राष्ट्राच्या अंतःस्थितीस लागणारीं असून, कांहीं बाह्य स्थितीस लागणारीं असतात. एखाद्या मनुष्याचा विमा काढवावयाचा असला, तर त्याच्या जीविताची किंमत करितांना विमा काढणारी मंडळी प्रथम वैद्यक्रिया जाणणाराचें मत घेते. तो वैद्य तरी त्या मनुष्याची नाडी पाहून व त्याचें ह्रदय वगैरे तपासून आपलें मत देतो. परंतु ह्याशिवाय, विमा काढविणाऱ्या गृहस्थाचे व्यासंग काय आहेत, त्याच्या संवई वगैरे कशा आहेत, अशा प्रकारच्या आणखी बाह्य संकटांनीं त्याच्या जीवितास कांहीं धोका येणारा आहे कीं काय, हेंही विमा घेणाऱ्या मंडळीस पहावें लागतें. ह्या उदाहरणावरून अंतस्थ व बाह्य ह्यांचा अर्थ वाचकांस व्यक्त झालाच असेल. आतां हिंदुस्थानांतील इंग्लिश राज्यपद्धतीच्या संबंधानें अंतस्थ प्रमाणें आह्मीं इतका वेळ लावून पाहिलीं आहेत, तीं अशीं. राज्याचा पाया मजबूद आहे किंवा नाहीं, हें ठरविणें. प्रत्येक राष्ट्रामध्यें राजसत्ताधारी पुरुष आणि प्रजा ह्या दोन मुख्य गोष्टी असतात. परंतु ह्यांशिवाय तिसरी एक गोष्ट असते; तिकडे बहुतकरून कोणाचें लक्ष फारसें लौकर जात नाहीं. तथापि ही गोष्ट दुर्बोध नाहीं. सरकार आणि प्रजा ह्यांशिवाय, त्या प्रजांवर सरकारचा अंमल कायम राहण्यास ज्या शक्तीची त्या सरकारास जरूर आहे, ती शक्ति ही तिसरी गोष्ट होय. ज्याप्रमाणें ही शक्ति जास्त असेल, अगर

सरकारी अंमल कायम राखणाऱ्या साधनांची शक्ति व हा अंमल मोडून टाकणाऱ्या साधनांची शक्ति ह्यांचें जें प्रमाण असेल, त्या प्रमाणानें राज्याचा चिरस्थायिपणा मोजावयाचा आहे. आतां हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य कायम राखण्याचीं जीं साधनें आहेत, त्यांच्या शक्तीविषयीं इतका वेळ बराच विचार करण्यांत आला आहे; तरी हा विचार करितांना आमच्यापुढें असा प्रश्न होता कीं, ह्या राज्याची शक्तीच्या मानानें आज स्थिति काय आहे. परंतु, हें राज्य पुढें किती दिवस टिकण्याचा संभव आहे, असा प्रश्न मनांत धरून वरील विचार केलेला नाहीं. तर हा दुसरा हेतु मनांत धरून मागील प्रकरणांत केलेले विचार पुनरपि तपासून पाहिले पाहिजेत.

इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेप्रमाणें हिंदुस्थानचें राज्य लोकमतावर अवलंबून नाहीं. तसेंच लोकांनीं आपल्या वतीनें नेमलेल्या मंडळ्यांकडून हिंदुस्थानांतील इंग्रज सरकारची स्थापना झाली आहे, असेंही नाहीं. जाति, धर्म, आचार, विचार वगैरे सर्व गोष्टींच्या संबंधानें राजा व प्रजा यांजमध्यें हिंदुस्थानांत पूर्ण परकीयपणा आहे. ह्या राज्याचीं एक शाखा अशी आहे कीं, तिच्याशिवाय राज्य कायम राहणारच नाहीं, असें ह्मणतां येईल. ती शाखा ह्मणजे फौज होय. ह्या सैन्यापैकीं एक भाग गोरे लोक आहेत, व बाकीचे काळे आहेत. गोरे आहेत तेवढे मात्र नेहमीं इंग्रजांचाच पक्ष धरून त्यांजबरोबर जीव देण्यास तयार राहतील. परंतु हें इंग्रजी सैन्य एकंदर सैन्याच्या एक-तृतीयांशापेक्षांही कमी आहे. दुसऱ्या दोन तृतीयांश सैन्याच्या मनांत राज्यकर्त्यांविषयीं अनुराग असण्यास कारण नाहीं. आपल्या धन्यावर एकनिष्ठ भक्ति ठेवण्यांत शूर शिपायांस जो अभिमान वाटणारा आहे, तो व त्यांचा पगार, हीं मात्र राज्यकर्त्यांच्या बाजूस सैन्याचीं मनें

कायम राखणारीं बंधनें आहेत. ब्रिटिश राज्याची दृश्य बळकटी इतकीच आहे; परंतु ह्याशिवाय अदृश्य असें प्रजेच्या मनःसंतोषसंबंधीं एखादें राज्यास बळकटी आणणारें कारण प्रजेच्या मनांत जागृत आहे किंवा नाहीं, हें पाहिलें पाहिजे. ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना बराच मतभेद होण्याचा संभव आहे. कित्येकांस सहज असें वाटेल कीं, शंभर वर्षांपूर्वीं सर्व देशभर पूर्वापार झोटिंगपाछाई चालत असल्यामुळें सर्व देशाची जी नासाडी होत चालली होती, तिचा इंग्रज लोकांनीं अंत केला, व दुसऱ्या कित्येक उपयुक्त सुधारणाही केल्या. हे इंग्रज लोकांचे ह्या देशावर मोठे उपकार आहेत, असें सर्व लोकांस वाटून, ते नवीन राज्यव्यवस्थेचे साह्यकर्तेच होतील. परंतु अशा प्रकारचें अभिमानी मत एकदम देणें धाडस केल्यासारखें होईल. सार्वजनिक हित ह्मणजे काय, सर्वांनीं एकमतानें वागलें असतां केवढें कल्याण होतें, व त्याच्यापुढें स्वार्थ किती तुच्छ मानला पाहिजे, ह्या सर्व गोष्टी पूर्णपणें हिंदुस्थानांतील लोकांस अवगत आहेत, असें, विचार केल्याशिवाय, गृहीत घेण्यास आपल्यास काय आधार आहे? ही गोष्ट गृहीत घेणें, ह्मणजे ज्या गोष्टींचा हिंदु लोकांत अभाव आहे ह्मणून मागें दाखविण्यांत आलें आहे, त्याच गोष्टी हल्लीं अस्तित्वांत आहेत, असें ह्मटल्यासारखें होईल. हिंदुस्थानांतील लोकांचें एकमत ह्मणजे राष्ट्रीयत्व मुळींच नाहीं; ह्याचा अभाव आहे, ह्मणूनच इंग्रजी अंमलापासून सर्वत्रांस एकंदर सार्वजनिक सुख किती होत आहे, ह्याचा विचार न करतां, उलट प्रत्येक भिन्न जातीच्या लोकांस पृथक्पणें इंग्रजी अंमलापासून काय काय संकटें भोगावीं लागत आहेत, ह्याचाच लोक अगोदर विचार करतात. मुसलमान लोकांस वाटत असेल कीं, आपल्या धर्मास इंग्रजी अंमलापासून पुष्कळ अपाय झाला आहे. ब्राह्मणांस वाटत असेल कीं, आपलें

पूर्वीचें समाजसंस्थेंतील वर्चस्व कमी झालें आहे. देशी राजांस वाटत असेल कीं, आपले मानमरातब बरोबर राहत नाहींत. इंग्रजी अंमलापासून सर्वांत मोठा फायदा हिंदु रयतेस हा झाला आहे कीं, जिकडे तिकडे अंदाधुंदी व लुटालूट चालत असे, ती बंद झाली व भाड्यानें आणलेल्या सैन्यास आपलें सर्वशक्तित्व पूर्ण वाटून पाहिजे तशी नासाडी करण्यास फावत असे, तीही आतां बंद झाली आहे. ह्या फायद्याचें खरें महत्व फक्त एका वर्गासच विशेषेंकरून कळत आहे. हा वर्ग संख्येनें मोठा आहे. तरी त्याचें देशांत वजन नाहीं, व हा फायदा फार वेळ त्याच्या लक्षांत राहणाराही नाहीं. हिंदुस्थानांत हा वर्ग सर्वत्र मोठा आहे. हा वर्ग ह्मणजे शेतकरी लोक. जीव जगविण्याच्या दुर्घट विचारांत हे सर्वदां मग्न झालेले असतात. शरीर व जीव ह्यांस एकत्र राखण्यामध्यें ते आपली सर्व बुद्धि व सामर्थ्य खर्च करितात. लुटालूट, मारामार, कत्तल वगैरेपासून ह्यांना भयंकर दुःखें सोसावीं लागत असत. ते मात्र इंग्रजी अंमलाखालीं संतुष्ट असतील खरे. परंतु लुटारू लोकांस बहुतकरून संतोष वाटत नसेल, व अशाच लोकांचें वजन फार जास्त आहे. तसेंच हिंदुस्थानांत मोंगलांचा अंमल चालू असतांना ज्या लोकांचें वजन विशेष असे; ज्यांच्या नेमणुका मोठमोठ्या हुद्यांच्या कामावर होत असत; जे राज्यकर्त्यांच्या जातीचे व धर्माचे असत; अर्थात् ज्यांचें राज्यकर्त्याविषयीं नातें अत्यंत महत्वाचें असण्याचा संभव आहे; अशा सर्व लोकांस इंग्रजी अंमलापासून कांहींना कांहीं तरी तोटे सोसावे लागले आहेत. तसेंच हिंदु लोकांस उच्चतेस आणण्याचे जे कांहीं प्रयत्न औपकारिक बुद्धीनें इंग्रज लोकांकडून करण्यांत येत आहेत, त्यांचा परिणाम उलट होत आहे: ह्मणजे लोकांची हिंमत नाहींशी होत आहे, व ही गोष्ट अशा थरास गेली आहे कीं,

पुष्कळ लोकांस तर अतोनात दुःखें सोसावीं लागत आहेत. 'हिंदुस्थानांतील मुसलमान लोक' ह्या नांवाचें डाक्टर हंटर ह्यांनीं एक पुस्तक केलें आहे, त्यांत ह्या विषयाचें सविस्तर वर्णन आहे. अशी एकंदर स्थिति आहे. ह्मणून इंग्रजी अंमलापासून कित्येक ठिकाणीं लोकांचे मनांत राज्यकर्त्यांविषयीं जरी थोडासा प्रेमभाव उत्पन्न झाला आहे, तरी कित्येकांचें वजन व अधिकार इंग्रजी अंमलांत कमी झाल्यामुळें जो असंतोष उत्पन्न झाला आहे, तो पूर्णपणें नाहींसा करून टाकण्याइतका प्रेमभाव लोकांच्या मनांत उत्पन्न झालेला नाहीं, हें निर्विवाद आहे.

ह्यावरून असें दिसतें कीं, इंग्रजी राज्याची बळकटी सैन्यावर अवलंबून आहे. या सैन्यापैकीं दोन—तृतीयांश लोक राज्यकर्त्यांचे संबंधानें केवळ भाड्याचे आहेत. एवढ्या अवाढव्य देशाचे मानानें वरील बळकटी ह्मणजे कांहींच नाहीं असें कदाचित् कोणास वाटेल, तर त्याचेच बरोबर सामना करण्याचा प्रसंग आला असतां, त्या पक्षाची बळकटी किती आहे, हें पाहिलें पाहिजे. हिंदुस्थानची लोकसंख्या मोठी आहे खरी; परंतु पुष्कळ दिवसांच्या संवयीनें व परिणामानें त्यांच्या अंगीं निश्चलता पूर्णपणें प्राप्त झाली आहे. शेंकडों परकीय लष्करी अंमलाखालीं त्याचें सर्वस्व हरण झालें आहे. शत्रूशीं सामना करण्याची कल्पना त्यांच्या मनांत अंशतःही वसत नाहीं. ऐक्याचा लवलेश त्यांच्यांत सांपडणार नाहीं. भिन्न जातींचे अनंत थर एकावर एक बसले आहेत. परस्पराशीं असंबद्ध अशा नानाविध भाषांच्या मिश्रणानें अनेकावयवघटित तऱ्हेतऱ्हेच्या पोटभाषा उत्पन्न झाल्या आहेत. सारांश, कोणत्याही प्रकारचें सार्वजनिक कृत्य सर्वांनुमतें लोकांच्या हातून घडण्याचा तूर्त संभव नाहीं. अखिल राष्ट्रास एकशरीरत्व व एकजीवनत्व असणें हेंच त्या राष्ट्राच्या ऐक्यत्वाचें खरें स्वरूप होय. ह्या

स्वरूपाचा एक लहानसा अंश जरी ह्या हिंदुस्थानांत असला, तरी इतक्या सुलभ रीतीनें इंग्रजांस हा देश आपल्या ताब्यांत ठेवतां येणार नाहीं, हें उघड आहे; परंतु अशा प्रकारचें ऐक्याचें स्वरूप अंशतःही हिंदु लोकांत उत्पन्न होण्याचा आणखी कांहीं दिवस तरी संभव नाहीं, व असें आहे तोंपर्यंत इंग्रजी अंमल बराच निर्भय आहे, असें ह्मणतां येईल. सन १८५७ सालच्या बंडापेक्षां आज इंग्रज सरकारची मजबुदी जास्त आहे. सैन्यामध्यें गोरे व काळे शिपायांच्या संख्येचें जें प्रमाण बंडाचे वेळीं होतें, त्यापेक्षां आज तें प्रमाण जास्त आहे. बंडाचे योगानें आलेल्या अनुभवानुरूप जे कांहीं बंदोबस्त करणें योग्य वाटलें, ते सर्व त्यांनीं केले आहेत. तशा प्रकारचें बंड पुन्हा होणार नाहीं असें नाहीं. परंतु जोंपर्यंत तें केवळ बंड आहे, तोंपर्यंत त्याजपासून ब्रिटिश राष्ट्रास अपाय घडण्यास कांहीं कारण नाहीं. देशी सैन्यावर देशी अंमलदारांची जरूर आहे. जोंपर्यंत योग्य अंमलदार लोकांमध्यें मिळणारे नाहींत; जोंपर्यंत १८५७ सालच्या बंडाप्रमाणें सर्व लोकांचे ग्रह केवळ स्वार्थाचे व स्वदेशाभिमानशून्य आहेत; जोंपर्यंत एका देशी सैन्यास रजा देऊन, दुसरें देशी सैन्य तयार करण्याची सरकारास सवड आहे; तोंपर्यंत ब्रिटिश राज्यास प्रस्तुत विचारणीय अंतःस्थितीपासून कांहीं भीति नाहीं, असें मानण्यास चिंता नाहीं. परंतु वरील ह्मणण्यांतही कांहीं कांहीं भीतीच्या गोष्टी गर्भित आहेत. प्रथम असें कीं, हिंदु लोकांचा स्वभाव चंचल आहे, ह्मणून जें वर ह्मणण्यांत आलें आहे, तें केवळ हिंदु लोकांस मात्र विशेष लागू आहे. मुसलमान लोकांचे परिपाठ व व्यवसाय हे हिंदु लोकांच्याहून अगदीं भिन्न आहेत. आज ते पुष्कळ शतकेंपर्यंत हिंदु लोकांप्रमाणें दुसऱ्या अंमलाखालीं वागत आलेले नाहींत. थोड्याच वर्षांपूर्वीं राजसत्ता आपल्या हातांत होती, हें त्यांच्या मनांत नेहमीं घोळत आहे. दुसरें असें कीं; सर्व प्रकारची

एकी जरी हिंदु लोकांत नाहीं, असें ह्मणण्यांत आलें आहे, तरी धर्मैक्य त्यांच्यांत नाहीं असें नाहीं. एक तर मुसलमानी धर्माचीं एकी करण्याचीं बंधनें फारच बळकट आहेत. तसेंच ब्राह्मणधर्म त्याच्याइतका तीव्र नाहीं, तरी त्यांतही पुष्कळ तथ्य आहे. ऐक्योत्पादनाची शक्ति त्याच्यांत आहे. 'हिंदुस्थानांतील मुसलमान लोक' ह्मणून डाक्टर हंटरचें जें पुस्तक आहे, त्यांत 'आमच्या ताब्यांतील मुलुखांत पूर्वापार चालत आलेलीं कारस्थानें' ह्मणन एक भाग आहे. त्यांत धर्मसंबंधीं तंटे पुष्कळ दिवसपर्यंत कसे जारीनें चालू होते, याचें वर्णन केलें आहे. वाहबी ह्मणून कोणी मुसलमान धर्मोपदेशक होते. ते लोकांच्या पूर्वजांच्या कर्तृत्वांची त्यांस आठवण देऊन, त्यांजबद्दल त्यांचा अभिमान जागृत करीत. हिंदुस्थानचें स्वामित्व मुसलमानांकडे असून नुकतेंच इंग्रज सरकाराकडे आल्यामुळें सर्व लोकांचीं मनें इंग्रज सरकाराविरुद्ध क्षुब्ध होत असत. (डाक्टर हंटरचें हें ह्मणणें आहे. इतरांस तें संमत नाहीं.) इंग्रज सरकारचा पूर्ण पगडा मुसलमानांवर बसल्यामुळें त्यांच्या मनांत अतिशय तीव्र कोप उत्पन्न होत असे. ब्राह्मण धर्म जरी दृढ आहे, तरी तो स्वीकारण्याविषयीं लोकांची प्रवृत्ति त्वरित करण्याची शक्ति त्याच्यांत नाहीं. तथापि सन १८९७ सालच्या बंडाचे वेळेस काडतुसांच्या* क्षुल्लक गोष्टीनें राज्यकर्त्यांची कशी त्रेधा उडविली, तें सर्वांस

* काडतुसांचा प्रकारः—इ. स. १८५७ च्या आरंभीं सरकारानें बंगाल्यांतील शिपायांच्या पलटणींस नवीन प्रकारच्या निघालेल्या बंदुकी दिल्या. आणि त्यांच्या उपयोगास बेताचीं नवीं काडतुसें करण्याचा कारखाना, कलकत्त्यापासून चार पांच कोसांवर दमदम ह्मणून एक लष्करच्या छावणीचें गांव आहे, तेथें घातला. काडतुसें कशाचीं करितात व त्यांत कांहीं अमंगळ पदार्थ घालतात कीं काय, ह्याविषयीं प्रथमतः कोणालाही संशय आला नाहीं. सर्व काम यथास्थित चाललें होतें. परंतु तेथें एके दिवशीं अशी एक चमत्कारिक गोष्ट घडली कीं, ती कानीं पडल्याबरोबर हिंदु व मुसलमान शिपायांचीं मनें एकदम सरकारावर उठलीं. ती गोष्ट अशी. कोणी

स्मरतच असेल. इ. स. १८५७ सालच्या बंडाचें स्वरूप मुख्यत्वेंकरून जरी लष्करीच होतें, तरी त्याच्या मुळाशीं धर्माचेंच बीज होतें. आपल्या धर्मावर हल्ला होत आहे, असें जर सर्व हिंदु लोकांस कळलें, तर त्याजपासून काय परिणाम होतील, हें त्या बंडावरूनच व्यक्त होत आहे. धर्मप्रकरणीं मतांचा पाश्चिमात्य शास्त्रशिक्षणाशीं विरोध नसला, म्हणजे त्या शिक्षणानें लोकांचीं मनें स्वस्थ राहतील. मुसलमानी धर्मांत जरी हा वरील विरोध आहे, तरी हिंदु धर्मांत नाहीं. धर्मस्वातंत्र्याचें सर्वमान्य व पवित्र तत्व अप्रतिहत ठेविलें जाईल, असें राज्यकर्त्यांकडून रयतेस नेहमीं स्पष्ट आश्वासन मिळत असल्यामुळेंच त्यांचे हुकूम लोक पाळीत आहेत. परंतु पाश्चिमात्य शास्त्र शिकविणें हाच हिंदु धर्मावर एक प्रकारचा हल्ला आहे, असें जर हिंदु लोक समजूं लागले, तर काय बरें स्थिति होईल?

एक ब्राह्मण शिपाई, स्नान करून, हातांत पाण्यानें भरलेला गडवा घेऊन, रस्त्यानें आपल्या बिऱ्हाडाकडे चाळला होता. त्याला त्या कारखान्यांतला नीच मानलेल्या जातीचा एक चाकर भेटला. त्यानें त्या ब्राह्मणापाशीं पाणी प्यावयास मागितलें; तेव्हां ब्राह्मणानें त्यास उत्तर दिलें कीं, "गडवा तुला दिला, तर तो विटाळेल, म्हणून मी तुला देत नाहीं." हें ऐकून त्या चाकरानें त्यास दबकावून सांगितलें कीं, "तुम्ही लोक जात जात म्हणून फार उड्या मारतां आहां; जरा दमाखालीं घ्या; आतां जीं काडतुसें तयार होत आहेत, त्यांना गाईची व डुकराची चरबी लावीत असतात; तीं काडतुसें कांहीं वेळानें साहेब लोक तुम्हांला दांतांनीं तटातट तोडायास लावितील; मग आम्हीच पाहूं तुमची जात किती सोंवळी आहे ती". ही बोलाचाली होतांना तेथें कितीएक लोक जमले. त्यांनीं ती ऐकिली. ही झालेली हकीकत त्या ब्राह्मणानें व इतर लोकांनीं बाहेर सांगून जिकडे तिकडे पसरिली. गाईचें नांव घेतल्याबरोबर हिंदूंच्या अंगावर रोमांच उभे राहिले, व डुक्कर हा शब्द कानीं पडतांच मुसलमान शिपायांचीं देहभानें सुटलीं. एकंदर दोन्ही जातींच्या लोकांस खचीत वाटलें कीं, सरकार आपले धर्म बुडवावयाचा यत्न करीत आहे, व तें आपणां सर्वांस जुलुमानें ख्रिस्ती करणार आहे, हें नीट नाहीं; त्याचा प्रतिकार आपण अवश्य केला पाहिजे. ह्याप्रमाणें धर्माचा आवेश त्या लोकांचे अंगांत संचरला. (हिं. क.)

ह्यावरून असें दिसतें कीं, एखाद्या राष्ट्रामध्यें ऐक्यापेक्षां धर्मसंबंधीं चळवळ लवकर उत्पन्न होते. आणखी असें आहे कीं, एखाद्या देशांत दोन धर्म जारीनें चालू असतील, तर त्यांच्या निरनिराळ्या जोरांचा एकमेकांवर अंमल चालून दोहोंची शक्ति नाहींशी झाली, ह्मणजे त्याजपासून स्वस्थता अगर समतोलता ह्मणून परिणाम उत्पन्न होईल. ही गोष्ट पदार्थविज्ञानशास्त्रांतल्याप्रमाणेंच येथेंही लागू आहे. मुसलमानी धर्म आणि हिंदु धर्म ह्यांचा परस्पर फार विरोध आहे. मुसलमान लोक आपल्या धर्माचे कट्टे भक्त आहेत. धर्मसंबंधांत हिंदु लोक त्यांच्या इतके कडवे नाहींत. तथापि हिंदु धर्म पाळणाऱ्या लोकांची संख्या मुसलमानांपेक्षां फार मोठी आहे. ह्यामुळें ह्या देशामध्यें एक प्रकारची समतोलता उत्पन्न झाली आहे. ह्या दोन विरुद्ध धर्मामध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रवेश होऊन त्या दोहोंचा विरोध कधीं तरी नाहींसा होईल, अशी कल्पना करितां येण्यासारखी आहे. मुसलमानी धर्म हा सेमिटिक* धर्माचें अगदीं प्रथमचें स्वरूप होय. परंतु ब्राह्मणी

---

* सेमिटिक धर्मः—ह्या जगांतील मनुष्यांच्या जाति, त्यांच्या भाषा, त्यांचे धर्म, व त्यांचे आचारविचार, या सर्वांचा विचार करून त्यांची उत्पत्ति कशी झाली व हल्लींची स्थिति त्यांस कसकशी प्राप्त होत आली, ह्याजबद्दल पुष्कळ शोध अलीकडेस लागले आहेत. त्यांत विशेषेंकरून असें दिसून आलें आहे कीं, हल्लीं ज्या भाषा, धर्म, व जाति पश्चिमेकडे युरोपांत वगैरे उन्नतीस आल्या आहेत, त्यांची मूळ उत्पत्ति पूर्वेकडे ह्मणजे अशिया खंडांत आहे. आर्य लोकांचें मूळ ठिकाण युरोप व आशिया ह्यांच्या मध्यंतरीं कोठें तरी असावें, असा अर्वाचीन भाषाशास्त्रज्ञांचा सुमार आहे, व तेथून पूर्वेकडे व पश्चिमेकडे ह्या लोकांच्या निरनिराळ्या टोळ्या दूरदूरपर्यंत वसाहत करण्यास गेल्या असाव्या, असें अलीकडे सर्वांचें मत झालें आहे. एकंदर भाषांच्या दोन शाखा कल्पिल्या आहेत. ह्यांस आर्यन व सेमिटिक अशीं नांवें आहेत. पहिल्या शाखेंत आठ मोठमोठे भेद आहेत तेः—संस्कृत, इराणी, ग्रीक, इटालियन, जर्मन इत्यादि होत. इंग्रजी भाषेची उत्पत्ति ह्या जर्मन भाषेच्या पोटशाखेपासून आहे. सेमिटिक शाखेंत हीब्रू, अरबी, अरमानी, सिरिअन वगैरे भाषांचा समावेश

धर्म हा सुधारलेल्या आर्य लोकांच्या प्रौढ विचारांचें स्वरूप आहे. ख्रिस्ती धर्म हा सेमिटिक लोक व आर्य लोक ह्यांच्या विचारांचें पूर्ण मिश्रण होऊन बनलेला आहे. अशा मिश्रणानें उत्पन्न झालेला दुसरा धर्म सर्व जगांत नाहीं. ह्यावरून युरोपामध्यें चालू असलेल्या धर्मांचीं सेमिटिक व आर्य हीं भिन्न घटकद्रव्यें एकवट झालेलीं आहेत. फरक इतकाच कीं, युरोपांतील ख्रिस्ती धर्मांत त्या घटकद्रव्यांचा पूर्णपणें मिलाफ झाला आहे. हिंदुस्थानामध्यें ह्या दोन तत्वांचा मिलाफ न होतां, मुसलमान व हिंदु ह्या दोन भिन्न स्वरूपांनीं तीं घटकद्रव्यें एकमेकां-पासून अगदीं अलिप्त राहिलीं आहेत. हल्लीं हिंदुस्थानामध्यें मुसल-मानी धर्म आणि ब्राह्मणी धर्म ज्याप्रमाणें पृथकपणें प्रबल आहेत, त्याच-प्रमाणें ज्युडेइज़म् ह्मणजे ज्यू लोकांचा धर्म व आरंभींच्या मूर्तिपूजक लोकांचा धर्म हे युरोपांत ख्रिस्ती धर्माच्या आरंभीं पृथक होते.

हिंदुस्थानामध्यें हीं द्रव्यें भिन्न राहिलीं आहेत. त्यांचा मिलाफ

होतो. ह्या भाषेच्या शोधापासून निरनिराळ्या मनुष्यजातींच्या उत्पत्तीचे शोध लागले आहेत. वरील भाषा जीं राष्ट्रें बोलतात, त्यांच्या त्या भाषांवरून बरप्रमाणेंच आर्य राष्ट्रें व सेमिटिक राष्ट्रें अशा दोन शाखा केलेल्या आहेत. त्याचप्रमाणें त्यांच्या धर्मांचेही हेच दोन वर्ग मानले आहेत. ह्या शोधांचें मूळ कारण संस्कृत भाषा होय. ह्या शास्त्राच्या योगानें मनुष्यजातीच्या अत्यंत प्राचीन इतिहासाची एक मोठी गोष्ट अगदीं निर्विवाद सिद्ध होते; ती ही कीं, युरोपांतील बहुतेक राष्ट्रें व इकडचे हिंदु, इराणी वगैरे लोक हे पूर्वीं एकत्र असून, एकच भाषा बोलत होते, व पुढें सर्वांची फूट केव्हां व कशी झाली असल, त्याचा आज कांहींच पत्ता लागत नाहीं. आर्य लोकांच्या मूळ ठिकाणापासून एक टोळी पूर्वेकडे येऊन, इराण देशांत स्थायिक झाली, व दुसरी पुढें पंचनद देशांत जाऊन, तो सुपीक देश तिनें वसविला असावा. ह्यासच पंजाब असें नांव आहे. ही प्राचीन हिंदु लोकांची मूळ जागा होय. मुसळ-मानी भाषांप्रमाणें त्यांच्या धर्मांची गणना सेमिटिक शाखेंत आहे, व सुधारलेला ख्रिस्ती धर्म वगैरे लोकांत आरंभीं उत्पन्न झाल्यामुळें त्याच्यांत वरील दोनही शाखां-चीं कारणें मिसळलेलीं आहेत.

झाला असेल, तर तो अगदीं क्षणिक असावा. शीख लोकांचा धर्म व अकबराचा धर्म ह्यांजमध्यें मात्र या दोन घटकद्रव्यांचें संमेलन झालें असल्याचें दिसतें. युरोपामध्यें ह्याच्या उलट स्थिति घडून आली. ह्या घटकद्रव्यांचा मिलाफ होऊन ख्रिस्ती धर्म बनला. अलीकडे तर हा मिलाफ दिवसेंदिवस ज्यास्तच दृढ होत चालला आहे.

केवळ अंतःस्थ स्थितीचा विचार केला असतां वरच्याप्रमाणें हिंदुस्थानांतील इंग्लिश लोकांच्या राज्यसत्तेचें स्वरूप दिसून येतें. परंतु ह्या राज्याच्या चिरस्थायीपणाचें पूर्ण अनुमान करतां येण्यासाठीं बाह्य कारणांचा परिणाम त्याजवर कसा घडत आहे, तेंही पाहिलें पाहिजे.

हिंदुस्थान देश इतर देशांपासून जितका विभक्त आहे, तितका दुसरा कोणताही देश नसेल. नेर्कस* ह्मणून अलेक्झांडरचा आरमारावरील अधिपति होता. त्याच्या वेळेपासून वास्कोडागामा† हिंदुस्थानांत आला तोंपर्यंत, हिंदीमहासागरांत कोणाही युरोपीयाचें गलबत फिरलें नाहीं. परंतु अरब लोक मात्र अगदीं आरंभापासून ह्मणजे त्यांचा खलीप ओमर‡ ह्याच्या वेळेपासून सिंधप्रांतामध्यें कधीं कधीं येऊन उतरत असत. उत्तर हिंदुस्थान खेरीज करून इतर हिंदुस्थानाचा परदेशाशीं संबंध ह्याशिवाय दुसरा घडून आलेला दिसत नाहीं. एकदां जावा बेटाशीं मात्र संबंध झाल्याचें ऐकिवांत आहे. ह्या ठिकाणींसुद्धां हिंदुस्थानांतील कित्येक गोष्टींचें वजन जावा देशांतील प्रचारांवर पडलें. कवी हें जावा बेटांतील भाषेचें नांव आहे. त्या भाषेंत हिंदु भाषांचें व हिंदु आचा-

---

* हा अलेक्झांडर बादशहाचा सेनापति व आरमाराचा अधिपति होता. त्यानें हिंदी महासागरांत फिरून बरेच शोध लाविले होते.

† टीप.—* पान ९६ पहा.

‡ खलीप ओमर.—(इ. स. ६३४–६४४) महंमदाच्या मागून अबूबेकर खलीप झाला, व अबूबकरच्यानंतर ओमर हा खलीप झाला.

रविचारांचें पुष्कळ मिश्रण दृष्टीस पडतें. पूर्व व पश्चिम बाजूंना हिंदुस्थानच्या द्वीपकल्पाची मर्यादा सागरांकित आहे. त्याचप्रमाणें उत्तरेकडील मैदानाची मैर्यादा विस्तृत व अत्युच्च हिमालयापर्यंत आहे. ह्याच्या योगानें हिंदुस्थान देश बहुशः एखाद्या बेटाप्रमाणेंच आहे. उत्तरेकडून हिंदुस्थानांतील प्रचारांचें वजन मध्य एशियामध्यें पसरत गेलें आहे. कारण, बौद्ध धर्माचा अवाढव्य प्रसार उत्तरेकडून व पूर्वेकडून झाला, परंतु ह्या दिशेकडून राजकीय व्यवहार अगर लढाया घडून आल्याचें दिसत नाहीं. या दिशेस एक नाकें खेरीज करून इतर ठिकाणांहून हिंदुस्थानावर कधींही परकीयांच्या स्वाऱ्या वगैरे झाल्याचें कोणाच्या ऐकिवांत नाहीं.

ह्मणून हिंदुस्थान देश हजारों वर्षेंपर्यंत अगदीं पूर्णपणें पृथक होता, हें उघड आहे. अलेक्झांडर बादशहानें स्वारी केली, तेव्हां त्याला हिंदुस्थानांतील लोकांनीं असें सांगितलें कीं, ‘ ह्यापूर्वी ह्या देशावर परदेशीयांकडून कधींही स्वारी झालेली नाहीं. ’

ह्या पृथकत्वाचा सरते शेवटीं अंत झाला. हिंदुस्थान देश बेट नाहीं, हें उघडकीस आलें. त्याला एक मर्मस्थान आहे. हिमालय पर्वताची ओळ एका ठिकाणीं उल्लंघनीय आहे. इराणांतून अगर मध्य एशियांतून हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा मार्ग अफगाणिस्थानांत आहे. ह्मणून वास्कोडागामाच्या वेळेपर्यंत परदेशाशीं हिंदुस्थानच्या राजकीय व्यवहारांचें वसतिस्थान अफगाणिस्थान होतें. ह्या वायव्येकडील मार्गानें हिंदुस्थानावर निदान आठ तरी मोठाल्या स्वाऱ्या झाल्याचें इतिहासांत आहे.

पहिली स्वारी फार ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. परंतु तिची हकीकत उपलब्ध नाहीं. ती आर्य लोकांनीं केली. ह्याच मार्गानें आर्य लोक हिंदुस्थानांत आले असले पाहिजेत. कदाचित् आर्य लोकांची

उत्पत्तिही अफगाणिस्थानांत झाली असेल. भाषेवरून अफगाण लोक मूळचे आर्यच असावेत असें दिसतें. इराणी लोकांचें धर्मशास्त्र झेंड-आवेस्टा व हिंदुस्थानांतील वेद ह्यांच्यामध्यें बरेंच साम्य आहे. ह्याजवरून अशी कल्पना करण्यास जागा आहे कीं, संस्कृत भाषा बोलणाऱ्या आर्य लोकांचें मूलस्थान हिंदुस्थान आणि इराण ह्यांच्या सरहद्दीवर कोठें तरी असावें.

दुसरी स्वारी अलेक्झांडर बादशहाची इतिहासांत सर्वत्र प्रसिद्ध आहे. पाश्चिमात्यांस हिंदुस्थानांत येण्याचा मार्ग ह्या स्वारीनेंच प्रथमतः खुला केला. परंतु ह्या स्वारीचे परिणाम चिरस्थायी झाले नाहींत. ग्रेको–बाक्ट्रिअन नांवाचें ग्रीक लोकांनीं हिंदुस्थानांत जें राज्य स्थापन केलें तें कांहीं वेळ टिकलें, व शेवटीं त्याचा लय इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकांत झाला.

तिसरी स्वारी पहिलीइतकीच अप्रसिद्ध आहे. तिला सिथियन* लोकांची स्वारी असें ह्मणतात. इसवी सनाच्या पहिल्या शतकांत ज्या कित्येक स्वाऱ्या हिंदुस्थानावर झाल्या, त्या सर्वांस मिळून सिथियन स्वारी असें नांव आहे. संकृतभाषाभिज्ञ विद्यार्थ्यांना ह्या स्वारीचें जरी फार महत्व आहे, तरी आपल्या ह्या प्रस्तुतच्या विवेचनास तिचा तादृश उपयोग नाहीं.

चवथी स्वारी गिजनीच्या महमुदानें इ. स. १००१ ह्या वर्षी केली. ही फार महत्वाची आहे. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य व पृथकत्व हीं दोन्ही या स्वारीनें लयास गेलीं, व जगतांतील इतर राष्ट्रांस हिंदु-

* युरोप आणि आशिया ह्यांच्या मध्यें काळ्या समुद्राचे किनाऱ्यावरील रशियाचे दक्षिण प्रदेशांतील मैदानास सिथिया हें नांव असे. तेथील लोक सिथिअन हे पूर्वी फार प्रसिद्ध होते.

स्थान देश माहीत झाला. कोलंबस आणि कोर्टेझ्* ह्या दोघांनीं मिळून जीं कृत्यें अमेरिकेंत केलीं, तीं एकट्या महमुदानें हिंदुस्थानांत केलीं. त्याच्या वेळेपासून ह्या देशावर परचक्र निर्वेध चाललें आहे. तेव्हांपासून खैबर घाटांतून हिंदुस्थानांत येण्याचा मार्ग हजारों साहसी पुरुषांकडून पादाक्रांत होत आला आहे. पुष्कळ प्रकारांनीं महमूद हा मोंगल लोकांच्या स्वारीचा सूचक होता. तो जातीचा तुर्क असून, अफगाणिस्थानांतील लहानशा संस्थानाचा मालक व धर्मानें मुसलमान होता. हिंदुस्थानामध्यें पुष्कळ मौल्यवान मूर्तींचीं देवालयें आहेत, असें त्याच्या ऐकण्यांत आल्यामुळें हिंदुस्थानावर स्वारी केल्याशिवाय त्यास चैन पडेना. ह्या सर्व गोष्टींत त्याचें मोंगल बादशहा बाबर ह्याच्याशीं निकट साम्य आहे.

पांचवी स्वारी सन १३९८ ह्या वर्षी तैमुर्लंगानें केली. त्या स्वारीनें हिंदुस्थानाचा सर्वस्वीं नाश झाला. तथापि त्यांतही एक प्रकारचें महत्व आहे. तें ह्या स्वारीची सातव्या व आठव्या स्वारीशीं तुलना करतांना चांगलें समजेल.

त्यानंतर सन १५२४ ह्या वर्षी बाबर ह्यानें स्वारी करून, मोंगली राज्याची स्थापना केली. महमदानें ज्या गोष्टींचा पाया घालून ठेविला होता, त्या गोष्टी बाबर व त्याचे वंशज ह्यांनीं जास्त अविच्छिन्नपणें तडीस नेल्या. बाबरच्या पूर्वी जीं मुसलमानी राज्यें हिंदुस्थान देशांत स्थापन झालीं होतीं, त्यांच्यासारखेंच मोंगली राज्य होतें. फरक इतकाच होता कीं, बाबरचें राज्य जास्त दृढ व जास्त चिरस्थायी होतें.

सातव्या व आठव्या स्वाऱ्या तैमुर्लंगाच्या स्वारीप्रमाणेंच फार

---

* टीप.—१ पान ८८ पहा.

हानिकारक झाल्या. पहिली नादिरशहानें केली. इराणामध्यें सोफी वंशाचा पाडाव करून, नादिरशहानें तेथील गादी बळकाविली होती. इ. स. १७३९ ह्या वर्षी त्यानें हिंदुस्थानावर स्वारी केली. त्या वेळीं मोंगली राज्याचा फार जलद ऱ्हास होत चालला होता. दुसरी स्वारी सन १७६० ह्या वर्षी अहंमदशहा अबदाली ह्यानें केली. हा दुराणी लोकांचा बादशहा अफगाणिस्थानांत राज्य करीत असे.

अशा प्रकारें हिंदुस्थानावर मुख्य स्वाऱ्या झाल्या आहेत. त्यांचें निरीक्षण केलें असतां, असें दिसतें कीं, हिंदुस्थान देशाचें जमिनीवरून प्रवेश होण्याजोगें फक्त एकाच ठिकाणीं मर्मस्थान आहे. परंतु हें मर्मस्थान फारच सुभेदनीय आहे, यांत संशय नाहीं. पुष्कळ काळ-पर्यंत ह्या मर्मस्थानाचा शोध लागला नव्हता. परंतु गिझनीच्या महंमदाच्या वेळेपासून तर हिंदुस्थानावर स्वाऱ्या फार सुलभ रीतीनें होत आल्या आहेत. त्यानंतरच्या हिंदुस्थानच्या इतिहासाचें स्वरूप ह्या स्वाऱ्यांनींच निश्चित आहे. ह्या स्वाऱ्या करणाऱ्या लोकांस हिंदुस्थानाकडून तिळमात्रही प्रतिकार झाला नाहीं. इंग्लिशांच्या हातीं हिंदुस्थानचें स्वामित्व जाईपर्यंत हिंदुस्थानचा इतिहास खालीं लिहिल्याप्रमाणें थोडक्यांत सांगतां येईल. प्रथम हा देश अफगाणिस्थानांतून मुसलमान लोकांनीं दोन वेळ स्वारी करून जिंकिला. त्यानंतर मुसलमानांविरुद्ध एक मोठा पुंडावा माजला, ह्मणजे दक्षिणेंमध्यें मराठे प्रबळ झाले. येणेंप्रमाणें तिघांच्या हातीं हिंदुस्थानचें स्वामित्व गेलें. पुढें प्रथम क्रमाक्रमानें दोनही मुसलमानी राष्ट्रांचें व नंतर मराठ्यांचें, याप्रमाणें अखेरीस तिघांचेंही स्वामित्व लयास गेलें. असें होण्यास कारण अफगाणिस्थानांतून आणखी तीन स्वाऱ्या हिंदुस्थानावर झाल्या, हें होय. ही गोष्ट अशी कशी झाली, हें समजण्याकरितां वरील दोन

मुसलमानी सत्तांपैकीं दुसरी सत्ता ह्मणजे मोंगल लोकांचें राष्ट्र हें लयास कसें गेलें हें पाहिलें पाहिजे. मोंगली सत्ता लयास जाण्याचें शेवटचें कारण दक्षिणेमध्यें तें वाढविण्याकरितां औरंगजेबानें मूर्खत्वानें केलेले प्रयत्न होत. येणेंकरून औरंगजेब मृत्यु पावतांच मोंगली राज्याचा ऱ्हास व्यक्त झाला. तरी ह्या वेळेस मोंगली राज्यास दुखणें आलें, इतकेंच ह्मणतां येईल. केवळ मृत्यु प्राप्त झाला असें ह्मणतां येणार नाहीं. पुढें सन १७३९ त नादिरशहानें मोठी झपाट्याची स्वारी केली, तेव्हांच त्यास मृत्यु प्राप्त झाला. नादिरशहानें दिल्ली शहर व मोंगलांचा खजिना पूर्णपणें लुटला. त्यानंतर मोंगलांनीं डोकें वर काढलेंच नाहीं. तसेंच त्या वेळीं मराठ्यांची सत्ता बरीच वाढली होती. सर्व हिंदुस्थानभर मराठ्यांचा एकछत्री अंमल होईल, असा सुमार दिसूं लागला होता. परंतु हा सुमार दिसूं लागतो आहे, तोंच सन १७६१ ह्या वर्षी अहंमदशहा अबदालीनें हिंदुस्थानावर स्वारी करून पानिपतच्या लढाईमध्यें मराठ्यांचा पूर्णपणें नाश केला. (ह्या लढाईमध्यें २,००,००० लोक मारले गेले.) ह्या गोष्टीस अजून फार दिवस झाले नाहींत. ही झाली तेव्हां इंग्रज लोकांचा बंगाल प्रांतांत नुकताच प्रवेश होऊं लागला होता. येणेंकरून अफगाणिस्थानाकडून दोन स्वाऱ्यांनीं दोन सत्तांचा नाश केल्याचें वर कथन करण्यांत आलें आहे. तिसऱ्या स्वारीनें तिसऱ्या सत्तेचा नाश केल्याचें सांगण्याचें उरलें आहे. महंमद तघलखाच्या वेळेस मुसलमानांची सत्ता हिंदुस्थानामध्यें बरीच वाढली होती. तिचा लय तैमुर्लंगानें चवदाव्या शतकाच्या अखेरीस केला.

ह्यावरून असें कळून येईल कीं, उत्तरेकडून हिंदुस्थानावर स्वाऱ्या करण्याचा मार्ग महंमुदानें खुला केला. त्याचप्रमाणें समुद्राकडून स्वारी करण्याचा मार्ग पाश्चिमात्यांपैकीं वास्कोडिगामा ह्यानें मोकळा केला. ह्या

दोन गोष्टींपैकीं ज्यास्त महत्व दुसरीचें आहे. परतु हें त्या वेळेस कळून आलें नाहीं. कारण, महंमुदानें अशिया खंडाच्या पश्चिम व मध्य भागाशीं मात्र हिंदुस्थानचा संबंध जोडला. परतु अलेक्झांडरनंतर सर्व युरोपाशीं हिंदुस्थानचा संबंध प्रथमतः वास्कोडिगामा ह्यानें जोडला; तरी अलेक्झांडराच्या वेळचें युरोप व वास्कोडिगामाच्या वेळचें युरोप ह्यांजमध्यें भेद होता. ह्या वेळीं युरोपानें ख्रिस्ती धर्माचें अवलंबन केलें असून, स्वोन्नति प्रगट केली होती. महंमुद हा सपाट्यानें देश जिंकीत चालला, ह्मणून ती गोष्ट सहज लोकांच्या लक्षांत आली. परंतु वास्को-डिगामा लहानसा खलाशी होता, ह्मणून त्याजकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं. त्यानें नवीन मार्गशोधन केल्यानंतर पुष्कळ वेळपर्यंत कांहीं राजकीय परिणाम घडून आले नाहींत. वसाहतींचा इतिहास लिहूं लागलें असतां, वास्कोडिगामाच्या शोधानंतर गेलेल्या शंभर वर्षांस स्पेन व पोर्तुगीझ् लोकांचा काळ असें ह्मणतां येईल. समुद्रांतरीं नवीन शोध लागलेल्या जमिनीची मालकी बहुतेक सोळाव्या शतकभर वरील राष्ट्र-द्वयाच्या हातांत होती. त्यांपैकीं अशिया खंडाकडील अर्धा भाग बहुतेक पोर्तुगीझ लोकांच्या हातांत होता. परंतु त्या शतकाच्या अंतीं डच लोकांनीं पोर्तुगीझ लोकांची जागा घेतली. इंग्रजांविषयीं पाहूं गेलें तर सतराव्या शतकाच्या सुरुवातीला ते केवळ मित्र होते व अन्यायानें आपलें काम हळू हळू चालविण्याची सुरुवात करूं लागले होते. हिंदुस्थानामध्यें डच लोकांचे जे व्यापाराचे मक्ते होते, त्यांजला थोडे थोडे प्रतिबंध इंग्रज लोक करूं लागले होते.

सोळाव्या शतकामध्यें नवीन वसाहत केलेल्या जमीनीची मालकी स्पेन आणि पोर्तुगाल ह्यांजकडे असून, ती सतराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांजकडे जाऊं लागली होती. त्याच मालकी-

विषयीं सर्व अठराव्या शतकामध्यें ह्या दोन राष्ट्रांचे सतत तंटे चालू होते. हें सर्व मागें सांगण्यांत आलेंच आहे. हेच तंटे इ. स. १७४८ त हिंदुस्थानामध्यें जबरदस्त उत्पन्न झाले. त्या वेळीं फ्रेंच मुत्सद्दी डुप्ली याला असें स्पष्ट दिसून आलें होतें कीं, ह्या तंट्यांचें महात्म्य केवळ व्यापारापुरतेंच नसून, राजकीय उलाढालीचाही त्यांत संबंध आहे. सर्व हिंदु महाराष्ट्रावर युरोपीयन लोक अधिपति होणार हें स्पष्ट होतें. हिंदुस्थानच्या परराज्याशीं संबंधाच्या हकीकतींत ह्या ठिकाणीं एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. हा वेळपर्यंत हिंदुस्थानचा परदेशांशीं संबंध अफगाणिस्थानांतून मात्र होता; परंतु यापुढें इतर देशांशीं हिंदुस्थानचें दळणवळण समुद्रांतून सुरू झालें.

हा संबंध एकदांचा घडून आला. इंग्रज लोकांच्या दृष्टीनें तरी पूर्वींच्यापेक्षां हा फार दृढ आहे, असें मानलें जात आहे. वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, ज्या शत्रूची इंग्रज लोकांना पुष्कळ दिवस भीति होती, ते त्यांचे फार जुने शत्रु होते. ते फ्रेंच लोक होत. अफगाणिस्थानांतून हिंदुस्थानावर होणाऱ्या स्वाऱ्या बंद झाल्या होत्या असें नाहीं. इंग्लिश सत्तेच्या उदयाची सुरुवात इ. स. १७४८ त झाली. त्याच्या पूर्वीं फक्त ९ वर्षें नादिरशहानें स्वारी केली. परंतु ह्या गोष्टीकडे इंग्रज लोकांचें फारसें लक्ष गेलें नाहीं. ह्याचें कारण असें कीं, मुलूख जिंकण्यास जरी इंग्रज लोकांनीं सुरुवात केली होती, तरी आपल्या ताब्यांत पुढें केवढा मुलूख येईल, ह्याची बरोबर कल्पना त्यांच्या स्वप्नांत देखील नव्हती. फोर्ट सेंट जॉर्ज आणि फोर्ट वुइल्यम ह्यांच्या आसपास जमिनदारांच्या नात्यानें ते स्थायिक झाले असल्यामुळें सर्व हिंदुस्थानाविषयीं त्यांनीं पर्वा न करणें साहजिक आहे. तसेंच, सर्व हिंदुस्थान देशाचे इतर देशांशीं व्यवहार आजपर्यंत कसे होत आले, ह्याजकडे

त्यांनीं लक्ष दिलें नाहीं, ह्यांतही कांहीं विशेष नाहीं. तुर्कस्थानच्या राज्याविषयीं जशी त्यांना कांहीं पर्वा बाळगण्याचें कारण नव्हतें, तसेंच अफगाणिस्थान व पंजाब ह्यांजविषयींही ते बिलकुल काळजी बाळगीत नसत.

परंतु अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्रज लोकांच्या विचारांत बरेंच अंतर पडलें. हा वेळपर्यंत त्यांजला विशेष काळजी फक्त मद्रास आणि दक्षिण हिंदुस्थान ह्यांजविषयीं होती. त्यांना अशी भीति वाटत असे कीं, दक्षिणेंतील एखाद्या देशी राजाला फ्रेंच लोक जाऊन मिळतील, व त्याजला हत्यारें, अंमलदार व लढाऊ गलबतें पुरवून त्याजकडून मद्रासवर ते हल्ला करवितील. अमेरिकेंतील राज्यक्रान्तीमुळें जी फ्रान्सबरोबर इंग्रजांची लढाई जुंपली होती, तिच्यामध्यें अशीच गोष्ट घडून आली. हिंदुस्थानामध्यें ह्या वेळेस इंग्रजांची जी दुर्दशा झाली, तशी कदाचित् कधींच झाली नसेल. हैदरअल्ली हा कर्नाटकावर स्वारी करून मद्रासपर्यंत चालून आला. बेलीड सफ्रेन ह्मणून फ्रेंच लोकांच्या आरमारावरील एक मोठा नामांकित सरदार होता, तोही समुद्रांतून येऊन हैदरअल्लीस मिळाला. परंतु पुढें पंधरा वर्षांनीं एक निराळीच तऱ्हा दृष्टीस पडूं लागली. नेपोलियन ह्यानें ईजिप्ट देशावर स्वारी केली. फ्रेंच लोकांनीं आपल्या युद्धांत बराच फेरफार केला. दक्षिण हिंदुस्थानांतील आपला संबंध तोडून टाकण्याची त्यांची इच्छा नव्हती. ज्याप्रमाणें हैदरअल्ली फ्रान्सचा राजा सोळावा लुई ह्याच्या उपयोगीं पडला, त्याचप्रमाणें त्याचा मुलगा टिपू हा नेपोलियनच्या डिरेक्टरीला उपयोगीं पडेल अशी आशा होती. असें असतांना बोनापार्ट ह्यानें ईजिप्ट देशावर स्वारी करून, सिरियावर हल्ला केला. ह्या गोष्टी त्यानें केवळ इंग्लंडशीं विरोधभावामुळें केलेल्या होत्या. त्यांजवरून असें दिसून आलें

कीं, हिंदुस्थानावर उत्तरेकडून स्वारी करण्याचा नेपोलियनचा इरादा होता. ह्या वेळींच नादिरशहा आणि अहंमदशहा अबदाली ह्यांजकडे इंग्रजांचें लक्ष प्रथम गेलें. ह्याच वेळेस खैबर घाटाविषयीं त्यांस विशेष काळजी उत्पन्न होऊन, ती आजपर्यंत तशीच चालत आली आहे. काबुल येथें अठराव्या शतकाच्या अखेरीस जमानशहा अहंमदशहाच्या गादीवर बसला. तेव्हांपासून ह्या जमानशहाविषयीं व इराणच्या राजांविषयीं इंग्रजांच्या मनांत विशेष भीति उत्पन्न होऊं लागली.

हिंदुस्थानच्या महाराष्ट्राची ही एक दुसरी मोठी दृग्गोचर होणारी गोष्ट आहे. ह्यांत एक महत्वाची गोष्ट सर्वप्रसिद्ध अशी आहे कीं, ह्याच वेळेस मालकम (पुढें सर जान असें नांव प्राप्त झालेले) साहेब इ. स. १८०० ह्या वर्षी इराणच्या दरबारांत वकील ह्मणून पाठविण्यांत आले. अशियांतील राष्ट्रांची समतोलता कमीजास्त होत आहे किंवा काय, ह्याचा शोध करण्याची इंग्रजांस आजपर्यंत कधींही जरूर पडली नव्हती. अगर इराणच्या दरबारांत काय विचार चालले आहेत, हेंही पाहण्याची जरूर इंग्रजांस पडली नाहीं. येथेंसुद्धां ही चौकशी ठेवण्याचें इंग्रज सरकारास प्रयोजन पडल्याचें गुप्त कारण फ्रान्सची भीति हेंच, रशियाची भीति हें नव्हे. आह्मीं मागें सांगितलेंच आहे कीं, ड्यूक आफ् वेलिंग्टन आसईच्या लढाईत मराठ्यांबरोबर लढत असतां, त्यास पुढील वाटर्लू येथील लढाईतल्याप्रमाणें आपण फ्रेंचांशीं लढत आहों, असेंच वाटलें असावें. तद्वतच मालकम साहेब इराणांत बोलाचाली करीत असतां, त्यांच्या मनांत नेपोलियन व फ्रान्सचा अधिकार ह्याच गोष्टी प्रमुख असून, रशियासंबंधीं कांहींच विचार त्यांच्या मनांत नव्हते.

ह्या द्वितीय दृग्गोचर होणाऱ्या गोष्टीमध्यें अफगाणिस्थानाकडून

इंग्रजांस भीति पडूं लागली, ह्मणून सांगण्यांत आलें आहे; तरी पण दक्षिणेकडील फ्रेंचांची भीति त्यामुळें कमी झाली असें नाहीं. वर सांगितलेल्या मालकम साहेबांचें चरित्र पाहिलें ह्मणजे ही गोष्ट व्यक्त होत आहे. इराणाशीं वकीली करण्यास त्यांसच नेमण्याचें कारण असें होतें कीं, त्यांनीं पूर्वीं नुकताच टिपू सुलतान ह्याजवर ह्मैसूर येथें मोठा जय मिळविला होता. ज्याप्रमाणें लॉर्ड क्लाईव्ह साहेबानें जिंकलेली पहिली लढाई फ्रेंचांबरोबरच होती, त्याचप्रमाणें मालकम साहेबांनीं जिंकलेली ही दुसरी लढाईसुद्धां फ्रेंचांशींच झाली होती. टिपु सुलतान ह्मणजे फ्रेंच डिरेक्टरीचा एक उजवा हातच समला जात असे. ज्याप्रमाणें सफ्रेन हा टिपूच्या बापाचा स्नेही होता, त्याचप्रमाणें नेपोलियन हा टिपूचा स्नेही होता. फ्रेंच लोक त्यास ‘ नगरवासी टिपू ’ असें ह्मणत असत. बरें, ह्या वेळीं हैदराबादचा निजामही स्वस्थ बसला नव्हता. सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं फ्रेंचांचा पहिला सर्व संबंध निजामाबरोबरच होता. हिंदुस्थान देश कोणत्या उपायांनीं जिंकतां येईल, ही गोष्ट इंग्रजांपेक्षां त्यास ज्यास्त चांगली कळत होती. सर्व खुबी इतकीच होती कीं, काळे लोकांस चांगले शिक्षणानें लढाईस तयार करून, त्यांजवर युरोपियन अंमलदार नेमले पाहिजे होते. इ. स. १७९८ ह्या वर्षीं हैदराबादचे राज्यांत १४,००० लोक फ्रेंचांनीं शिकवून तयार केले व फ्रेंच अंमलदारांच्या हाताखालीं ते लढण्यास तयार होते. रेमंड ह्मणून कोणी एक गृहस्थ त्यांचा सेनापति होता. के साहेबानें मालकम साहेबांचें चरित्र लिहिलें आहे त्यांत तो असें लिहितो कीं, “ ह्या सैन्याच्या पगारखर्चाकडेस निजामानें आपल्या ताब्यांतील मुलूख तोडून दिला होता. सुशिक्षित युरोपियन अंमलदारांच्या देखरेखीखालीं हत्यारें बनविण्याचे कारखाने स्थापन केले होते. त्यांत तोफा बनवीत असत; बंदुकाही तयार केल्या

जात असत. उत्तम प्रकारचें शिक्षण मिळून तरबेज झालेलें सैन्य सर्व तयारीनिशीं लढाईकरितां बाहेर पडे. राज्यक्रान्तिप्रिय फ्रेंचांचे झेंडे त्या सैन्यामधून फडकत असत. त्यांच्या झग्यांच्या गुंड्यांवर ' स्वतंत्रतेचें चिन्ह ' कोरलेलें असे." एवढें मोठें सैन्य निजाम बाळगीत असे. टिपु सुलतान तर प्रसिद्धपणें फ्रेंचांस मिळाला होता, ह्मणून ह्या वेळीं दक्षिण हिंदुस्थानांत इंग्रजांची स्थिति फ्रेंचांशीं प्रथमारंभीं चाललेल्या भांडणाच्या वेळच्या स्थितीपेक्षां फारशी भिन्न नव्हती. ज्याप्रमाणें अर्काट येथें क्लाईव्ह साहेबानें फ्रेंचांची दाणादाण उडविली, त्याचप्रमाणें इ. स. १७९८ ह्या वर्षीं रेमंडच्या सैन्याकडून इंग्रजांचा पराभव होण्याचा बराच संभव होता. अशा संधीस मालकम साहेबांस हैदराबादेस पाठविण्यांत येऊन, त्यांनीं फ्रेंचांचें सैन्य निजामाचे दरबारांतून काढून टाकण्याचे प्रयत्न केले. ते सफळ झाले. त्यांजबद्दल त्यांनीं स्वतः असें ह्मटलें आहे कीं, " ह्या स्वतंत्रताप्रिय पक्ष्यांचें घरटें मोडून काढण्याचें काम तडीस गेलें."

अशा प्रकारें ब्रिटिश इंडियाचे परराज्यांशीं व्यवहार दोन प्रकारचे आहेत. प्रथम इंग्रजांस हिंदुस्थानाचे बाहेर एकच शत्रु होता. या शत्रूकडून हल्लाही एकाच ठिकाणीं ह्मणजे दक्षिणेंत होण्याचा संभव होता. दुसरें असें कीं, पुढेंही तोच शत्रु त्यांस उत्पन्न झाला. त्याची व्यवस्थाही पूर्वीप्रमाणेंच होती. परंतु त्याची शक्ति मात्र फार वाढली होती. आतां ह्या शत्रूनें हिंदुस्थानच्याबाहेर अशियांतील इतर राष्ट्राशीं सख्य चालविलें होतें. हीं राष्ट्रें अफगाणिस्थान व इराण होत. परंतु इ. स. १८०७ ह्या वर्षीं टिल्सिट* येथें तह झाल्यावर ह्या साहाय्यभूत राष्ट्रांस आणखी एक राष्ट्र मिळालें. तें राष्ट्र युरोपीय होतें खरें, तरी अशिया खंडावर त्याची झडप केव्हां पडेल, ह्याचा नियम नव्हता.

* टीप.—* पान ७२ पहा.

ह्या राष्ट्राचें नांव रशिया. हें ब्रिटिश हिंदुस्थानच्या ह्या आमच्या इतिहासांत आह्मी प्रथमच दाखल करीत आहों.

पुढें नेपोलियनचा पूर्णपणें मोड झाल्यावर वरील दुसऱ्या स्थितीची समाप्ति झाली. हिंदुस्थानावरचें फ्रेंचांचें वजन ह्याचवेळेस अगदीं समूळ नाहींसें झालें, असें ह्मणणें जरी रास्त होणार नाहीं, तरी नेपोलियनबरोबरच तेंही लयास गेलें असें ह्मटलें पाहिजे. इ. स. १८१० ह्या वर्षी मॉरिशस* बेट इंग्रजांनीं जिंकल्यामुळें फ्रेंचांनीं हिंदुस्थानांतून आपलें अंग काढिलें. पुढें पारिस येथलि सर्वसामान्य तह† युरोपांत होऊन, त्या तहान्वयें तें बेट इंग्रजांकडेसच राहिलें.

---

* मारिशस—हें बेट आफ्रिका खंडाच्या पूर्व किनाऱ्यावर आहे. सोळाव्या शतकाच्या पूर्वी हें युरोपीय राष्ट्रांस माहीत होतें असें दिसत नाहीं. सोळाव्या शतकांत तें पोर्तुगीझ लोकांनीं शोधून काढिलें. त्या वेळीं त्यांत वस्ती नव्हती. तेथें जाऊन वसाहत न केल्यामुळें त्याचा उपयोग पोर्तुगीझ लोकांस होईना. सबब तें त्यांनीं सोडून दिलें. नंतर डच लोकांनीं तें कांहीं दिवस आपल्या ताब्यांत ठेविलें. परंतु त्यांजलाही त्याचा कांहीं उपयोग करून घेतां आला नाहीं. ह्मणून ते तें सोडून गेले. नंतर फ्रेंच लोकांनीं तें आपल्या ताब्यांत घेतलें व तेथें वसाहत केली. लाबरदोनस ह्मणून फ्रेंचांचा एक विख्यात गव्हर्नर तेथें गेला. त्यानें उसाची लागवड त्या बेटांत सुरू केली. तेव्हांपासून तें बेट फार उपयुक्त असें सर्वत्रांस वाटूं लागलें. पुढें ह्या शतकाच्या आरंभीं इंग्रजांचा व फ्रेंचांचा झगडा चालू असतां, ह्या बेटांतील फ्रेंच लोकांपासून इंग्रजी खलाशांस व व्यापाऱ्यांस फार उपद्रव होऊं लागला. सबब तें जिंकून घेण्याचा इंग्रजांनीं निश्चय करून एक आरमार तिकडेस रवाना केलें. इ. स. १८१० ह्या वर्षी तें बेट त्यांनीं फ्रेंचांपासून जिंकून घेतलें. पुढें इ. स १८१४ त पारीस येथें झालेल्या तहान्वयें तें बेट इंग्रजांकडेसच राहिलें. पूर्वीचे कायदेकानू, रीतीभाती व वस्ती पूर्वीची आहे तशीच राहूं द्यावी, असें वरील तहाच्या आठव्या कलमांत ठरलें असल्यामुळें हल्लीं त्या बेटांत फ्रेंच कायदे व रिवाज सर्वत्र चालू आहेत. हल्लींही तें इंग्रजांचेच ताब्यांत आहे. त्याजवर विलायतेहून एक गव्हर्नर नेमला जात असून, त्यास मदतनीस सात असामी कौन्सिलदार नेमले जात असतात. हल्लीं तेथील वसूल सुमारें एक कोट रुपये असून, खर्चही जवळ जवळ तितकाच आहे.

† टीप.—* पान ७५ पहा.

नंतर इंग्रजांच्या परराज्यसंबंधीं व्यवहारास कांहीं दिवस स्वस्थता प्राप्त झाली. सुमारें २० वर्षेंपर्यंत हिंदुस्थानच्या ब्रिटिश राज्यास परचक्राची भीति नव्हती. पुढें एका नवीन स्थितीस सुरुवात झाली. फ्रान्सच्या ऐवजीं दुसऱ्याच एका युरोपीय राष्ट्राचें अशिया खंडांत इंग्रजांशीं वैर उत्पन्न झालें. हें राष्ट्र रशिया होय.

ग्रेट ब्रिटनच्या विस्तारास एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीचे अखेरीस आरंभ झाल्यापासून जो त्या विस्ताराचां आजपर्यंतचा इतिहास आहे, त्याचे तीन भाग करतां येतात. पहिला भाग सतरावें शतक. ह्यामध्यें इंग्लंड देशाची गरीब स्थिति लयास जात चालली, व वसाहतींच्या साम्राज्यांत त्याची गणना होऊं लागली. नंतर पुढें फ्रान्सबरोबर त्याची लढाई सुरू झाली. ती अमेरिका व अशिया ह्या दोनही खंडांत चालली. तिचें इत्थंभूत वर्णन येथवर झालें आहे. ह्यामध्यें अठरावें शतक निघून गेलें. नंतर तिसऱ्या भागास सुरुवात झाली. वास्तविक रीतीनें पाहतां, दुसऱ्या भागाची समाप्ति होण्यापूर्वींच तिसऱ्या भागास सुरुवात झाली होती. इतिहासाची वाढ अशी चमत्कारिक असते कीं, एक गोष्ट समाप्त होण्यापूर्वींच दुसरीस सुरुवात होत असते. ह्या तिसऱ्या भागांत इंग्रजांच्या जगद्राष्ट्राशीं दोन प्रचंड राष्ट्रें निकट आहेत. एक पश्चिम महाद्वीपांत व एक पूर्व महाद्वीपांत. पश्चिम महाद्वीपांत युनायूटेड् स्टेट्स् व पूर्व महाद्वीपांत रशिया.

अलीकडच्या काळांत पुष्कळ नवीन शोध लागल्यामुळें वेळ आणि अंतर ह्यांच्या योगानें राष्ट्रव्यवस्थेस उत्पन्न होणाऱ्या पुष्कळ अडचणी दूर होऊन राष्ट्रांचा अफाट विस्तार सहज होऊं लागला आहे. अशा प्रकारें अफाट विस्तार पावलेलीं हीं वरील दोन राष्ट्रें आहेत. दोघांच्या दरम्यान ब्रिटिश महाराष्ट्र आहे. त्याचा मुलूख एकसारख

बिनतुटक नाहीं. तेंही विस्तृत आहे. त्याच्यांतून महासागराचा विस्तीर्ण प्रवाह प्रत्येक दिशेकडे चालला आहे. ह्मणून यास जलविघटितवीथिजगद्रूपी* व्हेनीस शहराची उपमा देतां येईल.

ह्या तिसऱ्या भागाची सुरुवात अमेरिकेंतील राज्यक्रान्तीपासून झाली असें ह्मणतां येईल; तरी विशेषेंकरून प्रस्तुत शतकाच्या तिसाव्या वर्षापासून त्याची खरोखर सुरुवात झाली आहे. अमेरिकेंतील युनाय्टेड् स्टेट्स्ची स्वतंत्रता सुरू झाल्यावर पुष्कळ काळ जाईपर्यंत त्यांची खरोखर वृद्धि होत नव्हती. त्यांची इतकी वृद्धि होण्याचें कारण असें झालें कीं, युरोपांतून पुष्कळ लोक जाऊन तेथें राहूं लागले. परंतु इ. स. १८१५ ह्या वर्षाचा तह† होईपर्यंत हे लोक जाण्यास सुरुवात झाली नव्हती. तसेंच १८२० च्या सुमारास पुनः त्यांचें महत्व वाढण्यास कारणें झालीं. दाक्षिण अमेरिकेंतील स्पेनच्या ताब्यांतील मुलुखांत राज्यक्रान्ति होऊन प्रजासत्ताक राज्याची स्थापना झाली. ह्यामुळें अमेरिका खंडांत युनायूटेड् स्टेट्स्च्या राष्ट्रास फारच प्रमुखत्व प्राप्त झालें. ह्याच वेळेच्या सुमारास रशियाचें राष्ट्रही पूर्वेकडे पुष्कळ वाढलें. ज्या वेळेस रशियाची प्रतिस्पर्धा इंग्रजांस प्रखर वाटूं लागली, तो वेळ ब्रिटिश हिंदुस्थानच्या इतिहासांत अगदीं व्यक्त केलेला आहे. इ. स. १८३० ह्या वर्षी रशियन लोक जक्झर्टस्‡ नदीपर्यंत आले. पुढें लवकरच इराण देशाचें स्वातंत्र्यही

---

* व्हेनिस शहर समुद्रांत वसलेलें असून, रस्तोरस्तीं पाणी आहे. शहरांतून फिरण्यास रस्त्यांवर होड्या असतात. हें सर्वत्रांस माहीत असेलच.

† हा तह इंग्लंड आणि युनाय्टेड् स्टेट्स् यांजमध्यें झाला. हा होईपर्यंत या दोन राष्ट्रांचा वैरभाव सुटला नव्हता. परंतु ह्या वेळेपासून उभयतांमध्यें चांगलें सख्य चालू झालें.

‡ ही मध्य एशियांत एक नदी आहे.

त्यांनीं नाहींसें केलें. ह्मणून जेव्हां इ. स. १८३४ त व त्यानंतर १८३७ त इराणच्या महंमदशहानें अफगाणिस्थानावर स्वारी केली, तेव्हां इंग्रज लोकांस रशियाचाच हल्ला आपणांवर येत आहे असें वाटलें. त्याचप्रमाणें तीस वर्षांपूर्वींही अफगाणिस्थानांत थोडी चळवळ झाली असतां, नेपोलियनचाच हल्ला आपणांवर आला कीं काय, असें वाटत असे. ह्या वेळेपासून हिंदुस्थानच्या इतिहासांत एका नवीन दंग्याधोप्याच्या काळास प्रारंभ झाला. हा काळ हळू हळू सन १८९७ सालच्या बंडापर्यंत ह्मणजे सुमारें २० वर्षेंपर्यंत चालला. ह्या काळामध्यें पुष्कळ लढाया झाल्या. ह्यांच्या योगानें वायव्येकडील प्रांत जिंकला जाऊन, पंजाब, सिंध, औध वगैरे प्रांत त्यांनीं सर केले, व हिंदु प्रजेच्या मनांत इतका क्षोभ उत्पन्न झाला कीं, शेवटीं त्यांनीं बंड केलें. असे दंगे होण्याचें मूळ व मुख्य कारण रशियाची भीति हें होय. रशियाची भीति होती ह्मणूनच अफगाणिस्थानावर स्वारी करणें भाग पडलें, व त्या ठिकाणीं झालेल्या दुष्कीर्तीचें मार्जन करण्याकरितां जे प्रयत्न त्यांनीं केले त्यांमुळें सिंध प्रांत जिंकला गेला. असेंही संभवनीय दिसतें कीं, वायव्येकडील प्रांताकडे अशा प्रकारें दंगेधोपे सुरू झाले नसते, तर शीख लोकांबरोबरच्या लढायाही झाल्या नसत्या.

इ. स. १८३८ त लॉर्ड ऑक्लंड ह्यानें वरील भीतीच्या निवारणार्थ केलेले उपाय योग्य नव्हते, असें ह्मणणें आतां आह्मांस भाग पडतें. विनाकारण होती त्यापेक्षां जास्त भीति त्यास वाटली असेल. हल्लीं सुमारें त्या गोष्टीस जरी ४० वर्षें होऊन चुकलीं आहेत, व ह्या चाळीस वर्षांत जरी मध्य एशियांत रशियाचें पाऊल विलक्षण रीतीनें पुढेंच पडत चाललें आहे, तरी वास्तविक भीतीपेक्षां ती जास्त आहे, असें मानण्यांत येतें. परंतु परदेशांशीं हिंदुस्थानच्या व्यवहारांची परिस्फुटता

येथपर्यंत आह्मीं केली आहे, तिजवरून असें दिसतें कीं, रशियाची भीति पडण्यास प्रथम दर्शनीं कारण आहे, व एवढ्याच गोष्टीचा परिणाम पाहिजे तितका प्रचंड होईल असें मानण्यास तूर्त कारण पूर्वापार चालत आलेली परंपराच होय. ज्याप्रमाणें सन १७६१ ह्या वर्षी मराठे लोकांचा, सन १७३८ त मोंगल लोकांचा, व १३९८ त प्रथमच्या मुसलमान लोकांचा, अफगाणिस्थानांतून हिंदुस्थानावर स्वाऱ्या होऊन, पराभव झाला होता, त्याचप्रमाणें वरील स्वाऱ्या खेरीजकरून गिझनीचा महंमूद व बाबर ह्या दुसऱ्या दोघां मुसलमान सरदारांनीं अफगाणिस्थानांतून हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून स्वराज्यस्थापना केली होती.

ह्यावरून प्रथम दर्शनीं मात्र भीतीस कारण आहे इतकेंच आह्मी ह्मणतों, ह्यापेक्षां जास्त कांहीं ह्मणत नाहीं. एका ठिकाणीं सजातीय गोष्टी एकसारख्या पुष्कळ वेळ घडल्या, ह्मणून केवळ त्यांच्या संख्यांवरून त्यांच्या पुढची गोष्ट तशाच प्रकारची घडेल, असा तर्क करण्याची न्यायशास्त्रामध्यें एक पद्धत आहे; पण ह्या पद्धतीवरून बिनचुक सिद्धांत बांधतां येत नाहीं. इतकें मात्र समजतें कीं, ह्या पद्धतीनें मिळालेल्या सिद्धांताच्या सत्यत्वाच्या प्रचीतीचें दुसऱ्या प्रमाणांनीं परीक्षण करून घेतलें पाहिजे. ही एक दुर्दैवाची गोष्ट समजावयाची कीं, राजनीतिशास्त्रांतील सिद्धांतांचे प्रमाणाकरितां जुने इतिहासांतील दाखले जेव्हां क्वचित देण्यांत येतात, तेव्हां वरच्याप्रमाणेंच अपुऱ्या प्रमाणांचा उपयोग करून सिद्धांत ठरविण्यांत येतात. मोंगल आणि नादिरशहा ह्यांच्या उदाहरणांवरून इंग्लंड आणि रशिया यांजबद्दल कांहींच सिद्धांत बांधतां येणार नाहीं. इंग्रजी राज्यासारखी मजबुदी मोंगली राज्यास कधींच आलेली नाहीं, हें निर्विवाद आहे. नादिरशहानें हिंदुस्थानावर

स्वारी केली, तेव्हां मोंगलांच्या राज्यास सुमारें तीस वर्षेपर्यंत पुरती उतरती कळा लागली होती. रशियाविषयीं असें दाखवितां येईल कीं, ज्या तार्तार लोकांनीं पूर्वी हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या, त्यांच्याहून रशियाची तऱ्हा अगदीं भिन्न आहे. त्यांपेक्षां रशिया जास्त विस्तृत व फार मजबूद आहे, ही गोष्ट खरी; तरी दूर अंतरावरील देशावर स्वारी करून, तो जिंकण्याइतकें सामर्थ्य त्याच्या आंगांत आहे, असें मानणें चुकीचें होईल. सारांश, मागील ऐतिहासिक माहितीवरून इतकें मात्र सिद्ध होतें कीं, हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा रस्ता अफगणिस्थानांतून आहे. इंग्रजांसारख्यांच्या राज्यावर रशियनसारख्या लोकांनीं स्वारी करून तें हस्तगत करून घेणें ह्या गोष्टीच्या सिद्धतेस मागील इतिहासावरून कांहीं पुरावा मिळत नाहीं. ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यास एकच मार्ग आहे. नीतिसंबंधीं व लष्करासंबंधीं दोनही राष्ट्रांची मजबुदी कशी काय आहे हें पाहून आणखी कित्येक गोष्टींचा पृथक्पणें विचार केला असतां, वरील प्रश्नाचा उलगडा कांहीं अंशीं होईल.

कोणी असा आक्षेप घेतील कीं, दूर अंतरावरील प्रदेश जिंकून घेण्याची रशियाची शक्ति व इच्छा आहे ह्यांत संशयच नाहीं. उत्तर-अशिया खंडांतील सर्व प्रदेश त्यानें जिंकून घेतले आहेत. मध्य अशियांत समर्कंद व खोकंदपर्यंत त्यानें आपली सरहद्द वाढविली आहे. दुसऱ्याचे मुलूख हिरावून घेण्याचें काम तडीस नेण्यांत रशियन लोकांशीं सामना करण्याचें कोणत्याही राष्ट्रास धैर्य झालें नाहीं. परंतु सोलन* ह्मणत असे कीं, प्रत्येक मनुष्याचा अंत पाहिल्याशिवाय तो सुखी आहे असें मानतां येणार नाहीं. हें सोलनचें ह्मणणें लक्षांत ठेवलें पाहिजे. युरोपांत सर्व

* ग्रीस देशांत सात शहाणे होऊन गेले. त्यांपैकीं सोलन हा एक फार प्रसिद्ध पुरुष होता.

रशियाभर प्रत्येक युरोपियन प्रचाराचें वजन पूर्णपणें बसल्यानंतर पुढेंही अशा प्रकारें वृद्धिंगत होण्याची आजपर्यंतची रशियाची स्थिति निर्वेध चालेल, अशी खात्री नाहीं. राजकीय हक्कांविषयीं तेथील लोक पूर्णपणें जागृत झाले, ह्मणजे रशियाच्या परदेशच्या व्यवहारांत फरक पडलाच पाहिजे.

आणखी दुसरें असें ह्मणतां येईल कीं, इंग्लंडसारख्या बलाढ्य राष्ट्राच्यानें रशिया सारख्याशीं सामना करवणार नाहीं, असें कोण ह्मणेल ? तथापि इंग्लंड व ब्रिटिश हिंदुस्थान ह्यांतही महदंतर आहे, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. हजारों मैलांच्या अंतरावर मुलूख काबीज करण्यास लागणारा धनसंचय रशियापाशीं असेल, परंतु इंग्लंडपाशीं तरी नाहीं. असा प्रसंग आला तर हिंदुस्थानचें रक्षण हिंदुस्थानाकडूनच झालें पाहिजेः ह्मणजे जितकें ह्मणून इंग्रजी सैन्य हिंदुस्थानचे संरक्षणाकरितां न्यावें लागेल, त्याचा खर्च हिंदुस्थानानेंच सोसला पाहिजे.

ह्यावरून ब्रिटिश हिंदुस्थानची खरोखरी शक्ति किती आहे असा प्रश्न निघतो. मागें जीं अंतःस्थितिवरून उद्भवणारीं संकटें सांगण्यांत आलीं आहेत, त्यांस आणखी हीं अफगाणिस्थानच्या इकडून उद्भवणारीं बाह्य संकटें मिळविलीं ह्मणजे दोनही प्रकारचीं संकटें वारण्याची हिंदुस्थानची शक्ति असेल त्या प्रमाणानें ब्रिटिश राज्याची चिरस्थायिकता मापण्याची आहे. १८५७ सालचें बंड मोडण्याचें सामर्थ्य इंग्रजांचे अंगीं होतें. कदाचित् राशियाचा हल्ला आला तरी त्यास हांकून लावण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असेल. परंतु जर आंत बंड* व बाहेरून रशियाचा

* अशक्य गोष्टी फारच थोड्या आहेत, ह्मणून केवळ शक्यत्वानेंच ह्या कल्पनेचा येथें निर्देश केलेला आहे. बाकी वास्तविक पाहतां ही कल्पना घेण्याचें कारण नाहीं.

हल्ला अशीं दोनही अरिष्टें एकदम उद्भवलीं, तर मग उपाय काय? हल्लीं जें काळे लोकांचें सैन्य इंग्रजांचे नोकरीस आहे, तेंच जर कांहीं कारणानें नाखुष झालें, किंवा कदाचित् दुसऱ्यास जाऊन मिळाल्यानें आपला फायदा होईल असें त्याच्या मनांत आलें, व त्याप्रमाणें रशियन लोकांसच तें जाऊन मिळालें, तर मग उपाय काय? इ. स. १८३० ह्या वर्षापासून हीच भीति पडली आहे. सरकारचें वजन अशा प्रसगीं दोनही संकटें दूर ठेवण्याजोगें पडत चाललें आहे, तरी ह्या राज्याची शक्ति फार कमी असल्यानें प्रजा नाखुष होऊन, शत्रूस जाऊन मिळणार नाहीं, अशी तजवीज फार काळजीपूर्वक सरकारानें ठेविली पाहिजे.

दुसऱ्याही कांहीं अरिष्टांची कल्पना करितां येईल. कोणी असें ह्मणतात कीं, हिंदुस्थान देश मागें पुढें केव्हां तरी इंग्रजांस सोडून द्यावा लागेल. कारण, केव्हां तरी युरोपामध्यें एखादी लढाई सुरू होऊन, हिंदुस्थानांतलें सैन्य परत युरोपांत न्यावें लागेल. इंग्रजी सैन्य हिंदुस्थानांत असल्याशिवाय हिंदुस्थान राखतां येणार नाहीं, ही गोष्ट खरी आहे. इंग्लंडावर युरोपांतच कांहीं संकट आलें असतां, उदाहरणार्थ, इंग्लंडावर दुसऱ्या एखाद्या राष्ट्रानें स्वारी केली असतां, हिंदुस्थानांतील सैन्य परत नेणें भाग पडेल. परंतु असलें संकट येईल, असें तूर्त बिलकुल वाटत नाहीं. कारण, फ्रान्सशिवाय आज दुसरें कोणतें राष्ट्र इंग्लंडावर हल्ला करण्यास लायक आहे? फ्रान्स देशाशीं इंग्लंडची शेवटची लढाई होऊन आज सुमारें ७९ वर्षें झालीं. फ्रान्सबरोबरचें पुरातन वैर आतां केवळ ऐतिहासिक झालें आहे व फ्रान्सची कलह करण्याची शक्तिही अलीकडेस फार कमी झाली आहे.

हा विषय फार गहन व मोठा आहे. प्रस्तुत प्रसंगीं जास्त विवेचन करण्यास सवड नाहीं. ह्मणून वाचकांनीं अशाच अपूर्ण विचारांच्या दिग्दर्शनानें आपलें समाधान करून घेतलें पाहिजे.

प्रकरण आठवें.

उपसंहार.

विषयाचें विवेचन फार वेळपर्यंत होऊन, इंग्लंड देशाचा विस्तार कसकसा होत गेला, हें येथवर पाहण्यांत आलें. ह्या विस्ताराचा एक परिणाम असा झाला आहे कीं, देश ह्या नात्यानें पाहतां, इंग्लिश राष्ट्रानें सर्व युरोपास मागें टाकलें आहे, व स्वतः जणूं काय जगद्राष्ट्र होऊन बसलें आहे. बरें, राष्ट्र ह्या नात्यानें पाहतां, ह्मणजे अमुक एक भाषा बोलणारा देश, ह्या नात्यानें पाहतां, दोन मोठालीं राष्ट्रें इंग्लंडांतूनच उगम पावलीं आहेत. हीं दोन राष्ट्रें सामर्थ्य, वजन व त्वरित वृद्धि या सर्व गुणांनीं एकमेकांची स्पर्धाच करीत आहेत. ह्या विस्ताराचीं कारणें काय, तो कसकसा झाला, व त्याचे कित्येक परिणाम कसकसे घडले, ह्या गोष्टींचा इतका वेळ विचार करण्यांत आला. ह्मणून ह्या वेळपर्यंत ध्यानांत ठेवण्याजोग्या कोणकोणत्या गोष्टी सांगण्यांत आल्या, व त्यांजपासून एक साधारण सिद्धांत काय निघतो, इतकेंच आतां या औपसंहारिक प्रकरणांत सांगावयाचें उरलें आहे.

ह्या विस्तारासंबंधीं इंग्रजी समाजांत दोन अगदीं विरुद्ध मतें प्रचारांत आहेत. यथार्थ वर्णन करणें तर ह्यांपैकीं एका मतास अतिशयोक्तगुण व दुसऱ्यास अवमानितगुण अशीं नांवें देतां येतील. पहिलें मत धारण करणारे लोक हा इतका विस्तार पाहून अगदीं चकित होत्साते हर्षोद्रेकांत मग्न होऊन जातात. ज्या शौर्यधैर्यादि गुणांनीं एवढा प्रचंड विस्तार घडून आला, त्या गुणांबद्दल त्यांस आश्चर्यातिशय वाटल्याशिवाय राहत नाहीं. ह्मणून त्यांचें मत असें पडतें कीं, एका प्रकारचें भूषण व मनास समाधानकारक असें समजूनच हें एवढें विस्तृत

राष्ट्र इंग्रज लोकांनीं स्वतःकडेस राखिलें पाहिजे. दुसरें मत ह्याच्या अगदीं विरुद्ध आहे. हें मत धारण करणारे लोक असें मानतात कीं, हा एवढा विस्तार केवळ अन्यायी परापहरणानें झाला आहे. तो निरुपयोगी असून त्याचें ओझें विनाकारण इंग्लिश राष्ट्रास सोसावें लागतें. हा विस्तार इंग्लंडावर लादलेला अनुपयुक्त भाग आहे. समुद्रवलयांकित द्वीपांचा तद्वासीन लोकांस खरोखरी उपयोग होण्याचे आड ही गोष्ट येते, तिजमुळें भूतलावर प्रत्येक ठिकाणीं संकटें आणि लढाया उत्पन्न होतात. ह्मणून ह्या लोकांचें ह्मणणें असें पडतें कीं, ज्या उपायांनीं हा सर्व विस्तार नाहींसा होईल, असे उपाय राज्यकर्त्यांनीं योजावे. इतका वेळपर्यंत ह्या विषयावर आपण बराच विचार केला आहे. ह्मणून ह्या दोन्ही मतांची खरोखरी किंमत किती आहे, हें आतां आपण पाहूं.

अतिशयोक्तगुणमताच्या पुरस्कर्त्यांच्या ह्मणण्यापेक्षां आमचें मत बरेंच सौम्य आहे. प्रथमारंभीं एवढ्या मोठ्या विस्ताराचा आमच्या मनावर फारसा अनुकूल ग्रह होत नाहीं. कारण एखादें राष्ट्र अफाट वाढलें ह्मणून तें चांगलें असेलच असा नियम नाहीं. उलट बहुतेक देशांच्या इतिहासावरून असें दिसतें कीं, जीं राष्ट्रें फार विस्तार पावलीं, तीं बहुतकरून हलक्या प्रतीचींच होतीं. शिवाय आपल्यांतील कित्येक शूर पुरुषांनीं मोठ्या पराक्रमानें राज्यें कमाविलीं, ह्मणून त्यांच्या सन्मानार्थ अगर आतां तीं सोडणें ह्मणजे इंग्लिश लोकांस मोठें लांछन आहे, एतदर्थ तीं राखलीं पाहिजेत, असें आपण कां मानावें हेंच आह्मांस समजत नाहीं. ज्या ज्या म्हणून राजकीय संस्था आहेत, त्या त्या तत्समाविष्ट मंडळीच्या फायद्याकरितांच आहेत; व हा फायदा कमी न होतां जितक्या मोठ्या त्या संस्था होऊं शकतील, तितक्याच त्या मोठ्या असाव्या, फाजील मोठ्या असूं नयेत. इंग्लंडचा वसाहतींशीं अगर हिंदुस्थानाशीं संबंध

झाल्यानें उभय पक्षांस जर तोटा होत असेल, ह्मणजे इंग्लंडचेंही नुकसान होऊन वसाहतींसही फायदा होत नसेल, तर त्या आपले ताब्यांत राखण्याचा प्रयत्न इंग्लंडानें करणें ह्मणजे मूर्खपणा होईल. वर निर्दिष्ट केलेल्या दोन मतांपैकीं पहिल्या मताचे लोक अतिशयोक्ति करीत असतां, त्यांच्या विचारांत पुष्कळ घोटाळा दिसून येतो. ते असें मानतात कीं, इंग्लंडच्या वसाहती ह्मणजे इंग्लंडची केवळ मालमत्ताच समजावयाची आहे. सालोमन व सिसास्ट्रिस यांस ' टार्शिश व इतर बेटें यांजकडून नजराणे येत असत; अरबस्थान व शेबा यांजकडून देणग्या येत असत.' त्याचप्रमाणें व्हिक्टोरिया महाराणी साहेब असून, ताब्यांतल्या मुलुखांतून नजराणे व देणग्या याव्या, ह्मणूनच जणूं काय ते त्यांनीं आपल्याकडेस ठेविले पाहिजेत. वास्तविक पाहतां, वसाहतींचा व इंग्लंडचा संबंध अशा प्रकारचा नाहीं. कारण प्रत्यक्ष रीतीनें ह्या संबंधापासून इंग्लंडास फायदा होत आलेला नाहीं. शिवाय, आह्मीं मागें सांगितलेंच आहे कीं, एखादें राष्ट्र मोठें वाढलें ह्मणून तें वाढविणारांच्या व राखणारांच्या अंगीं कांहीं विशिष्ट प्रकारचें अनुपम धैर्य अगर राज्य करण्याचें अमानुष बुद्धिकौशल्य आहे, असें मानणें बरेंच संशयित आहे. इंग्रज लोकांच्या अंगीं रयतेवर अंमल करण्याचें व नवीन वसाहती स्थापण्याचें स्वाभाविक कौशल्य आहे. ह्या गोष्टीच्या प्रत्यंतरास कित्येक गोष्टी दाखविण्यांत येतील. हिंदुस्थानामध्यें तेथील लोकांच्या मनावर आपल्या वरचढपणाचा विलक्षण प्रकारचा ग्रह केल्याचीं कित्येक इंग्रजी गृहस्थांचीं उदाहरणें सांपडतील. कानडामध्यें इंग्रज लोक जाऊन फ्रेंच लोकांच्या शेजारींच वसाहती करून राहिले. त्या फ्रेंच्याशीं त्यांचीं स्पर्धा चालून धाडस व हिंमत हे गुण इंग्रज लोकांनींच उत्कृष्ट तऱ्हेनें प्रगट केले. तथापि अमेरिकेंतील वसाहतींच्या इतिहासांत इंग्रज लोकांच्या

अंगचे कित्येक गुण तारीफ करण्याजोगे जरी आहेत, तरी अमेरिकेंत इंग्रजांस श्रेष्ठत्व प्राप्त होण्यास केवळ त्यांच्या अंगचे गुणच कारण आहेत, असें नाहीं. महासागरांतरीं नवीन शोध लावण्याची अमानुष दैविक शक्ति कित्येक राष्ट्रांनीं प्रगट केली, त्यांत इंग्रजांचें अंग नव्हतें. पोर्चुगीज लोकांची बुद्धिमत्ता इंग्रजांचे अंगीं दिसली नाहीं. कोलंबस किंवा मागेलान* हे इंग्लंडात उत्पन्न जाहले नाहींत. वसाहतींच्या कामांत दोन शतकांनंतर इंग्रजांस मुख्यत्व कोणत्या कारणानें प्राप्त झालें, त्याचा विचार मागें करण्यात आला; त्यावरून असें दिसून आलें आहे कीं, युरोपांतच पोर्चुगीज आणि हालंड ह्यांच्यापेक्षां इंग्लंडची स्थिति जास्त निर्भय असून, हातीं घेतलेल्या कामाचा पाया इंग्लंडाकडून इतर राष्ट्रांपेक्षां जास्त विस्तृत धरला जात असे. युरोपांतील अंतस्थ तंट्यांत फ्रान्स आणि स्पेन यांजला गुंतावें लागलें, त्याप्रमाणें इंग्लंडास गुंतावें लागलें नाहीं. त्याचप्रमाणें हिंदुस्थानसारखा अफाट देश थोड्याशा श्रमांनीं कसा जिंकतां आला, ह्याजविषयीं मागें तपास केलेला आहे. तेथें-ही असेंच आढळून आलें आहे कीं, ही गोष्ट मुख्यत्वेंकरून हिंदु शिपायांच्या हातूनच घडली. लढाईची कुशलता मात्र काळे सैन्यास इंग्रजांकडून मिळाली. ही कुशलता केवळ इंग्रजांचीच होती, असें नसून, युरोपांतील इतर राष्ट्रांस ती पूर्णपणें अवगत होती. हिंदुस्थान जिंकण्याचे कामाची पुढार फ्रेंचांनींच घेतली. फ्रेंचांनीं इंग्रजांस रस्ता दाखविला. तशांत हिंदुस्थानची त्या वेळीं अशी स्थिति झाली होती कीं, कोणत्याही राष्ट्रास तो देश जिंकण्याचें काम फार सोपें गेलें असतें.

ह्यावरून दुसऱ्या मताचे लोक पहिल्या मताचे विरुद्ध ज्या कि-

---

* हा पोर्चुगाल देशांत एक दर्यावर्दी पुरुष होऊन गेला. ह्यानें पुष्कळ नवीन भूमीचा शोध लाविला होता.

त्येक गोष्टींचा आक्षेप घेतात, त्या बऱ्याच अंशीं आह्मांसही कबूल आहेत. मागील विवेचनांत ह्या सर्व राष्ट्रांच्या अंगीं खरोखरी बरे वाईट गुण किती आहेत, याचा निस्पृहपणें विचार केला आहे. ह्या राष्ट्राचा एवढा मोठा विस्तार झाल्यामुळें, ज्या कित्येक गैरसोयी होतात, व जीं कित्येक संकटें उत्पन्न होतात, त्याचा आह्मीं अपलाप केला नाहीं. ह्या राष्ट्राच्या संरक्षणामध्यें कांहीं एक प्रकारचें भूषण आहे, ह्मणून वरील संकटें आणि हरकती सोसल्याच पाहिजेत, ह्या ह्मणण्यांत-ही कांहीं अर्थ नाहीं. अतिशयोक्ति करितांना ह्या राष्ट्राविषयीं कित्येक असें ह्मणतात कीं, 'ब्रिटिश साम्राज्यावर सूर्यास्त कधींही होत नाहीं,' अगर 'ज्या साम्राज्याच्या लष्करांतील प्रातर्दुंदुभिघटिकासाहचर्यानें दिनकर मार्गानुसारी होत्साता रणध्वनींच्या अखंड मालिकेनें भूगोलास बंधन करितो,' असेंही ह्या ब्रिटिश साम्राज्याविषयीं सुंदर रूपक केलेलें आढळतें. इतिहासांत पुष्कळ साम्राज्यांचीं वर्णनें ऐकण्यांत येतात. परंतु त्यांच्यांत भूषणास्पद फारच थोडें असतें. कारण, अशीं राज्यें स्थापन करण्यांत केवळ जुलुमाचाच उपयोग केलेला असतो. राजकीय व्यवहारांच्या संबंधानें हीं राज्यें हलक्या प्रतीचीं असतात. तथापि साम्राज्य ह्या शब्दाचा हा स्वाभाविक अर्थ इंग्लिश राज्यास पूर्णपणें लागू होत नाहीं. फक्त वसाहतीच घेतल्या असतां असें दिसून येईल कीं, वसाहती ह्मणजे एक प्रकारची साधारण वृद्धि आहे. इंग्लिश लोक एका ठिकाणाहून निघून दुसऱ्या ठिकाणीं जाऊन राहिले. त्या ठिकाणीं मूळची वस्ती फार पातळ होती, ह्यामुळें त्या प्रदेशाचें स्वामित्व लढाईनें वगैरे जिंकून घेतल्याशिवाय वसाहत करणारांचे हातीं आलें, ह्मणून अशा कृत्यांत विशेष भूषण मानण्यास जर कांहीं कारण नसेल, तर त्याजमध्यें असाधारण अगर जुलमी अशीं कृत्येंही फारशीं नाहींत.

वास्तविक रीतीनें या विस्तारास साम्राज्य अशी संज्ञा न देतां, केवळ देश अगर प्रदेश अशी संज्ञा जास्त शोभेल. विस्ताराकडेसच जास्त नजर दिली असतां, त्याजबद्दल कोणाही मनुष्यास संतोष वाटल्याशिवाय राहणार नाहीं. स्वदेशांत लोकसंख्या फार झाली असतां, जास्त झालेल्या लोकांस बाहेर जाऊन राहण्यास मोकळी जागा असणें, हें एक त्या लोकांचें मोठें नशीबच समजलें पाहिजे. कोणत्याही देशांतील जागेच्या मानानेंच तेथील लोकसंख्या वाढत असते असें नाहीं; उलट असें आहे कीं, जागा थोडी असून जर लोकसंख्या जास्त वाढली, तर उत्तरोत्तर ती जास्तच वाढत जाते. ग्रेट ब्रिटनमध्यें लोकवस्ति दाट झाली असून, उत्तरोत्तर ती जास्तच दाट होत चालली आहे. दर तीन वर्षांनीं दहा लाख लोकसंख्या वाढते. ह्मणून तेथील लोकांनीं बाहेर जाऊन राहण्याचें काम इतक्या प्रमाणानें जास्त वाढविलें पाहिजे. तें न वाढेल तर देशास मोठी हानि घडेल. परंतु असा एक प्रश्न निघतो कीं, प्रदेश आणि राज्य ह्या दोहोंचीही वृद्धि होणें इष्ट किंवा प्रदेशाची वृद्धि होणें इष्ट; वरील दुसऱ्या मताचे लोक ह्मणतील कीं, राज्याची वृद्धि होणें इष्ट नाहीं. वसाहती साधारणपणें सुस्थितीस आल्या ह्मणजे त्या मूळ देशापासून स्वतंत्र होणें चांगलें. अशा ठिकाणीं आलंकारिक भाषेचा उपयोग करण्यांत येतो. त्या अलंकाराच्या योगानें वरील मतास फार बळकटी येते. वर असें सांगण्यांत आलें आहे कीं, दोन देशांमधील अंतर कितीही असलें, तरी अलीकडे तें अगदीं नाहींसारखें झालें आहे. असा कदाचित् समय प्राप्त होईल कीं, त्या वेळीं हल्लींच्यापेक्षांही विस्तृत राष्ट्रें भूतलावर उत्पन्न होतील. प्राचीन काळीं ग्रीस देशांतून सिसिली बेटांत लोक जाऊन राहत असत. ते ग्रीस देश सोडून जातांच स्वतंत्र होत. ह्मणून त्या काळीं लहान लहान नगरराष्ट्रें स्थापन होत असत. अठराव्या शतकांत अट-

लांटिक महासागराच्या पलीकडे लोक जाऊन राहिले असतां, ते मूळ देशाशीं ऐक्यत्वानें राहतील, ही गोष्ट बर्क यास त्यावेळीं शक्य वाटली नाहीं. ह्मणून ह्या काळांत वयांत आलेल्या मुलांची वसाहतींस उपमा देऊन अलंकारानें वर्णन केलें असतां, ती गोष्ट सिद्ध झाल्याप्रमाणें वाटूं लागते. परंतु बर्कच्या वेळेपासून अटलांटिक महासागर नाहींसारखा झाला आहे. सिसिली आणि ग्रीस ह्यांच्यामध्यें असलेल्या छोटेखानी समुद्राप्रमाणें अटलांटिक महासागराची स्थिति आहे. मग वरील अलंकार आतां कसा बरें लागू पडेल? आह्मीं असें सांगितलें आहे कीं, एखाद्या गोष्टीच्या सत्यतेबद्दल ऐतिहासिक गोष्टीचें प्रत्यंतर दिलें ह्मणजे ती गोष्ट खरी वाटूं लागते. परंतु सूक्ष्मदृष्ट्या पाहूं गेलें तर तें ऐतिहासिक उदाहरण बरोबर लागू पडत नाहीं, असें शेवटीं दिसून येतें. राजनीतिशास्त्राचा अभ्यास करणारांनीं इतिहासाचेंही अध्ययन केलें पाहिजे. कारण, इतिहासाचा अभ्यास केला नाहीं तर राजनीतिशास्त्रांतील वादाच्या प्रत्यंतरास अपरिचित ऐतिहासिक उदाहरणें देऊन ते वाद खोटे असतांही खरे ठरविण्यांत येतील. वरील दुसऱ्या मताच्या लोकांचे ह्मणण्यास आधार अमेरिकेंतील राज्यक्रान्ति होय. परंतु अमेरिकेंत राज्यक्रान्ति झाली त्या वेळची जगाची स्थिति व तत्संबंधीं दुसऱ्या आनुषंगिक गोष्टी ह्या अगदीं बदलून गेल्या आहेत. त्या वेळीं इंग्लंड देशाचा निर्वाह शेतकीवर होत असे. वस्तीही त्या वेळीं दाट नव्हती. धर्मसंबंधीं नवीन नवीन विचार इंग्लंडांत उद्भवून ते ज्या गृहस्थांस पसंत नसत, ते लोक इंग्लंड सोडून अमेरिकेंत जाऊन राहत. ह्यावरून अमेरिकेंतील वस्ती केवळ अशा धर्मवेड्या लोकांचीच होती. ह्याशिवाय इतर लोकांचें केवळ वसाहतींकरितां तिकडेस जाणें येणें फारसें नसे. ज्याप्रमाणें इंग्रज लोक व फ्रेंच लोक ह्यांजमधील भिन्नभाव कधींही नाहींसा होणारा नाहीं,

त्याचप्रमाणें इंग्लंड व अमेरिका ह्यांजमध्यें अटलांटिक महासागररूपी एवढा मोठा प्रचंड अडथळा होता, कीं तो दूर होण्याची कोणास आशाही नव्हती. अशा स्थितींत अमेरिका व इंग्लंड ह्यांची जीं ताटा-तूट झाली, तिजमुळें दोन्ही देशांस बरीच इजा झाली. त्या दिवसा-पासून दोनही देशांची भरभराटी होत चालली आहे, हें खरें आहे; तरी त्यांना दुसरी लढाई करण्याचा प्रसंग पडला व कदाचित् तिसरीही कर-ण्याचा प्रसंग येईल. त्या देशाची भरभराटी होण्याचें कारण त्याचें इंग्लंडापासून स्वतंत्र होणें, असें जर कोणी मानीत असेल, तर ती मोठी चूक आहे. इतकी गोष्ट खरी कीं, वस्तुस्थितीचा प्रत्येक भाग त्या वेळे-हून हल्लीं अगदीं बदलून गेला आहे. महासागर व धर्मसंबंधीं मतभेद हीं दोन मोठीं भेदक कारणें त्या वेळीं होतीं; तीं आतां भेदक नाहींत. व्यापार व एका देशाहून दुसऱ्या देशाशीं प्रवास, हीं दोन संयोगकारी कारणें हल्लीं जबरदस्त चालू आहेत. शिवाय, दुसरीं एकीकरणाचीं जीं कित्येक स्वाभाविक कारणें आहेत, त्यांचेंही वजन हल्लीं चांगलें पडत आहे. राष्ट्रैक्य, भाषैक्य व धर्मैक्य हीं एकीकरणाचीं साधनें आहेत. विरुद्ध कारणांचा जोर कमी होतांच, हीं कारणें हल्लीं आपला प्रभाव दाखवूं लागलीं आहेत. मूळ देशानें आपला मातृत्वाचा हक्क सोडून दिला आहे. नवीन वसलेल्या देशांवर अन्यायी मागण्या करणें व त्यांजवर त्रासदायक प्रतिबंध लागू करणें, ह्या गोष्टी आतां बंद झाल्या आहेत. शिवाय, व्यापाराकरितां व जास्त वाढलेल्या लोकसंख्येच्या वस्तीकरितां वसा-हती मूळ देशास फारच उपयोगाच्या होत आहेत. शिवाय, स्वतंत्रपणें राहण्यांत वसाहतींवर एक प्रकारची जबर जबाबदारी येऊन पडते. कदा-चित् त्या योगानें बुद्धिमांद्य येईल तें निराळेंच. हें वसाहतींस पूर्णपणें अवगत आहे. आणखी असें आहे कीं, दळणवळण दररोज जास्त वाढत

चाललें आहे. त्यास प्रतिबंध करण्यास विरुद्ध जोर कोणताही चालू नाहीं. जुन्या पद्धतीनें जे कलह उत्पन्न होत असत, ते दर दिवस नाहींसे होत चालले आहेत. ह्या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्या ह्मणजे असें दिसून येतें कीं, सर्व वसाहती मिळून एक राष्ट्र बनून त्यास हळू हळू विस्तृत ब्रिटिश सार्वभौम राष्ट्र असें नांव शोभलें जाईल. भिन्न भिन्न प्रांतांमधील संबंध जास्त निकट होत जातील. समुद्ररूपी अडथळे त्रासदायक होणार नाहींत. आपण एका लहानशा बेटांत राहणारे लोक, त्या बेटाच्या बाहेर आपलें कांहीं नाहीं, असें मानण्याची जी इंग्रज लोकांची जुनी चाल, ती त्यांच्या मनांतून उत्तरोत्तर अगदीं नाहींशी होईल. अशा प्रकारेंकरून इंग्रज लोक जर हळू हळू वसाहतींशीं कृतीनें व मनानें जास्त आप्तपणा दाखवूं लागतील, दूर देशीं जाऊन राहिले ह्मणजे ते लोक मूळ देशास मुकले असें इंग्रज लोक मानणार नाहींत, तर याचा असा एक चांगला परिणाम होईल कीं, स्वदेशांत लोकसंख्या वाढल्यानें उत्पन्न होणाऱ्या दरिद्रतेपासून त्यांस तरणोपाय प्राप्त होईल. दुसरा परिणाम असा होईल कीं, लढाईचा प्रसंग आला असतां, ह्या सर्व विस्तृत राष्ट्राची शक्ति प्रसंगीं एकवट करण्याची सवड राजकर्त्यांस मिळावी, अशी कांहीं तरी राज्य चालविण्याची एक चांगली युक्ति प्रचारांत येईल.

असें मत देतांना आमच्यासमोर युनायटेड् स्टेट्सूचें उदाहरण आहे. ह्या प्रकरणाच्या आरंभीं जीं दोन मतें सांगितलीं आहेत, त्यांपैकीं दुसऱ्या मताचे ह्मणजे अवमानितगुण मताचे जे लोक आहेत, ते युनायटेड् स्टेट्सूची तारीफ करितात, ही आश्चर्याची गोष्ट आहे. भिन्न भिन्न प्रांतांस एकवट करण्यांसाठीं जे प्रयत्न करण्यांत आले, त्यांस उत्तम यश आल्याचें युनायटेड् स्टेट्स् हेंच फार चांगलें उदाहरण आहे. इंग्लंडांतून जेव्हां प्रथम लोक अमेरिकेंत वसाहती करतां गेले, त्या वेळेस

ते अट्लांटिक महासागराच्या किनाऱ्यावर थोडीशी जागा व्यापून राहिले. ओहिओ नदीच्या कांठच्या प्रदेशांत ते नुकतेच जाऊन राहूं लागले आहेत. अशा ह्या वसाहती आत्मनिष्ठेनें सतत उद्योग केल्यानें किती जलद व किती अमर्याद आजपर्यंत वाढत गेल्या आहेंत त्या पहा. त्यांचा अंमल अगर त्यांचा मुलूख ह्यांनीं प्रथमतः मिसिसिपी नदीच्या आसपासचा सर्व प्रदेश व्यापून टाकिला. नंतर उत्तर अमेरिकेंत जे मोठे खडकाचे डोंगर आहेत, तेथपर्यंत ते पसरले. असें होतां होतां शेवटीं ते अगदीं पश्चिमेस पासिफिक् महासागराच्या किनाऱ्यापर्यंत वाढत गेले. इतका प्रदेश व्यापून टाकण्यास त्यांस कांहींच अडचण आली नाहीं. त्यांच्या राज्यव्यवस्थेंत घोंटाळा झाला नाहीं. तरी आमच्या ह्या प्रस्तुतमतवादी लोकांप्रमाणें आपणांस पाहिजे तेव्हां स्वतंत्र होतां येईल, असें त्यांनीं कधींही मानिलें नाहीं. उलट स्वतंत्र होण्याचा हक्क आपणांस नसावा, ह्मणूनच प्रसिद्धपणें ते भांडत असतात. सर्व राष्ट्राची एकी राखण्याकरितां त्यांनीं पैशाचा व जीवाचा असा विपुलतेनें व्यय केला आहे कीं, तसा दुसरा कोठेंही आढळणार नाहीं. हें ऐक्य मोडण्याचे प्रयत्न ते मोठ्या दृढतेनें नाहींसे करीत आहेत. राष्ट्र जितकें मोठें वाढेल तितकें तें अपायकारक होय, हें ह्मणणें ते केवळ निरर्थक समजतात.

प्रस्तुत काळच्या यांत्रिक शक्तीनें राजकीय व्यवहारांत जे विलक्षण परिणाम घडून येत आहेत तिकडे कदाचित् लोकांचें लक्ष जात नसेल. मानवी इतिहासाच्या बहुतेक भागांत असें आढळतें कीं, राष्ट्र बनविण्याचें काम भूमीच्या विशिष्ट स्थितीवर अवलंबून आहे. प्राचीन काळीं मोठमोठीं राष्ट्रें उत्पन्न होत नसत. कितीही उत्तम प्रकारची राजनीति असली, तरी ती लहानशा संस्थानांतच समाविष्ट होत असे. प्राचीन काळीं चांगलीं राष्ट्रें ह्मणजे लहानशीं शहरें असत. रोमन

राष्ट्राचा विस्तार होऊं लागला, तेव्हां तेथील राज्यनीति फार हलक्या प्रतीची होत चालली. मध्यकालीन युरोपांत प्राचीन काळापेक्षां बरींच मोठीं राष्ट्रें बनूं लागलीं. परंतु त्यांचीही राज्यनीति बरीच हलकी असे. राजकीय उन्नतीच्या संग्रहाकरितां त्यांस रोम आणि अथेन्स यांजकडेस पूज्य बुद्धीनें पहावें लागे. पुढें लोकनियुक्ततेचें तत्व लोकांस कळूं लागलें. तेव्हांपासून त्या राष्ट्रांची व्यवस्था सुधारूं लागली. दोन लक्ष चारशें मैल इतका विस्तार व त्यांत तीन कोटी लोकसंख्येची वस्ती, अशा प्रकारचीं राष्ट्रें हल्लीं अस्तित्वांत आहेत. त्यांत पहिल्यापेक्षां हल्लीं जास्त सुधारणा झाली आहे. भिन्न भिन्न राष्ट्रांनीं एकमतानें वागण्याचें तत्व अलीकडे सर्वांस कळूं लागलें आहे. हें व लोकनियुक्तता अशीं दोन तत्वें लोकांस फार हितावह झालीं आहेत. वाफ आणि वीज यांजपासून लोकांस पुष्कळ उपयोग होऊं लागला आहे. ह्या सर्व कारणांच्या योगानें हल्लींच्याहीपेक्षां विस्तृत राष्ट्रें प्रचारांत यावीं; व त्या सर्वांची राज्यनीति उत्तम प्रतीची असावी, हें पुष्कळ अंशीं शक्य झालें आहे. युरोपांतील रशियाचा विस्तार वीस लक्ष चौरस मैलांहून थोडा जास्त असून, त्यांतील लोकसंख्या आठ कोटींपर्यंत आहे. ह्या शतकाच्या अखेरीस युनायटेड् स्टेट्स्ची लोकसंख्या वरच्याइतकी होऊन त्यांचा देशविस्तार चाळीस लक्ष चौरस मैल होईल. तरी रशियाची राज्यनीति उत्तम प्रकारची आहे, असें आपल्यास आज ह्मणतां येणार नाहीं. पुष्कळ गोष्टींचा रशियन लोकांस अनुभव घेणें आहे, व पुष्कळ फेरफारही होण्याचा आहे. परंतु एवढें अफाट राष्ट्र आणखीही वृद्धि पावून त्याच्यांत स्वतंत्र संस्थांचा मोकळेपणें समावेश होईल, असा उघड सुमार आज दिसत आहे.

अतिशयोक्तगुणमताभिमानी पौर्वदेशनिवासी आंग्लभौमानें केलेल्या

ब्रिटिश राज्याच्या भपकेदार वर्णनाचा जर आपणांस राग येत असेल, तर ह्याजबद्दल त्या राज्यांतच कांहीं दोष आहे, असें ठरविण्यास कांहीं कारण नाहीं. एकंदर राज्यांचें वर्गीकरण करतांनाच आपण ह्या राज्याची भलत्याच सदराखालीं गणना केली असेल, ह्मणून वरील चुकीचा प्रकार घडतो, असें मानण्यास जागा आहे. तुर्क अगर इराणी लोकांनीं हल्ले करून लुटारूपणाच्या धंद्यांत लहान लहान भाग एकत्र जोडून बनलेल्या राष्ट्राची उपमा ह्या राष्ट्रास देणें वाजवी नाहीं. त्यांची तुलना युनायटेड् स्टेट्स्सारख्या राष्ट्रांशीं केली पाहिजे. असें केलें ह्मणजे हें विस्तृत ब्रिटिश राष्ट्र पूर्वीच्या राष्ट्राप्रमाणें जुलमी अगर प्रजाशक्त्यपहारक नसून, प्रस्तुत कालच्या स्थित्यनुरूप ज्या प्रकारचें तें खरोखरी असूं शकेल व असलें पाहिजे, त्या प्रकारचें तें आहे.

शेवटीं लहान राष्ट्रें चांगलीं, किंवा मोठीं राष्ट्रें चांगलीं, हा एक प्रश्न आहे. परंतु इतर प्रश्नांशीं संबंध ठेविल्याशिवाय ह्या प्रश्नाचें उत्तर देणें, अगर त्याजविषयीं वादविवाद करणें, वाजवी नाहीं. लहान राष्ट्रांची पाहिजे तितकी प्रशंसा ग्रंथांतरीं विपुल आढळते, ह्मणून व्यवहारांत ती बरी आहे, असें समजण्यास कारण नाहीं. शेजारचीं सर्व राष्ट्रें लहान असून, त्यांजमध्यें लहान राष्ट्र असणें, व शेजारचीं सर्व राष्ट्रें मोठीं असून, त्यांजमध्यें लहान राष्ट्र असणें, हे दोन प्रकार अगदीं भिन्न आहेत. अथेन्स आणि फ्लॉरेन्स यांच्या उत्कर्षाच्या दिवसांचा इतिहास वाचण्यास अतिशय आनंद वाटतो. परंतु त्या संस्थानांचा ज्या परराष्ट्रांशीं संबंध घडावयाचा प्रसंग येई, तींही जोंपर्यंत त्यांचेइतकींच बेताचीं होतीं, तोंपर्यंतच तो उत्कर्ष टिकला. जेव्हां पुढें मोठमोठीं देशराष्ट्रें मजबूद पायावर स्थापन झालीं, तेव्हां अथेन्स व फ्लॉरेन्स ही नगरराष्ट्रें लागलींच लयास गेलीं. मासीडोनियाचें

राज्य स्थापन होतांच अथेन्सचा प्रभाव फिका पडला. तसेंच पांचव्या चार्ल्स* बादशहानें फ्लारेन्सचें राज्य तेव्हांच मोडकळीस आणलें. ह्मणून आजपर्यंत अपरिचित अशीं विस्तृत राष्ट्रें स्थापन होत आहेत, ही गोष्ट जर खरी असेल, तर राष्ट्रें लहान व आटोपसर असावी, असें ह्मणणारांनीं दूरवर विचार केल्याशिवाय आपलें मत दिलें, असें होत नाहीं काय ? रशियाचें वजन मध्य युरोपावर जरा भारी पडूं लागलें आहे. रशियाचा प्रदेश व लोकसंख्या तर मोठीं आहेत. मग जर तेथील राज्यव्यवस्था व बुद्धिमत्ता हीं वाढतां वाढतां जर्मन लोकांच्या तोडीचीं झालीं, जिकडे तिकडे आगगाडीच्या सडका झाल्या, सर्व लोकांस उत्तम शिक्षण मिळून राज्याची व्यवस्था मजबूद पायावर दृढ झाली, तर मध्य युरोपाची मग काय स्थिति होईल बरें ? बरें, इतक्या गोष्टी होण्यास जर पन्नास वर्षें लागतील असें आपण धरलें, तर त्या पन्नास वर्षांत रशियाची लोकसंख्या आज आहे तितकी ह्मणजे आठ कोटीच न राहतां त्याचे दुप्पट ह्मणजे सोळा कोटी होईल. ज्याप्रमाणें निरनिराळ्या देशभर एक स्वतंत्र राष्ट्र बनून फ्लारेन्स वगैरे नगरसंस्थानें लयास गेलीं, त्याचप्रमाणें हल्लीं जीं राष्ट्रें मोठीं असें ह्मणण्यांत येत आहे, त्यांस रशिया व युनायटेड् स्टेट्स् हीं आणखी पन्नास वर्षांनीं अगदीं ग्रासून टाकतील. हा काल ह्मणजे फार लांब नाहीं. आपल्यांतीलच कित्येक लोक असा काल पाहण्यास जगतील. ही फार खोल विचाराची गोष्ट आहे. निदान इंग्लंडसारख्या राष्ट्रास तर अवश्यच आहे. कारण तूर्त इंग्लंडास दोन मार्ग खुले असून, त्यांपैकीं पाहिजे तो पसंत करण्यास त्यास सवड आहे. एक मार्ग असा कीं, पुढें जीं राष्ट्रें फार प्रचंड होतील ह्मणून आह्मी

---

*पांचवा चार्लस्. (१५००–१५८८) हा एक बळिष्ट बादशहा फ्रान्स व सभोंवतालचे देशावर राज्य करीत असे.

भविष्य करीत आहों, त्यांच्या तोडीचें आपणही व्हावें; अगर दुसरा मार्ग असा कीं, आपलें महत्व फक्त युरोप खंडांतच राखून स्पेन देश ज्याप्रमाणें केवळ प्राचीन वैभवाबद्दल संतोष मानून स्वस्थ बसला आहे, त्याचप्रमाणें ह्या ब्रिटिश राष्ट्रानेंही पुढें पाऊल टाकण्याचें सोडून देऊन पूर्वीच्या वैभवाबद्दल अभिमान बाळगून आतां स्वस्थ बसावें.

परंतु हें वरचें ह्मणणें हिंदुस्थानास लागू पडत नाहीं. इंग्लंड व त्याच्या वसाहती मिळून एकच देश व एकच राष्ट्र असें आह्मीं ह्मटलें आहे, तर त्याचें कारण इतकेंच कीं, सर्वांत मिळून लोकसंख्या एकाच जातीची ह्मणजे इंग्लिश आहे. सर्व ठिकाणच्या संस्थाही एकाच प्रकारच्या आहेत. हिंदुस्थानची गोष्ट तशी नाहीं. तेथील लोकसंख्या राज्यकर्त्यांहून पूर्णपणें भिन्न जातींची असून, तेथील संस्थाही इंग्लंडच्या संस्थांहून अगदीं भिन्न आहेत. वास्तविक पाहतां, हिंदुस्थान एक स्वतंत्र राष्ट्र आहे, व हें पूर्वेकडील राष्ट्र आहे. ह्या हिंदुस्थानचेच संबंधानें विशेषेंकरून वर सांगितलेल्याप्रमाणें प्रथममतवादी लोकांचें ह्मणणें आह्मांस फार अनुचित वाटतें. प्राचीन काळच्या राष्ट्रांचे इतिहास वाचून त्यांच्या मनांत पाहिजे तशा भव्य कल्पना घोळत असतात. ह्यामुळें प्रस्तुतच्या वस्तुथितीचें पूर्ण अज्ञान त्यांच्या ह्मणण्यांत व्यक्त होतें. त्या राष्ट्रा विषयीं जें काल्पनिक वैभव लोकांत मानण्यांत येत आहे, तें मिथ्या असतांही, त्या राष्ट्रापासून इंग्रज लोकांस दुसऱ्याच एका प्रकारचा मोठा उपयोग होत आहे, असें जरी कदाचित् आपणांस समजलें, तरी ती वस्तुस्थिति सूक्ष्म रीतीनें पाहूं गेलें तर या अविवेकी गृहस्थांचें ह्मणणें आह्मांस बिलकुल संमत नाहीं.

हिंदुस्थान आणि इंग्लंड ह्यांजमध्यें अलीकडे व्यापार फार वाढला आहे. परंतु ज्या गृहस्थांनीं हें राज्य स्थापन केलें, त्यांच्या मनांत

ही व्यापार इतका वाढेल अशी कल्पनाही नव्हती, हें सांगितलेंच आहे. हिंदुस्थानापासून इंग्लंडास दुसरा कांहीं फायदा आहे असें दृश्य होत नाहीं. ह्मणून घोटाळ्यांत पडून, आपण असा शोध करूं लागतों कीं, इतके श्रम करून हिंदुस्थानचें राज्य मिळविण्याचें इंग्रजांस प्रयोजन काय होतें ? ऐतिहासिक माहितीवरून असें दिसून येतें कीं, इंग्लंड व फ्रान्स ह्यांची वसाहतींच्या संबंधानें पुष्कळ दिवस फार निकराची स्पर्धा चालू होती. त्यामुळें ज्या लढाया फ्रान्सबरोबर इंग्लंडास कराव्या लागल्या, त्यांचे योगानें मद्रास व कलकत्ता ह्यांचे आसपासचे कित्येक प्रदेश त्यांचे ताब्यांत आले. ह्या प्रदेशांवर आपला अंमल कायम करीत असतां, प्रथमारंभीं जे कियेक अन्याय घडले होते, ते काढून टाकण्यांत येऊन, त्या प्रांतांची राज्यव्यवस्था शुद्ध होऊन, ती प्रत्यक्ष इंग्लंडांतील ब्रिटिश अधिकाऱ्यांचे ताब्यांत आली. पुढें मूळ सरकाराकडून गव्हर्नर जनरल नेमण्यांत येत असत, त्यांपैकीं कित्येकांनीं सांपडेल तितका मुलूख आपले राज्यास जोडण्याचा सपाटा चालविला. तथापि त्यांचीं कृत्यें नीच होतीं, असें ह्मणतां येणार नाहीं. त्यांचीं मनें महत्वाकांक्षेनें पूर्ण भरलीं असून, कोणत्याही कृत्यास एकवार हात घातल्यावर ते माघार घेत नसत. लारेन्स साहेबानें मार्किस ऑफ् वेलस्लीचें चरित्र लिहिलें आहे, त्यांत तो असें ह्मणतो कीं, " पिट्ट आणि लॉर्ड वेलस्ली ह्यांनीं गुप्तपणें एकदां खलबत चालविलें होतें. त्या वेळेस अमेरिकेंतील वसाहती आपले ताब्यांतून गेल्यामुळें जो तोटा झाला, तो भरून काढण्याकरितां हिंदुस्थानांत दुसरे प्रदेश जिंकून घ्यावयाचे असा त्यांनीं त्या वेळेस विचार ठरविला. " ही गोष्ट खरी असेल तर आमच्या ह्या प्रस्तुतच्या विचारसरणीप्रमाणें वरील मुत्सद्यांचे हे विचार अगदीं अप्रबुद्ध व छांदिष्ट होते, असें ह्मणावें लागतें. परंतु पुढें ज्या गोष्टी घडून आल्या,

त्यांचें बाह्य स्वरूपतरी ह्या वरच्या प्रकारचें नाहीं. आपली कृत्यें न्याय्य आहेत असें दाखविण्यासाठीं केवळ लोकांच्या कल्याणार्थ मुलूख जिंकण्यांत येत आहेत, असा मजकुर लोकांत प्रकट करण्यांत आला. हे विचार प्रसिद्ध करितांना ज्या लेखांचा उपयोग करण्यांत आला त्यांचें खंडन करणें कठिण होतें. हिंदुस्थानामध्यें अतिशोचनीय अशी दुःस्थिति माजली होती, हें नाकबूल करतां येण्याजोगें नव्हतें. एखादे वेळेस एखादें जुलमी राज्य प्रबल होतेंसें वाटे व त्यास चिरस्थायिकताही प्राप्त होण्याचा सुमार दिसत असे; परंतु अशीं राज्यें केवळ लष्करी बाण्याचीं असून, त्यांची राज्यनीति अगदीं हलक्या प्रकारची होती. युरोपामध्यें अशी अंदाधुंदी कित्येक वेळां असल्याचें ऐकिवांत आहे. स्कॉटलंड देशांतील डोंगराळ प्रदेशांत राहणाऱ्या कित्येक जातींमध्यें व पश्चिम युरोपांतील लुटारू लोकांमध्यें असे दंगेधोप्याचे प्रकार चालू असत. भूमध्यसमुद्रामध्यें चांचे लोकांचें प्राबल्य वाढून, ते लोकांस फार त्रास देत असत. अशा चांचे लोकांचें वर्चस्व मोडण्याकरितां पांपी नांवाचा सरदार एक वेळ मुद्दाम पाठविण्यांत आला होता. असे दंगेधोपे कधींकधीं इतके वाढत असत, कीं त्यांजपासून उद्भवणाऱ्या संस्थांना एखादे वेळेस राष्ट्रांचा आकार येत असे. तरी हिंदुस्थानांत लुटारू लोकांनीं स्थापन केलेल्या राष्ट्रांच्या तोडीचीं तीं मुळींच नसत. इतकी भयंकर स्थिति हिंदुस्थानची असे. चौथाई ह्मणून एक मोठा अन्यायाचा कर असे. जिकडे जिकडे मराठे सरदार जात, तिकडे तिकडे ते हा कर सर्वांवर सारखा बसवीत असत. पेंढारी ह्मणून दुसरे एक लुटारू लोक होते, त्यांनीं तर पाहिजे तो क्रूरपणा करण्यांत कमाल केली होती. ही अंदाधुंदी उत्पन्न होण्यास मूळ कारण मोंगली राज्याचा ऱ्हास हें होय. एवढा खटाटोप

हातीं न घेतां फक्त आपल्या मुलखांचेंच संरक्षण करून स्वस्थ बसणें इंग्लिशांस शक्य होतें. स्वतःचे मुलखांबाहेर पाहिजे तो घोटाळा होवो, तिकडे लक्ष न देतां इंग्रजांस राहतां आलें असतें. परंतु जे गव्हर्नर जनरल प्रत्यक्ष हिंदुस्थानांत अंमल करीत होते, त्यांस ही गोष्ट योग्य न वाटून फार अन्यायाची वाटली. लुटालूट आणि मारामार ह्यांच्या सातत्याचा एका क्षणांत भंग करून तेथें शांततेचा अंमल बसविणें व ह्याजकरितां दुसरा मुलूख स्वतःचे सत्तेखालीं आणण्याचा प्रयत्न करणें, हें केवळ त्यांस आपल्या कर्तव्यकर्मासारखें होतें.* लॉर्ड वेल्स्लीचेंही असेंच ह्मणणें आहे कीं, हिंदुस्थानांत सार्वभौम सत्ता नेहमीं चालत आलेली होती, व त्या वेळेस तर अशा सार्वभौम सत्तेची देशकल्याणाकरितां फारच अवश्यकता होती. मोंगलांच्या सार्वभौम सत्तेचा आतां अंत झाल्यामुळें तीच सार्वभौम सत्ता स्वतःकडे घेऊन हिंदुस्थानचें संरक्षण करणें हें कंपनीला आपलें कर्तव्यकर्म वाटलें.

अशा प्रकारें हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्यस्थापना झाली. मुलूख जिंकण्याच्या महत्वाकांक्षेनें ही गोष्ट अंशतः झाली असेल. तसेंच भयंकर प्रकार हिंदुस्थानांत चालू होते, ते बंद करण्याच्या औपकारिक इराद्यानेंही अंशतः ही गोष्ट झाली असेल. इंग्रजांचे हेतु कांहीं जरी असले, तरी त्यांनीं आपले शिरावर जबरदस्त जबाबदारी ओढून घेतली व त्याजबदल त्यांस फायदाही फारसा झाला नाहीं, ही गोष्ट खरी आहे. हल्लीं इंग्लंडचा मोठा व्यापार हिंदुस्थानाशीं चालू आहे; तथापि हा व्यापार

---

* लाखों मनुष्यांवर आपण उपकार केलेले आहेत, हें ह्मणणें जरी थोडेंसें गर्वोक्तीसारखें दिसतें, तरी तें सत्य आहे. लुटारू लोकांच्या घोड्यांच्या पादाक्रमणानें मात्र जी जमीन पूर्वी उखळली जात असे, तीच जमीन जिकडे तिकडे शेतकरी लोक हल्लीं शांततेनें नांगरीत आहेत, असें लॉर्ड हेस्टिंग्स् ह्यानें लिहून ठेविलेलें आहे. फेब्रुवारी सन १८१९. (ग्रं. क.)

सुरू ठेवण्यांत रशियाची, सर्व मुसलमानी राष्ट्रांची, व ईजिप्ट येथील घडामोडींची इंग्लिश लोकांस मोठी धास्ती बाळगावी लागत आहे. ह्यावरून ब्रिटिश हिंदुस्थानच्या उत्पत्तीची हकीकत वाचून, मनन करीत असतां, जे उद्गार मनांत येतात ते अमेरिकेंतील वसाहतींपासून उत्पन्न होणाऱ्या उद्गारांहून अगदीं भिन्न आहेत. वसाहतींची वृद्धि स्वाभाविक रीत्या झाली आहे. अगदीं साधारण कारणांचा संयोग होऊन त्यांचें अस्तित्व स्थापन झालें आहे. परंतु हिंदुस्थानची राज्यस्थापना केवळ काल्पनिक अशा साहसी कृत्यांचा परिणाम आहे. ती फार महत्वाची आहे, चमत्कारिक आहे, व मनास अचंबा वाटणारी आहे, तरी समजण्यास फार कठिण असून, तिजविषयीं ठरीव मत देणें फार कठिण आहे. ह्या गोष्टीपासून इंग्लंडास फायदा होईल, अशी आशा आहे, तरी हा वेळपर्यंत प्रत्यक्ष रीतीनें इंग्लंडास कोणत्याही प्रकारचा फायदा झालेला नाहीं.

असेंही वर सांगण्यांत आलें आहे कीं, जरी हें हिंदुस्थानचें राष्ट्र प्राच्य आहे, तरी त्याच्या वर्णनावरून जितका धोका इंग्लंडास होईल, असें सांगण्यांत येतें, तितकी भीति खरोखरी बाळगण्याचें कारण नाहीं. ज्या प्रकारें रोमन महाराष्ट्र रोम शहरास जोडलें गेलें होतें, त्या प्रकारें हिंदुस्थानचें राज्य इंग्लंडास जोडलें गेलें नाहीं. पूर्वेकडील विचारांचें व राज्यव्यवस्थेचें वजन इंग्लंडच्या व्यवस्थेवर पडलें नाहीं, व त्याजमुळें इंग्लंडची पद्धत बिघडण्याचा संभव नाहीं. तसेंच हिंदुस्थानचें राज्य चालविण्यास इंग्लंडास कांहीं खटपट करावी लागत नाहीं. इंग्लंडच्या जमेवर हिंदुस्थानचा कोणत्याही प्रकारचा बोजा पडत नाहीं. स्वसंरक्षणार्थ लागणाऱ्या खर्चाची उत्पत्ति हिंदुस्थानांतून होत आहे. तेथील राज्यव्यवस्था इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेहून इतकी अलग आहे कीं, हिंदुस्थानावर कांहीं अरिष्ट आलें असतां, त्याची बाधा इंग्लंडास व्हावयाची नाहीं.

नंतर पुढें ह्या हिंदुस्थानच्या राष्ट्राचा परिणाम हिंदुस्थानावरच काय होईल, ह्याचा विचार आह्मीं केला आहे. जर इंग्लंडास हिंदुस्थानापासून फारसा फायदा झालेला नाहीं, तर हिंदुस्थानास तरी कांहीं फायदा झाला आहे किंवा नाहीं, ह्या प्रश्नाचें उत्तर आह्मीं स्पष्टपणें देण्याचें धाडस केलें नाहीं. त्याजबद्दल आह्मांसच फार संशय वाटत आहे. इतकें मात्र आह्मी खात्रीपूर्वक सांगूं शकतों कीं, पृथ्वीच्या पाठीवर असा मोठा प्रयोग कधीं कोणीं केला नाहीं. रोमन महाराष्ट्राचे जे परिणाम सर्व युरोपीय राष्ट्रांवर घडून आले, त्यांच्याशीं ह्या प्रयोगाच्या परिणामांचें साम्य आहे. कदाचित् त्यांहीपेक्षां हे हिंदुस्थानावर घडलेले परिणाम मोठे असतील. ह्याचा अर्थ असा कीं, हिंदुस्थानास मोठे फायदे घडून येतील, परंतु त्यापासून मोठमोठीं नुकसानेंही हिंदुस्थानास घडून येणार नाहींत, असें समजावयाचें नाहीं. इतकेंच नाहीं, पण जास्त संभव कशाचा आहे आणि युरोपियन सुधारणेच्या पूर्ण कबजांत हिंदुस्थान देश आणण्याविषयीं इंग्रजांचे प्रयत्न जर सफल झाले, तर त्यांचे हातून हिंदुस्थानावर खरोखरी मोठे उपकार झाले असें मानावें किंवा नाहीं, असें जर कोणी आह्मांस विचारील, तर आह्मी त्यास इतकेंच उत्तर देऊं कीं, 'असें व्हावें अशी आमची इच्छा आहे, आह्मी असा भरंवसा ठेवितों.' वर्तमानपत्रकार नेहमीं अशा विषयावर फारच अनकूल अभिप्राय झोडीत असतात. अशा अभिप्रायांवर विश्वास ठेवून असल्या गहन प्रश्नांचा विद्वत्तेच्या जोरावर आपण एकदम निकाल करतां कामा नये. पाश्चिमात्यांची सुधारणा ह्मणजे अप्रतिम चांगुलपणाचा संग्रह आहे असें जरी ते मानतात, तरी सर्वथैव ती तशीच असेल कीं काय हा संशय आहे. जे केवळ निरपेक्षबुद्धीनें हिंदुस्थानसंबंधीं विचार करितात त्यांस असें दिसतें कीं, हिंदुस्थानामध्यें एक मोठी घडामोड चालू आहे. परंतु

केव्हां केव्हां ह्या घडामोडींचे मोठे दुष्परिणाम देशावर घडतात. बऱ्या-वाईट सर्वच गोष्टींचा एकदम नाश झाल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. तिज-पासून नवीन व चांगल्या गोष्टींचा उद्भव झाला आहे किंवा नाहीं ह्याचा वानवाच वाटतो. एक मात्र सुधारणा चांगली झाली आहे खरी, व ह्या सुधारणेमध्यें दुसऱ्या सर्व सुधारणांचा वस्तुस्थित्या समावेश होणारा आहे. अंदाधुंदी व लुटालूट हीं आतां लयास गेलीं आहेत. रोमन महाराष्ट्र स्थापन झाल्यावर सर्व युरोपभर ज्याप्रमाणें शांतता झाली, त्याचप्रमाणें ह्या पंचवीस कोटि लोकसंख्येमध्यें सर्वत्र उत्तम प्रकारची शांतता वास करीत आहे.

हिंदुस्थान देश पहाणारांना दुसरी एक गोष्ट दिसते, ती अशी कीं, हल्लीं जो सुधारणेचा प्रयोग घडत चालला आहे, तो सतत चालू ठेविला पाहिजे. राज्यकर्त्यांच्या मर्जीस वाटलें ह्मणून तो त्यांनीं बंद करतां कामा नये. कारण, हिंदुस्थानांतील ह्या प्रयोगांतही इतर ठिकाणीं चालू असलेलीं प्रस्तुत कालचीं एकीकरणाचीं जोराचीं कारणें उपयोगांत आहेत. ही गोष्ट खरी असो अगर वाईट असो. हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांचा संबंध दरदिवस जास्त निकट होत चालला आहे. ह्या-वरून असें समजूं नये कीं हे देश पृथक्करणाचीं कारणें एकदम उद्भव-णार नाहींत. तसेंच प्रत्यक्ष ब्रिटिश राज्य कायम राखण्याकरितां जीं साधनें उपयोगांत आणावीं लागतील, त्यांच्या योगानें ह्या दोन देशांची ताटातूट होणार नाहीं असेंही समजूं नये, व ह्या देशावर एकाएकीं मोठें अरिष्ट उत्पन्न होणार नाहीं असेंही नाहीं. परंतु हल्लीं मात्र खरी स्थिति अशी आहे कीं, दोनही देशांचा जास्त निकट संबंध जडत आहे व तो जडवणें जरूर असून राज्यकर्त्यांचें कर्तव्यही तेंच आहे. दोन देशांची ताटातूट होईल तर प्रथम इंग्लंडाचेंच मोठें नुकसान होईल. जितके दिवस हा संबंध जास्त टिकेल तितका तो इंग्लंडांस जास्त मह-

त्याचा होईल. हिंदुस्थानच्या संबंधानेंही मुख्यत्वेंकरून हीच गोष्ट खरी ठरेल. जी घडामोड हिंदुस्थानांत चालली आहे तिजबद्दल राज्यकर्त्यांस कितीहिं धास्ती वाटो, व जरी कदाचित् असेंही त्यांस वाटलें कीं, ही घडामोड सुरू झाली ही वाईट गोष्ट झाली, तरी ज्यापक्षीं ती सुरू झाली आहे, त्यापक्षीं ती त्यांनीं अर्ध्यावरच सोडणें फार अन्यायाचें होईल.

वसाहती किंवा हिंदुस्थान देश आपण होऊन सोडून द्यावे अशा प्रकारच्या कल्पनांची इंग्रज लोकांत विपुल वाटाघाट चालत असते. परंतु त्या सर्व कल्पनांत कांहीं तरी विसंगति आहे असें या ब्रिटिश राज्य-विस्तारावर जें आह्मीं इतका वेळ विवेचन केलें, त्याजवरून वाचकांचे ध्यानांत आलेंच असेल. अमुक वेळीं अमुक एक गोष्ट घडवून आण-ण्याची कर्तृत्वशक्ति आह्मां मानवांमध्यें आह्मी मानतों इतकी आहे काय? आमच्या मर्जीस वाटलें ह्मणून अगर स्वस्थपणें निरीक्षण न केल्यामुळें आमची तशी मर्जी झाली ह्मणून आज कित्येक शतकेंपर्यंत ज्या गोष्टी घडून आल्या, त्या नाहींशा करण्याचें आमचें सामर्थ्य आहे काय? कालाची व जीवितशक्तीची गति अगाध आहे. ती आपलें काम झपाट्यानें करीत असते. आमच्या कर्तृत्वशक्तीस पाहिजे तसा प्रतिबंध ती करीत आहे. हा प्रतिबंध होत आहे इक-डेस आमचें लक्ष जात नाहीं. समुद्रवलयांकित लहानशा बेटांत राहण्याची संवय झाल्यामुळें अखिल विस्तृत राष्ट्राविषयीं कोणा-चेही मनांत विचार येत नाहींत. इंग्लिश इतिहासकारांस व मुत्सद्यांस इंग्लंड देश मात्र आपला असा देश वाटतो. बाकीच्या विस्तारा-विषयीं ते मुळींच आप्तपणा दाखवीत नाहींत. ते नेहमीं अशा भाषेचा उपयोग करितात कीं, तेणेंकरून इंग्लंड सर्वथैव पृथक् आहे अशी त्यांची समज व्यक्त होते. पाहिजे तेव्हां आपल्यास वसाहती सोडतां

येतील व मनास वाटेल त्या वेळीं 'मोठ्या तलावांतील राजहंसाच्या घरट्याप्रमाणें' एलिझाबेथ राणीच्या वेळच्या इंग्लंड देशाप्रमाणें आपला देश पाहिजे तेव्हां पूर्व स्थितीस आणतां येईल, असें त्यांस वाटतें. परंतु हे विचार ह्मणजे केवळ खऱ्या प्रकाराकडे दुर्लक्ष केल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या असत्कल्पना होत. कल्पनाशक्तीचा दुरुपयोग केल्यामुळें कित्येक दुर्वाच्य विचार मनांत येत असतात. तिचा सदुपयोग केल्यानें असे विचार मनांत यावयाचे नाहींत. तर त्या दुर्विचारांपैकींच हे विचार होत.

असा निष्कर्ष जरी निघत आहे, तरी तोच वाचकांच्या मनांत चांगला ठसावा असें आह्मी इच्छित नाहीं. व्यवहारांत उपयोगी पडणाऱ्या राज्यनीतिशास्त्राचें खरें स्वरूप वाचकांपुढें ठेवावें, हा आमचा उद्देश नाहीं; तर ऐतिहासिक अध्ययनाची खरी रीति आणि खरा उद्देश हीं वाचकांच्या मनावर चांगले ठसवावीं, हाच आमचा हेतु आहे. वरील व्याख्यानांत आमचा हेतु असा आहे कीं, विद्यार्थ्यानें अलीकडच्या इंग्लंडच्या इतिहासाचें स्वरूप बरोबर समजावें. आह्मांस असें वाटतें कीं, बहुतेक इतिहासकार अलीकडील काळाचा इतिहास लिहूं लागले ह्मणजे त्यांची सरसता नाहींशी होते; विषयव्यवस्थेमध्यें घोटाळा दिसून येतो; आणि तात्पर्यहीन गोष्टीप्रमाणें ते आपल्या ग्रंथांचा उपसंहार करितात. इंग्लंडामध्यें इंग्रज लोकांनीं चित्तवेधक कामें कोणकोणतीं केलीं, हा इतिहास लिहिण्याचा प्रधान हेतु नाहीं. तर सर्व इंग्लंड देश अगर इंग्लंडचें राष्ट्र ह्या नात्यानें जीं जीं कृत्यें घडलीं असतील, तीं सर्व संगतीनें व्यवस्थेशीर जुळवून सांगणें, हेंच इतिहासाचें काम आहे. हें जास्त स्पष्ट करण्याकरितां आह्मीं कांहीं जास्त मजकूर सांगितला नाहीं. हृदयद्रावक गोष्टी सांगितल्या नाहींत. ऐतिहासासिक चित्रें वाचकांच्या हृदयपटला-

वर उमटविलीं नाहींत. 'सर्व काळ अखिल इंग्लंड देश एकसारखा वाचकांच्या डोळ्यांपुढें रहावा, असाच आह्मीं प्रयत्न केला आहे. इंग्लंडच्या इतिहासांत नाट्यकलेस शोभा आणविणारें असें कांहीं झालेलें नाहीं. कारण, इंग्लंडचा क्षय होण्याची संधि कधींच आली नाहीं. ह्या अलीकडच्या काळांत तरी इंग्लंड देशाला कोणतेंही दुःख अगर दुःखाची भीति सोसावी लागली नाहीं. इतक्या काळांत मोठमोठ्या घडामोडी इंग्लंडांत कोणत्या झाल्या आहेत, त्या पहा. राजकीय घडामोडी मात्र बऱ्याच मोठ्या झाल्या आहेत. तरी त्यासुद्धां सतराव्या शतकांत घडून आलेल्या घडामोडींच्या तोडीच्या नाहींत. नंतर राज्यनीतिशास्त्रांत अपूर्वदृष्ट असा एक विलक्षण मासला त्यांनीं लोकांच्या उघडकीस आणिला. राष्ट्रवृद्धि व प्रदेशवृद्धि कोणत्याही गोष्टींवर अवलंबून असो, त्या गोष्टींशीं स्वातंत्र्याचा विरोध मुळींच नसतो, हें त्यांनीं प्रत्यक्ष करून दाखविलें. आणखी असें कीं, अलीकडे इंग्लंडांत घडून आलेली सुधारणा व स्वातंत्र्यप्रियता ह्यांची उत्पत्ति आरंभीं इंग्लंडांत न होतां बाह्य युरोपांत झाली, व तेथून मग इंग्रज लोकांनीं ती इंग्लंडांत उचलून आणिली. मग अमर्याद देशवृद्धीचें काम मात्र विशेषेंकरून इंग्रज लोकांनींच तडीस नेलें, असें आह्मीं सांगितलें आहे. ही एवढी गोष्ट लक्षांत ठेविली ह्मणजे इंग्लंडचा अठराव्या व एकुणिसाव्या शतकाचा इतिहास व्यक्त होतो. चवदाव्या लुई बादशहापासून तों नेपोलियन बादशहापर्यंत फ्रान्सबरोबर झालेल्या लढायांचा गूढार्थ तेव्हांच स्पष्ट होतो. अमेरिकेंतील राज्यक्रांति व हिंदुस्थानचें स्वामित्व ह्या केवळ आनुषंगिक गोष्टी आहेत, असें न वाटतां, इंग्लंडच्या इतिहाससरणींत त्यांची सकारण व्युत्पत्ति कळून येते. संपत्ति, व्यापार, आणि कलाकौशल्य ह्यांची वृद्धि, वसाहती करण्याची जुनी पद्धत जाऊन

तिच्या ठिकाणीं नवीन पद्धत स्थापन होणें, ह्या सर्व गोष्टींचा वरील नियमांत अंतर्भाव होतो. सरते शेवटीं ह्या नियमांच्या योगानें इंग्लंड देशाची गत व भावि स्थिति ह्यांचा संबंध सुरेख जुळतो. इंग्लंडचा इतिहास वाचून संपला ह्मणजे वाचकांचीं मनें, एखादी लांबलचक घोटाळ्याची गोष्ट वाचल्यानें जशीं श्रमतात, तशीं श्रमित होऊन घोटाळ्यांत पडत नाहींत. तर भावि स्थिति काय होणार ह्याजबद्दल अंशतः तरी समाधान झालें असल्यामुळें तीं प्रफुल्लित होऊन त्यांस पूर्वींपेक्षां फारच उल्हास वाटेल ह्यांत संशय नाहीं.

इतिहासाचें अध्यापन कसें करावें, ह्या प्रश्नाचा विचार आमच्याप्रमाणें कित्येक गृहस्थ करीत असतां, ते असें ह्मणतात कीं, काय पाहिजे तें करा, इतिहासाची गोडी कायम ठेवा, ह्मणजे झालें. हें ह्मणणें कांहीं अंशीं आह्मांसही कबूल आहे. परंतु गोड याचा अर्थ आह्मी थोडासा निराळा करितों. आमचा अर्थ मूळचा व योग्य आहे, असें आह्मांस वाटतें. गोड ह्मणजे काल्पनिक, कवित्वसंयुक्त, व आश्चर्यजनक असा लोक अर्थ करितात. ह्या अर्थानें इतिहास गोड करणें आह्मांस संमत नाहीं, कारण आह्मांस असें पक्कें माहीत आहे कीं, असत्य गोष्टींची भर घालून मूळ इतिहासास हीनत्व आणल्याशिवाय ही गोष्ट होणेंच नाहीं. गोड ह्याचा खरा अर्थ काल्पनिक असा मुळींच करतां येणार नाहीं. तर ज्या गोष्टींचा आमच्या हितानहिताशीं निकट संबंध आहे, त्यांजबद्दल आह्मांस काळजी वहावी लागते, व ज्या सर्व प्रकारें आह्मांस फारच उपयुक्त आहेत, त्यांसच गोड अशी संज्ञा देण्यांत यावी. इंग्लंडच्या अठराव्या शतकाच्या सुरवातीपासून आजपर्यंतचा इतिहास ह्या अर्थानें गोड आहे, हें आह्मीं वर दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. कारण आमच्या विवेचनापासून असे महत्वाचे परिणाम घडतील, कीं त्यांजवर आमचें स्वतःचें, आमच्या

संततीचें व सर्व देशाच्या भावि स्थितीचें हितानहित अवलंबून आहे. इतिहास पाहिजे तितका गोड अगर चित्तवेधक करा, ह्यापेक्षां इतिहास जास्त चित्तवेधक करणें खोटसाळपणा केल्याशिवाय आमच्यानें होणार नाहीं. ह्मणून ज्या कोणास इतिहास चित्तवेधक वाटत नाहीं, असा गृहस्थ आह्मांस भेटल्यास त्याच्याकरितां इतिहास बदलण्याचा खटाटोप आह्मी करणार नाहीं, तर त्याचेंच मन वळविण्याचा प्रयत्न करूं.

समाप्त.

परिशिष्ट (१).

प्रश्नसंग्रह.

भाग पहिला.

प्रकरण पहिलें.

१. प्रोफेसर सीली यांच्या मतें इंग्लिश इतिहासकारांची चुकी कोणती झाली आहे, व ती झांकण्यासाठीं ते काय युक्ति योजितात? सुधारणा या शब्दाची बरोबर व्याख्या देऊन वरील चुकी स्पष्ट करून दाखवा.

२. पृथ्वीवरील एकंदर ब्रिटिश राज्याचे भाग कोणते आहेत? त्यांत समावेश झालेल्या प्रदेशांचा व लोकसंख्येचा अंदाज काय आहे? व त्याजपासून अपल्यास काय समजतें?

प्रकरण दुसरें.

१. इतिहास लिहितांना घडलेल्या गोष्टींचे भाग व पोटविभाग पाडण्याच्या रीतीविषयीं ग्रंथकाराचें काय ह्मणणें आहे?

२. इंग्लंडांत अठराव्या शतकांत ह्मणजे सन १६८८ च्या राज्यक्रान्तीपासून तों १८१५ तील पारिसच्या तहापर्यंत जीं मोठमोठीं युद्धें झालीं त्यांचें थोडक्यांत वर्णन द्या.

३. 'सर्व युद्धांमध्यें मुख्य प्रश्न देशवृद्धीचा-होता व त्यांच्या

बाह्य स्वरूपावरून हें एकदम कळत नाहीं', हें प्रत्येक युद्धाचीं कारणें व परिणाम यांजवरून स्पष्ट करून दाखवा.

४. अठराव्या शतकाविषयीं लोकांच्या कल्पना चुकीच्या कशा आहेत व त्या वेळीं सर्व युरोपभर घडत असलेल्या सर्व राजकीय गोष्टींचा खरा कल कोणीकडे होता ?

प्रकरण तिसरें.

१. प्राचीन काळच्या ग्रीक लोकांच्या वेळच्या वसाहती व हल्लींच्या वसाहती यांत काय भेद आहे ?

२. 'ब्रिटिश साम्राज्य हें जिकडे तिकडे एकजातीय आहे' ही सामान्योक्ति अपवादांचें निरसन करून सिद्ध करा.

३. राष्ट्राची चिरस्थायिकता कोणत्या गोष्टींवरून समजावयाची? ब्रिटिश साम्राज्याची पूर्वींच्या इतर राष्ट्रांशीं तुलना करून त्याच्या चिरस्थायिकतेचा अंदाज करा.

४. ब्रिटिश साम्राज्य ऐतिहासिक रीत्या आजच्या स्थितीस कसें येऊन पोंचलें व इतर युरोपीय राष्ट्रांशीं त्याचा काय संबंध होता तें स्पष्ट करून सांगा.

प्रकरण चवथें.

१. प्राचीन काळच्या ग्रीक लोकांच्या वेळचा 'वसाहत' शब्दाचा अर्थ, सोळाव्या शतकांत स्पेन वगैरे राष्ट्रें वसाहती करूं लागलीं तेव्हां त्यांचे 'मनांत असलेला' 'वसाहत' शब्दाचा अर्थ, व त्यानंतर त्यांच्या प्रत्यक्ष 'आचरणावरून व्यक्त होणारा' 'वसाहत' शब्दाचा अर्थ, व अलीकडे वाफेचीं वाहनें सुरू झाल्यावर व युरोपीय राष्ट्रांच्या ताब्यां-तील कित्येक वसाहती स्वतंत्र झाल्यावर हल्लीं प्रचारांत असलेला

त्याच शब्दाचा अर्थ, हे सर्व एकमेकांपासून कसे निघाले व त्यांजपासून काय कमीजास्त परिणाम झाले, हें युरोपीय राष्ट्रांचीं उदाहरणें घेऊन व्यक्त करून दाखवा.

प्रकरण पांचवें.

१. सोळा, सतरा व अठरा या तीन शतकांत कोणत्या दोन मुख्य कारणांनीं युरोपच्या राष्ट्रांचे व्यवहार निर्बंधित होते व कसे?

२. दर्यावर्दीपणा, व्यापार, कलाकौशल्य यांत इंग्लंडची प्रवृत्ति अगदीं अलीकडची आहे, हें उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखवा.

३. अमेरिकेचें वजन युरोपावर कोणत्या गोष्टींत व कसें पडलें?

४. वसाहतींच्या कामांत पश्चिम युरोपांतील पांचही राष्ट्रें आरंभीं फार प्रबळ होतीं. त्यांचा ऱ्हास कां झाला व शेवटीं सर्वांमध्यें इंग्लंड देश सत्ताधीश कोणत्या कारणांनीं झाला तें सांगा.

प्रकरण सहावें.

१. अमेरिकेचें वजन युरोपावर पडलें, या संबंधांत इतिहासकारांची साधारणतः काय चुकी होते?

२. युद्धप्रसंगामुळें व्यापारास धक्का पोंचतो व शांततेंत व्यापार वाढतो ह्या ह्मणण्याचा खरा झोंक किती आहे तें सतराव्या व अठराव्या शतकांत इंग्लंडच्या इतर राष्ट्रांशीं चाललेल्या व्यवहारांवरून दाखवा.

३. एलिझाबेथ राणीच्या वेळेपासून अमेरिकेच्या संबंधानें इंग्लंडचे परराष्ट्रांशीं व्यवहार किती बदलत चालले हें प्रत्येक कारकीर्द घेऊन सांगा.

प्रकरण सातवें.

१. आपल्या वसाहती असाव्या असें इंग्लंडचे मनांत आल्यापासून

तों त्या देशास सर्व राष्ट्रांत वर्चस्व प्राप्त होईपर्यंत देशविस्ताराचीं जीं निरनिराळीं स्थित्यंतरें घडलीं त्यांचें वर्णन द्या.

२. राष्ट्रानें देशविस्तार करणें हें कृत्य किती न्याय्य आहे तें सांगा, व तो करतांना इंग्रजांकडून एखादा अतिक्रम घडला असल्यास त्याचें विशिष्ट स्वरूप सांगा.

प्रकरण आठवें.

१. ऐतिहासिक गोष्टींचें महत्व मोजण्याचीं मापें कोणतीं असूं शकतील व त्यांपैकीं खरें कोणतें व कां?

२. अमेरिकेंतील राज्यक्रान्तीविषयीं इतिहासकारांचा चुकीचा ग्रह कोणता झाला आहे?

३. अमेरिकेंतील विभक्त झालेल्या वसाहतींच्या राजकीय व सामाजिक स्थितीचें वर्णन द्या.

४. 'वसाहती पूर्णतेस आल्यावर त्या स्वतंत्र होणें अपरिहार्य आहे व स्वतंत्र होतील तरच त्यांचा विस्तार व भरभराटी होईल' हें ह्मणणें कितपत खरें आहे तें सांगा.

भाग दुसरा.

प्रकरण पहिलें.

१. अमुक एक गोष्ट घडली तशी न घडतां निराळ्या प्रकारची घडती तर तिचे परिणाम कसे भिन्न झाले असते अशा प्रकारचें विवेचन करण्याची इतिहासांत कितपत जरूरी आहे?

२. इतिहास व राजनीति हीं दोन शास्त्रें एकमेकांशीं निकट संबंधाचीं आहेत हें ह्मणणें सिद्ध करा.

३. इतिहास ह्मणजे देशाच्या सामाजिक व अंतःस्थितीचें हुबेहुब व चित्तवेधक वर्णन असें जें कित्येकांचें ह्मणणें आहे तें कितपत खरें आहे?

प्रकरण दुसरें.

१. इंग्रज लोकानीं 'जिंकलेला देश' हे शब्द हिंदुस्थान देशाला लावणें रास्त होईल कीं नाहीं?

२. हिंदुस्थान ताब्यांत ठेवल्यापासून इंग्लंडास काय फायदा आहे?

३. हिंदुस्थानापासून फारसा फायदा नसेल तर एवढें जोखिम न बाळगतां आज हिंदुस्थान देश इंग्रजांनीं सोडून देण्यास काय प्रत्यवाय आहे व तसें केल्यापासून काय परिणाम होतील?

४. हिंदुस्थानांतील ब्रिटिश मुलुखाची व लोकसंख्येची युरोपीय राष्ट्रांशीं तुलना करा.

९. हिंदुस्थानसंबंधीं प्रश्न इतर वसाहतींच्या प्रश्नांपेक्षां भानगडीचा व बिकट आहे तो कां?

प्रकरण तिसरें.

१. हिंदुस्थान देश इंग्रजांनीं जिंकण्याच्या कृत्यांत त्यांच्या अंगीं कोणते गुण प्रमुख होते?

२. हिंदुस्थान देश इंग्रजांस फार त्रास व खर्च झाल्याशिवाय जिंकता आला याचीं काय विशेष कारणें आहेत.

३. हिंदुस्थान जिंकीत असतां ईस्ट इंडिया कंपनीची स्थिति व वर्तणुक कशी होती?

प्रकरण चवथें.

१. थोड्याशा इंग्रज लोकांसारख्या परकीय राज्यकर्त्यांच्या हातांत अतीव लोकवस्तीचा हिंदुस्थान देश शांतपणें नांदत आहे ही गोष्ट फार आश्चर्यकारक आहे असें कित्येक समजतात. ह्या चुकीच्या समजांत कोणत्या दोन गृहीत गोष्टी व्यक्त होतात?

२. एखाद्या देशास राष्ट्र हें नांव देण्यास कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे? राष्ट्र ह्मटलें जाण्यास योग्य नाहींत असे देश आहेत किंवा नाहींत?

२. एखाद्या देशांत समानजातित्व आहे हें कशावरून समजावयाचें? हिंदुस्थानांत त्याचा वास कितपत आहे व त्यासंबंधानें हिंदुस्थानाची तुलना पृथ्वीवरील कोणत्या भागाशीं कशी करितां येईल?

४. इंग्रजी अंमल सुरू होण्यापूर्वी जे कित्येक अंमल हिंदुस्थानावर झाले त्यांजमध्यें हिंदुस्थानांत समानार्थित्व कितीसें कायम

होतें, व आज या इंग्रजी अंमलांत त्याचसंबंधानें हिंदुस्थानची स्थिति कशी आहे ?

५. हिंदुस्थानांतील धर्मांचा राजकीय संबंधांत किती अंमल चालतो व त्याचा परिणाम काय होत आहे ?

६. हिंदुस्थानावर इंग्रजांनीं इतके सोपे रीतीनें राज्य करण्यांत विशेष अद्भुतता आहे ह्या समजाच्या संबंधानें पूर्वींची मुसलमानांची हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्था व हल्लींची इंग्रजी राज्यव्यवस्था यांची तुलना करा.

७. इ. स. १८५७ सालच्या हकीकतीवरून हिंदु लोकांत त्या वेळीं ऐक्य कितपत उत्पन्न झालें होतें तें सांगा.

८. हिंदुस्थानांतील इंग्रजांचा अंमल कोठपर्यंत निर्भय आहे असें मानतां येईल ?

प्रकरण पांचवें.

१. सुधारलेल्या ग्रीक अगर रोमन लोकांनीं पश्चिमेकडील रानटी लोकांस जिकणें व सायरस, चेंगिझखान, तैमुर्लंग ह्यांसारख्या अशिक्षित व क्रूर प्राच्य सरदारांनीं देश जिकणें यांत सुधारणेच्या संबंधानें काय भेद आहे ?

२. हिंदुस्थानांत राहणाऱ्या लोकसंख्येच्या भेदानुरूप तेथील मूळच्या सुधारणेचा अंदाज करा, व ती सुधारणा व इंग्रजांची सुधारणा यांची तुलना करा.

३. रोमन लोकांनीं पाश्चात्य देश जिंकल्यामुळें घडलेले परिणाम व इंग्लिशांनीं हिंदुस्थान जिंकल्यामुळें घडलेले परिणाम यांत काय भेद आहे ?

४. हिंदुस्थान देश जिंकल्यानें तेथील वाईट स्थितीचा परिणाम

इंग्लंडावर घडण्याचा संभव कितपत होता व त्याजपासून अखेरीस काय निष्पन्न झालें?

९. आपलीच सुधारणा इंग्रजांनीं हिंदुस्थानांत सुरू न करणें रास्त होतें कीं काय?

प्रकरण सहावें.

१. हिंदुस्थानचें स्वामित्व इंग्रजांच्या हातांतून गेलें तर त्यापासून इंग्लंडावर राजकीय परिणाम कोणते घडून येतील?

२. हिंदुस्थानचा इंग्लंडशीं अर्थार्थी संबंध फारसा निकट नाहीं व तो पाहिजे तेव्हां तोडतां येईल असें कित्येक ह्मणतात, तें कितपत खरें आहे?

३. हिंदुस्थानाशीं चालत आलेल्या व चालणाऱ्या इंग्लंडच्या व्यापाराचा अंदाज देऊन हिंदुस्थान देश इंग्लंडचे ताब्यांतून गेला तर त्याचे राजकीय रीत्या व अर्थशास्त्ररीत्या काय परिणाम घडतील तें सांगा.

४. केवळ व्यापार वाढविण्याच्या उद्देशानें हा एवढा देश इंग्लंडानें जिंकला हें ह्मणणें कितपत खरें आहे तें कारणें देऊन स्पष्ट करा.

५. ईस्ट इंडिया कंपनीची थोडक्यांत हकीकत देऊन तिजवरून व्यापार व प्रदेशवृद्धि या दोन गोष्टींशीं तिचा असलेला संबंध व्यक्त करून दाखवा.

६. हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्य वाढविण्यामध्यें कार्यधुरंधर पुरुष कोणते झाले? त्यांच्या कारभार करण्याच्या पद्धतीचा प्रदेशवृद्धि व व्यापार या दोन गोष्टींशीं असलेला संबंध व्यक्त करून दाखवा.

प्रकरण सातवें.

१. राष्ट्राची चिरस्थायिकता कशी व कोणत्या तत्वांनीं निश्चित करितां येते?

२. धोक्याच्या प्रसंगीं इंग्रज लोकांचें हिंदुस्थानांतील सैन्य त्यांस कितपत उपयोगी पडण्याचा संभव आहे?

३. इंग्रज लोकांच्या चांगुलपणाबद्दल हिंदुस्थानांतील प्रजेच्या मनांत कितपत पूज्यबुद्धि असण्याचा संभव आहे व आणीबाणीच्या प्रसंगीं ती कितपत टिकेल? निरनिराळ्या जातींचे व धर्मांचे लोक घेऊन हें व्यक्त करून दाखवा.

४. हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्याच्या चिरस्थायिकतेच्या संबंधानें त्या देशांतील धर्मांचा विचार करा.

५. परचक्रप्रवेशसंबंधानें हिंदुस्थानच्या भूगोलिक बाह्य स्थितीचा विचार करा.

६. हिंदुस्थानावर वायव्य दिशेकडून ज्या आजपर्यंत कित्येक स्वाऱ्या झाल्या त्यांतील प्रत्येकीचें थोडक्यांत वर्णन द्या.

७. हिंदुस्थानावर पश्चिमेकडून समुद्रांतून कोणकोणते हल्ले आले व त्यांतील प्रमुख कोणता?

८. हल्लीं हिंदुस्थानास कोणकोणत्या परचक्रांची भीति आहे? आजपर्यंतच्या अनुभवावरून व इतर गोष्टींवरून ह्या भीतीचा अंदाज करा.

प्रकरण आठवें.

१. अतिशयोक्तगुण व अवमानितगुण ह्या दोन प्रकारच्या लोकांचीं दोन भिन्न मतें स्पष्ट करून सांगून त्यांतील भेद दाखवा.

२. वरील पहिलें मत ग्रंथकारांस पसंत आहे किंवा नाहीं?

३. दुसरें मत कोणत्या आधारावर रचलेलें आहे व तो आधार मजबूद आहे किंवा नाहीं?

४. प्राचीन काळीं राष्ट्रवृद्धि शक्य नव्हती, हल्लीं ती शक्य असून

योग्य आहे, हें प्राचीन काळच्या व तदनंतरच्या स्थितीवरून उदाहरणांनीं फोड करून सांगा.

५. कोणतेंही राष्ट्र फार वृद्धि पावणें चांगलें कीं तें मूळ असेल तसें लहान राहणेंच चांगलें?

६. इंग्लिश राज्यपद्धतीचे हिंदुस्थानावर काय परिणाम घडले आहेत व त्यांच्यापासून हिंदुस्थानचें नफानुकसान काय झालें आहे?

७. इंग्रजांनीं हिंदुस्थान देश सोडून देऊन जबाबदारीपासून मुक्त होणें उभयतांसही इष्ट व शक्य आहे किंवा नाहीं?

८. पुस्तक लिहिण्याचा ग्रंथकाराचा उद्देश कोणता आहे व तो त्यानें कशा रीतीनें तडीस नेला आहे?

परिशिष्ट २.

इंग्लंडच्या ताब्यांतील मुलुखांची यादी. (जुलै सन १८८९ चा वेस्टमिन्स्टर रिव्ह्यू, पान ८३.)

पहिल्या भागांतील पहिल्या प्रकरणांत सांगितलेला देशविस्तार समजण्यास ही यादी अवश्य आहे; व एकंदर पुस्तकाचा विषयही हाच आहे.

खंड.	प्रदेशाचें नांव.	कसा व केव्हां घेतला तो.	विस्तार चौरस मैल.	१८८१ तील लोकसंख्या.	१८८३ उत्पन्न पौंड.	१८८३ कर्ज पौंड.	शेरा.
१	२	३	४	५	६	७	८
यूरोप ...	जिब्राल्टर.	जिंकून १७०४	१ ९/१०	१८३८१	४८३३'५	०	
	हेलिगोलंड.	,, १८०७	१/३	२००१	८२१२	४६९७	हा प्रदेश नुकताच जर्मनीचे ताब्यांत गेला आहे.
	माल्टा व गोझो.	,, १८००	११७	१४९७८२	२०५'१६६	७९१६८	
	सैप्रस.	तहाचे योगें १८७८	३५८४	१८५९१६	१९४०५१	०	
एशिया ...	सिलोन.	जिंकून १७९६	२४७०२	२७६३९८४	११६२१७१	२१२४१०८	इतर प्रदेशांप्रमाणें हिंदुस्थानास ताब्यांतील मुलूख ही संज्ञा ग्रंथकारानें लाविली नसल्यामुळें हिंदुस्थानची माहिती शेवटीं पृथक् दिली आहे.
	हांगकांग.	तहानें १८४३	३ १/२	१६०४०२	२६८६३५	०	
	मलाया द्वीपकल्पांतील प्रदेश.	हिंदुस्थानापासून विभक्त १८६७	१४४५ १/२	४२३८३४	५५९०२०	५६०००	
	लाबुअन.	१८४६त मिळाला	३०	६२९८	५११४	०	
आफ्रिका.	केप ऑफ गुड-होप्.	जिंकून १८०६	२४०१०८	१२४९८२४	३२९९०१७	१९६७१८५९	
	नेटल.	वसाहत १८३८	१८७५०	४०२६८७	६२०४९६	२५५४०००	
	मॉरिशस.	जिंकून १८१०	७१३	३८०८४७	८८९२६५	७५३५०९	

वेस्टइंडीज़.	जमेका.	जिंकून १६५५	४१९३	५८०८०४	५५७२४१	१२५७९१६
	मॉन्ट सेराट.	वसाहत १६३२	३२	१००८७	५८६३	४२००
	नेव्हिस.	वसाहत १६२८	५०	११८६४	४३२०३	२२००
	सेन्ट कीट्स.	,, १६२३, १६५०	६८	२९१३७		
	सेन्ट ल्युशिया.	जिंकलें १८०३	२३७½	३८५५१	४३०२६	२६४५०
	टोबागो.	वसाहत १७६३	११४	१८०५१	१४१७१	०
	सेन्ट व्हिन्सेंट.	मिळाला ,,	१४६	४०५४८	३४५०९	०
	ट्रिनिडाड.	जिंकलें १७९७	१७५४	१५३१२८	४५८३४४	५९८६३०
	टर्क्स आयर्लंड.	वसाहत १६२९	१६९	४७३२	१००१०	०
	व्हर्जिन आयलंड	,, १६६५	५७	५२८७	१७०८	०
ऑस्ट्रेलेशिया ...	न्यू साउथ वेल्स.	,, १७८७	३१०७००	७५१४६८	६४७०३४१	२१६३२४५९
	व्हिक्टोरिया.	वरच्यांतून निराळें केलें १८५१	८७८८४	८६२३४६	५९३४२४०	२८३२५११२
	क्विन्सलंड.	,, १८५९	६६८२२४	२१३५२५	२३८३८५९	१४९१७८५०
	टास्मेनिया.	वसाहत १८०३	२६२१५	११५७०५	५६२१८१	२३८५६००
	साउथ् आस्ट्रेलिया	,, १८३६	९०३४२५	२७९८६५	२०६०१४०	१३८९१९००
	न्यू झीलंड.	,, १८४१	१०४४०३	५३४०३२	३८७१२६७	३१३८५४११
	वेस्ट ऑस्ट्रेलिया	,, १८२९	९७५९२०	२९७०८	३१६७१९	६११०००
	फीजी.	मिळालें १८७४	७४०३	१२७०९९	१०६८१४	२५४०२५
		एकूण सुमारें ...	७०००००० =५८×ग्रेटब्रिटन व ऐर्लंड.			

खंड.	प्रदेशाचें नांव.	कसा व केव्हां घेतला तो.	बिस्तार चौरस मैल.	१८९१ तील लाकसंख्या.	उत्पन्न पौंड. १८९१	कर्ज पौंड. १८९१	शेरा.
१	२	३	४	५	६	८	८
एशिया...	हिंदुस्थान.	पुस्तकांत वर्णन आहे.	१५५७३८२	२८७२२३४३१	८५७४१६४२०	१९८२४२६०६१	हिंदुस्थानची ही माहिती मूळ रिव्ह्यूंत नसून ती १८९१ सालच्या खानेसुमारीवरून घेतली आहे.

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
३८	१४	रुपये	हा शब्द कमी करावा.
४९	१७	उर्णींव	उर्णी.
८१	२३	बसई	आसई.
८४	३	वृत्तीचें	वृद्धीचें.
८७	४	स्वतंत्र तेथें	तेथें स्वतंत्र.
९७	१९	साम्राज्याच्या	लोकांच्या.
११३	८	संस्थानांतील	हा शब्द कमी करावा.
१२१	९	आपल्यास	त्यांस.
१३७	१७	लटापटी	लखापडी.
१४२	४	नसे	असे.
१९३	२१	१४८६	४८६.
१९६	२३	जगाच्या	जयाच्या.
२१८	खा. ३	आरिबियन	क्यारिबियन.
२४९	खा. ३	मुलूख हा फ्रान्सचा	हा फ्रान्सचा मुलूख.
३४२	११	प्रकरणांत	भागांत.
३६१	९	वर्षांतल्या	वर्गांतल्या.
४९३	१०	इच्छचाहा	इच्छेचाही.
४९६	४	धर्मगृहीत झालेल्या	धर्मवेड लागलेल्या.

ह्याशिवाय अंमल हा शब्द बऱ्याच ठिकाणीं अमल असा चुकीनें लिहिला गेला आहे. तसेंच कित्येक ठिकणीं अनुस्वाराच्या व विरामांच्या चुका झाल्या आहेत, त्या वाचकांनीं पुस्तक वाचतांना सुधाराव्या.

क

वाचकांसाठीं दोन शब्द.

श्रीमंत गायकवाड सरकारांकडून ग्रंथप्रसिद्धीचे कामीं होत असलेले प्रयत्न.

प्रस्तुत वाचकांपुढें येत असलेलीं पुस्तकें **श्रीमंत गायकवाड सरकारांच्या** हुकुमानें तयार झालीं आहेत, याकरितां भाषाभिवृद्धीचे कामीं महाराजांकडून जे प्रयत्न चालले आहेत ते लोकांस महशूर होणें इष्ट दिसल्यावरून खालीं सांगण्यांत येत आहेतः—

१. पुस्तक चांगलें असल्यास त्यास आश्रय देण्याचे नियम शाळाखात्याकडून ठरले असून त्याप्रमाणें तो देण्यांत येत असतो.

२. श्रीमंत महाराजांची स्वारी कडीप्रांतीं गेली असतां पट्टण यथील संस्कृत ग्रंथसंग्रह त्यांचे पाहण्यांत आला. तेव्हां त्यांतील उपयुक्त पुस्तकांची निवड व्हावी, व जीं चांगलीं ठरतील त्यांचे तरजुमे झाल्यानें ज्यांस संस्कृत येत नाहीं अशा लोकांस त्यांतील ज्ञानाचा लाभ सहज व्हावा, या हेतूनें (१) इतिहास, (२) शास्त्र, (३) नाटक, व (४) धर्म, या चार विषयांवर उपयुक्त पुस्तकें संस्कृतांतून चांगलीं पुस्तकें मराठींत लिहिण्याविषयीं हुकूम देण्यांत आला. त्याअन्वयें तीं तयार झालीं असून पुढें जास्त पुस्तकांचे तर्जुमे करण्याचें काम चालू आहे. श्रावणमासदक्षिणेसारख्या संस्थेतून नवीन पुस्तकें व निबंध तयार होण्याची तजवीज झालेली वाचकांस महशूर असेलच.

३. संस्थानच्या निरनिराळ्या खात्यांचे उपयोगी पडणारीं पुस्तकें परभाषेंतून तरजुमे करून किंवा नवीन तयार करून छापण्यांत येत आहेत, व पुढें आणखी अशींच तयार करण्याविषयीं हुकूम देण्यांत आले आहेत.

४. नियमरूपानें छापण्यांत येत असलेलीं पुस्तकें निरनिराळ्या खात्यांकरितां केलीं आहेत, तथापि त्यांचाही मुख्य उद्देश असा आहे कीं, त्यांच्या योगानें लोकांस शिस्तीनें काम करण्याची संवय लागावी. अशा प्रकारें शिस्तीनें काम करण्याची संवय आपणांत किती कमी आहे हें सांगावयास नकोच. सरकारवाड्यासंबंधीं झालेल्या पुस्तकांचा तरी उद्देश असाच आहे.

५. सेक्रेटरींच्या मार्फत जीं पुस्तकें आश्रयासाठीं येतात, त्यांपैकीं कित्येकांस सवडीनुसार खानगी खात्यांतून आश्रय देण्यांत येत असतो.

६. ह्याप्रमाणें निरनिराळ्या खात्यांच्या नियमांअन्वयें तयार होत असलेल्या पुस्तकांशिवाय श्रीमंत महाराज वेळोवेळीं विशेष हुकूम देऊन व नवीन सूचना करून स्वतःच्या देखरेखीखालीं जवळ असलेल्या लोकांकडून पुस्तकें लिहवून छापवीत असतात. अशा प्रकारें हल्लीं भाषाविषय, इतिहास, शास्त्रीय विषय, पाकशास्त्र, गृहशास्त्र, कायदे, क्रीडाशास्त्र, व अश्वकला, वगैरे विषयांवर पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा क्रम चालू आहे. सामान्य विषयांवर उपयुक्त माहितीचे ग्रंथ **महाराष्ट्रग्रंथमाला** नामक मालेंत प्रसिद्ध होत असून आणखी **राष्ट्रकथामाला** नांवाची दुसरी एक ऐतिहासिक ग्रंथांची माला प्रसिद्ध होत आहे. इंटर्नाशनल सायन्टिफिक सीरीज नामक मालेंतील इंग्रजी पुस्तकांच्या धर्तीवर निरनिराळ्या शास्त्रीय विषयांवर सोपीं सोपीं पुस्तकें त्या त्या विषयांत प्रवीण अशा गृहस्थां-

कडून लिहविण्याचें काम बडोद्यांतील कलाभुवन नामक शिल्पशाळेचे मुख्य गुरु यांजकडे सोंपलेलें आहे. या निमित्त एक मोठी रक्कम खर्च करण्याचें सरकारांनीं ठरविलें आहे. त्याचप्रमाणें पाकशास्त्रावरही देशीभाषेंत ग्रंथ लिहविण्याचा क्रम सुरू आहे. या विषयावरील ग्रंथमालिकेंत मराठी, हिंदुस्थानी, फारशी, मद्रासी व इंग्रजी वगैरे पाकक्रियांवरील ग्रंथांचा समावेश केला आहे. आपले राष्ट्रीय खेळ प्रचारांतून जाऊं नयेत ह्मणून त्यांच्या माहितीचें एकीकरण करून उपयुक्त इंग्रजी खेळांच्या संग्रहासहित तें छापिलें आहे. उर्दू भाषेंतीलही कित्येक ग्रंथ छापण्याचें काम चालू आहे. हीं सर्व पुस्तकें गुजराथी व मराठी ह्या दोन्ही भाषांत प्रसिद्ध करण्याविषयीं सरकारचा हुकूम आहे. ह्यावरून महाराजाची समदृष्टि किती आहे व प्रत्येक उपयुक्त विषयाचें लोकांस शिक्षण देण्याकडे व भाषेची अभिवृद्धि करण्याकडे त्यांचें किती लक्ष आहे, हें व्यक्त होत आहे.

महाराज सरकारांस द्रव्याची अनुकूळता असल्यामुळें असलीं कामें करण्याचा हुकूम देण्याचाच कायतो अवकाश, ह्या पलीकडे स्वतः महाराज साहेबांस श्रम नाहींत, असा कोणाचा ग्रह असेल तर तो फार चुकीचा आहे. कोणीही मनुष्य एकादें काम स्वतः अंगावर घेऊन करूं लागला ह्मणजे त्यांत शेंकडों भानगडीचे प्रश्न कसे निघतात हें त्याचा तोच जाणे. महाराज सरकारचे हे हेतु आज फार दिवसांचे असून ते सिद्धीस नेण्याच्या कामीं त्यांच्याकडून पुष्कळ श्रम होत आहेत, तरी ते अद्याप व्हावे तसे फलद्रूप झाले नाहींत. महाराज साहेबांचा वेळ अत्यंत अमोलिक असल्यामुळें अशा विषयांकडे ते इतकें लक्ष पुरवितात हें विशेष आहे. महाराजांच्या ह्या उद्योगाचा उपयोग सर्वांनें

करून घेतला असें त्यास कळलें, ह्मणजे आपल्या श्रमाचें व पैशाचें सार्थक झालें असें ते मानतील.

ह्या उद्योगाबद्दल जास्त लिहून वाचकांचा वेळ घेणें बरोबर नाहीं. त्यांतील गुणदोष पाहण्याचें काम वाचक वर्गाचें आहे, तें त्यांनीं प्रांजलपणें बजाविल्यास महाराजांस फार समाधान वाटेल.

सरकार हुकुमानें तयार होत असलेल्या वर दर्शविलेल्या कित्येक पुस्तकांची यादी सोबत देण्यांत येत आहे.

श्रीमंत गायकवाड सरकार यांच्या आज्ञेनें तयार होत असलेलीं पुस्तकें.

मुंबई पुणें वगैरे ठिकाणीं विकत मिळतील.

राष्ट्रकथामाला. (Story of the Nations Series)

प्रत्येकीं किंमत रु० १—१२—०

(छापून तयार.)

ग्रंथ १ इराण. (मराठी) रा० शंकर विष्णु पुराणिक, बि. ए.
„ २ इजिप्त. (गुजराथी) रा० मणिशंकर भट्ट, बि. ए.
„ ३ कार्थेज. (मराठी) रा० नागेश आबाजी काथवटे, बि. ए.
„ ४ तुर्कस्थान. „ रा० रावजी भवानराव पावगी, बि. ए.
„ ५ फ्रान्सचा जुना इतिहास. (मराठी) रा० कृष्णा अर्जुन केळूसकर.

(छापत आहेत.)

„ ६ स्पानिशमूरलोक.(मराठी)रा०रामकृष्ण सखाराम आठवले,एम्.ए.
„ ७ जर्मनी. (मराठी) रा० हरि सदाशिव बेलवलकर, बि. ए.
„ ८ आसिरिया. (मराठी) रा० सीताराम रामचंद्र गायकवाड.

(तयार होत आहेत.)

„ ९ रोम. (मराठी) रा० विनायक कोंडदेव ओक.
„ १० रशिया. (मराठी) रा० सर्जन मेजर कीर्तीकर

२ महाराष्ट्र ग्रंथमाला. किंमत रु. आ. पै.

(छापून तयार आहेत.)

		रु.	आ.	पै.
ग्रंथ १	**राजधर्म.** (Machiavelli's Prince.)			
	(मराठी) रा० गोविंद सखाराम सरदेसाई, बि. ए.	०	८	०
	(गुजराथी) छगनलाल ठाकूरदास मोदी, बि. ए.	०	८	०
	(खालील सर्व मराठी.)			
,, २	**विचाररत्नाकर.** (Bacon's Essays) रा० वासुदेव नरहर उपाध्ये.	२	०	०
,, ३	**इंग्लंड देशाचा विस्तार** (Expansion of England) रा० गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.	२	०	०
,, ४	**मार्कस ऑरेलिअस बादशहाचीं बोध वचनें.** (Meditations of Marcus Auralius) मि० सिमीयन बेंजामिन.	१	१२	०
,, ५	**प्राच्य व पाश्चात्य देशांतील ग्रामसंस्था** (Maine's Village communities). रा० महादेव राजाराम बोडस, एम्. ए.	१	१२	०

(छापत आहेत.)

ग्रंथ ६ **रोम व कार्थेज.** (From Epochs of Ancient History) रा० गणेश अनंत लेले, बी. ए.

,, ७ **गृहिणी शंकानिरसन.** (Housewife's reason, why) रा० केशव बाळकृष्ण परांजपे.

,, ८ **घर व त्याच्या भोंवतालची जागा.** (House and its surroundings) रा० भानू केशव गांगनाईक.

,, ९ **गुन्हा व त्याचीं कारणें.** (Crime and its causes.) रु. आ. पै.

रा. रामचंद्र हरि गोखले, बि. ए. एल्. एल्. बी.

---

३ पाकशास्त्र. (सर्व मराठी).

(छापून नयार.)

१ **पाश्चिमात्य पाकशास्त्र.** (Culinary Jottings for Anglo-Indian Exiles) भाग १, भाग २, भाग ३, रा. भानु केशव गांगनाईक.

२ **सूपशास्त्र.** रा. बळवंतराव रामचंद्र मराठे.

अंक १ भाग १ ला (मद्रासी चालीचे पदार्थ.)
अंक १ भाग २ रा. (मांसमिश्रित मद्रासी, इंग्रजी व मुसलमानी पदार्थ.)
अंक २ रा (तंजावरी चालीचे पदार्थ.)
अंक ३ भाग १ ला (मुसलमानी चालीचे पदार्थ)
अंक ३ भाग २ रा (मुसलमानी चालीचे पदार्थ) } ९ ८ •

अंक ४ (अलवानेन्यामत) .... ० ८ •

---

४ क्रीडामाला (मराठी व गुजराथी).

छापून (तयार)

रा० रामकृष्ण सखाराम आठवले, एम्. ए. कृत.

१. **कमान चेंडूचा खेळ.** (क्रोके Croquet·).... ० ४ ०
२. **चेंडू दांडूचा खेळ.** (क्रिकेट Cricket.) .... • २ •
३. **कुबडीचेंडू अथवा डांगचेंडू** (गॉफ् Golf·).... ० ३ •
४. **झेलचेंडू.** (लॉनटेनिस Lawn Tannis.) ० १ ६

		रु. आ. पै.
५.	चौरंग गोळ्यांचा खेळ. (बिलियर्डस् Billiards.) रा. गोविंद सखाराम सरदेसाई कृत.	० ८ ०
६.	पाटनांवाचा पत्यांचा खेळ (बिझिक Bezique.)	० ३ ०
७.	मुद्रापरिवर्तन अथवा उलटापालटीचा खेळ. (Reversi.)	० १ ६
८	अंधक. (मगिन्स Muggins.).	० ० ९
९	उताणा रुपाया Pitch & Toss.	० ० ९

---

५ उर्दू

(छापून तयार)

१.	मुसाकाकिस्सा. (देवनागरी लिपींत) परिफुद्दीन वल्लद हकीम मौलवी, खाकी साहेब.	० ८ ०

इंटर्नाशनल साएंटिफिक् सीरीजच्या पुस्तकांच्या धर्तीवर

श्री सयाजी ज्ञान मंजुषा नामक ग्रंथमाला तयार करण्याचें काम सुरू आहे.

वरील ज्या पुस्तकांचे गुजराथींत तर्जुमे झाले नाहींत त्यांचे त्या भाषेंत तर्जुमे करण्याचें काम चालावयाचें आहे.